| | |
|---|---|
| | # अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर<br>नगरसचिव विभाग |

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०४      प्रस्ताव क्रमांक : २२      दिनांक :- २५/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** जिल्हा नियोजन समिती मार्फत अग्निशामन विभागाकरीता लागणारे उपयुक्त असे साधन सामुग्री खरेदी करणेकामी निधी अनुदान मिळणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभेच्या मंजुरीसह पाठविणेबाबत. विकास समितीमार्फत "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत अनुदान व तांत्रीक मंजुरी तसेच मा. महासभेची मंजुरी मिळणेबाबत.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ :- शासन निर्णय़ क्र.अशस 2021/प्र.क्र.199 नवि-20 दि. 01/01/2011

उपरोक्त संदर्भाकीत विषयांवये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिका अग्निशमन विभागाकरीता अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणेक़रीता अग्निशमन सेवेशी निगडीत पायाभुत सुविधांचे बळकटीकरण करणेसाठी महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) संदर्भीय शासन निर्णयाव्दारे परिछेद क्रमांक 1 तसेच परिछेद क्र.3 मध्ये नमुद बाबींअं वये परिछेद क्र.1 नुसार अहमदनगर महानगर पालिका अग्निशमन विभागाकरिता विविध प्रकारच्या आपत्ती ज्यामध्ये आग, पुर, रासायनिक दुर्घटना इ.आपत्ती प्रवण क्षेत्रामध्ये पुरक असे उपकरण असणे आवश्यक व गरजेचे आहे.

अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या आपत्तीचा विचार करिता तसेच शहरातील उंच इमारतींना आगीपासुन होणारा धोका लक्षात घेता रोबोटीक फायर फायटींग मॉनिटर घेणे आवश्यक असुन यांत्रीक प्रक्रीयेव्दारे आगीवर नियंत्रण मिळविणे सहज सोपे जाईल.तसेच शहरातील सखल भागाचा विचार करिता पुर सदृश्य सिथ्तीमध्ये पाण्याचा निपटारा करण्याकरिता फ्लोटींग पंप घेणे गरजेचे आहे. त्याकरिता पूरक असे उपकरण खरेदी करणे ज्यामध्ये प्रामुख्याने खालील प्रमाणे साधन सामुग्री घेणेबाबत प्रस्तावीत करण्यात आलले आहे.

| s.no | ITEM DECRIEPTION | QUQNTITY | UNIT PRICE (INR) |
|---|---|---|---|
| 1 | EDUPOK "95 GPM NOZZLE" | 2 | 199000/- |
| 2 | FLOATING PUMP, PEF-6HP-FL | 2 | 4,11,000/- |
| 3 | Savox Con-space ४ user kit 1+PTB hardline communication system | 1 | 22,95,000/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | JUPITIOR ROBOTIC FIRE FITTING MONITOR | 1 | 1,75,00,000/- |
| | | TOTAL- | 2,04,05,000/- |

सबब उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे अंदाजे रक्कम - 2,04,05000/- (रु. दोन कोटी चार लक्ष पाच हजार) इतका खर्च अपेक्षित असुन सदर खर्च भागविणे कामी सदरचा प्रस्ताव मा. जिल्हा नियोजन समितीकडे पाठविणेबाबत मा. महासभेची मान्यता आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा. महासभेपुढे घेणेस व प्रस्तावित उपरोक्त साधन सामुग्री बाबत मा.संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई यांचे कार्यालयाची तांत्रीक मान्यता आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा. संचालक महाराष्ट्र अग्निशमन सेवा या कार्यालयास पाठविणॆस मान्यते स्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर ) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त सो. यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

---*---

चर्चा :

**मा.श्री.गणेश कवडे :** महाराष्ट्राचे राज्यपालांनी छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा फुले यांचे बद्दल जे वक्तव्य केले त्याचा मी शिवसेना पक्षाच्या वतीने निषेध व्यक्त करतो.

आपण महाराष्ट्रात राहून आपण ज्यांच्यामुळे हिंदू म्हणून ताठ मानेने जगतो त्यांच्या बद्दल असे वक्तव्य करतो त्याबद्दल मी निषेध करतो.

श्रध्दाचे जे हत्याकांड लवजिहादच्या माध्यमातुन हत्यांकांड घडले त्याचा मी निषेध करतो या खटल्याची रोजच्या रोज सुनावणी फास्टट्रॅक कोर्टात झाली पाहीजे. असे गैरकृत्य करणा-यांना हूकूमशाही पध्दतीने भर चौकात फाशी दिली पाहीजे लवइन रिलेशनशिप मध्यमातून बातम्या वाचायला मिळतात संपूर्ण नगर शहराच्या वतीने निषेध या कृत्याचा नोदवावा. नराधमाला कठोरात कठोर शिक्षा व्हावी. श्रध्दाच्या मृतात्म्यास शांती लाभो यासाठी दोन मिनीटे स्तब्धता पाळावी.

**मा.श्री.मनोज कोतकर :** उड्डाणपुलाच्या अभिनंदनाचा ठराव सर्वांच्या वतीने घ्यावा सर्वांना वाटत होते उड्डाणपुल या शहरात व्हावा ब-याच आजी माजी सदस्यांनी यात पाठपुरावा केला असेल. आजी माजी नगरसेवक पदाधिकारी व तत्कालीन खासदार दिलीपजी गांधी यांनी भूमीपुजन केले नितीनजी गडकरी साहेब यांनी निधी दिला त्याबद्दल मी त्यांचे शहराच्या वतीने आभार मानतो त्याचप्रमाणे फडणवीस साहेब 50 कोटी रुपये पुलाच्या जमिनीखाली सुविधा कामासाठी निधी दिला. त्याबद्दल त्यांचेही आभार. या जिल्ह्याचे खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांचे शहराच्या वतीने आभार मानतो ज्या अडचणी आल्या त्या सोडविण्यासाठी अथक प्रयत्न मा.आमदार संग्रामभैय्या जगताप यांना बरोबर घेवून

सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मा.खासदार श्री.सुजयजी विखे पाटील, मा.आमदार श्री.संग्रामभैय्या जगताप त्याचबरोबर महानगरपालिकेचे आभार मानतो. त्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :** मा.खासदार डॉ.सुजयजी विखे पाटील, मा.आमदार श्री.संग्रामभैय्या जगताप सर्व आजी माजी पदाधिकारी यांनी जे सहकार्य केले त्याबद्दल आभार मानतो व अनुमोदन देतो. त्यांच्या शिरावर ;;;;;;;; हायवेवरील खड्डे, स्वच्छता, रंगरंगोटी याची आपल्याकडून पाठपुरावा त्या नगरसेवकांनी करण्यासाठी प्रयत्न करावे. काळजी घ्यावी अशी मी विनंती करतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :** ब्रिजवर जी तिरंगाची रोषणाई लायटींग केली बंद पडल्यानंतर महानलगरपालिकेने ती लावावी तसा ठराव करावा. केडगांव परिसरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळयासाठी निधी उपलब्ध करुन दिला, पुतळा दुरुस्त करावा. व सुशोभीत करण्याची मागणी केली पण प्रतिसाद मिळाला नाही. व्यापा-यांना आवाहन करुन आम्ही कामास सुरुवात केली मा.आयुक्त यांना आम्ही विनंती केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाची दुरावस्थ्ज्ञ झाली आहे. त्याठिकाणी सुशोभिकरण करावे. अशी विनंती केली त्यास अडचण काय आहे. याबाबत माहिती द्यावी.

**शहरअभियंता श्री.इथापे :** छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा सुशोभिकरणाचे काम प्रगती पथावर आहे. यशवंतराव चव्हाण, महात्मा ज्योतिबा फुले यांचेबाबत चर्चा झाली जे कोणी खाजगी तत्वावर करण्यास तयार असतील त्यांनी प्लॅन एस्टीमेट महानगरपालिकेस सादर करावे अटी-शर्ती तपासुन परवानगी दिली जाईल.

रस्त्याच्या कडेवर पुतळा आहे जागा अतिशय थोडी आहे. जागा मर्यादीत असल्याने मर्यादा येतात.

**मा.श्री.मनोज कोतकर :** रस्ता वाढेल त्यावेळेस वाढेल आज आपण सुशोभिकरण करु शकतो. ज्या वेळेस रस्ता वाढेल त्यावेळेस काढून घेवू. आज आवश्यकता आहे असे समजू. 10-20 लाख निधी टाकला तो वाया गेला. आयुक्त साहेबांनी आदेश द्यावा. 10-20 लाख निधी उपलब्ध करुन द्यावा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** काय असेल ते एस्टीमेट करुन घ्या.

**शहरअभियंता श्री.इथापे :** मान्यता घेवून कारवाई करु.

**मा.डॉ.सागर बोरुडे :** पूर्ण दाबाने पाणी देत नाही. दिवसाआड पाणी पुरवठा करता. वार्षिक खर्च कीती केला जातो. लाईन फुटते यावर शेडयुल पुर्ववत यायला आठ दिवस लागतात. यावर पर्याय काढला पाहीजे आज पाण्याची भयानक स्थिती आहे. जनरेटरची सोय का होत नाही. एक एमरजन्सी टीम करावी. लेसीबी वगैरे तातडीने उपलब्ध करुन घ्यावे.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** शहर हे उंचावर असल्याने मुळानगर येथुन विळद येथे पंपिंग करुन पाणीपुरवठा उपलब्ध करावा लागतो. सातत्याने वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढते आहे. 5 मिनीटे जर वीज पुरवठा खंडीत झाला तर परिस्थीती पूर्ववत होण्यासाठी 2 ते अडीच तास लागतो एमएसईबी ला तातडीने संपर्क करतो फोन चालू असतो. पाईपलाईन फुटते विळद ते वसंत टेकडी 2 लाईन आहे हवेच्या दाबामुळे, वाहनाच्या धडकेने, गॅस पाईपलाईनचे कामामुळे लाईन फुटते. गॅस पाईपलाईनचे कामामध्ये तुटल्या संदर्भात एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला आहे. ईमजन्सी टिम दुरुस्तीचे कामासाठी तयार आहे. लाईनलिकेजचा मॅसेज मिळाला की पाईपलाईन दुरुस्ती तातडीने करुन घेतो. जनरेटर एवढया मोठया क्षमतेचे उपलब्ध नसते. सोलरची वीज जनरेट होवून ती एमएसईबीला जाते मग आपल्याला मिळते.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** त्याक्षमतेचे जनरेटर घेता येणार नाही का. एक इमरजन्सी टीम तयार करावी.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** टीम तयार आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** अमृतचे काम 95% पूर्ण झाले आहे. 5% काम पूर्ण का होत नाही. टाक्या पूर्ण क्षमतेने भरत नाहीत.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** 1.2% काम बाकी आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** वसंतटेकडी येथे मोटर बसविणे बाकी आहे. एस्टीमेट मध्ये ती धरली नव्हती. दीड वर्ष झाले 5% काम पूर्ण होत नाही. आपण 5 लाख लोकांना वेठीस धरतो.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** मुळ योजनेत मोटारी व पंप न धरल्याने ट्रान्सफार्मर पॅनल बसवता येत नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** हे काम झाले तर लोकांना बोलण्याची गरज पडणार नाही. सावेडीतील रस्त्याबाबत मी लेखी पत्र दिले त्याचे उत्तर सुध्दा दिले नाही.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** डी.पी.आर पाहील्या शिवाय काम कसे चालू होवू शकते.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** राज्याचे मेन एमजीपी यांचेकडून डीपीआर चेक होवून आला आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** तुम्ही पंपाची वर्क ऑर्डर दिली का

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** डिसेंबर 15 पर्यंत व त्यानंतर 8 दिवसांनी पंप येणार आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** आयुक्तांना रस्त्याचे पत्र दिले. दीड दोन महिन्यांनी मुरुम खडी त्याठिकाणी टाकली. रस्ता मंजूर आहे कॅश निधी आहे.

**मा.श्री.महेंद्र गंधे :** माझ्या घरा समोरील रस्त्याची तात्पुरती डागडूजी केली नागरीक टीका करतात. एक रस्ता धड नाही व्हाटसअप व इन्टाग्राम बघा लोक टीका करतात.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :** हा जो रस्ता आहे. त्या रस्त्यावरुन नागरीक ब-याच कॉलनीतुन ये-जा करतात.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** आयुक्त साहेबांनीच उत्तर द्यावे. मी आयुक्तांना पत्र दिले. इथापेंनी मागच्या सभेत उत्तर दिले.

**मा.श्री.गणेश भोसले :** सिटी इंजिनियर विभाग प्रमुख आहेत ते उत्तर देत आहेत. तुम्ही महापौर राहीले आहेत.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :** आयुक्त साहेब यांनी उत्तर द्यावे.

**मा.आयुक्त साहेब :** शहर अभियंता उत्तर देतील शहर अभियंता याबाबत सविस्तर निवेदन देतील मी याबाबत आढावा घेतो. शहर अभियंत्या सोबत बैठक घेवून प्रश्न मार्गी लावण्यांत येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :** दिनांक 15-09-2018 साली 9 कोटी फडणवीस साहेबांनी निधी प्राप्त करुन दिला. त्यामध्ये 47 काम मंजूर झाले ते एस्टीमेट साठी पीडल्ब्युडी कडे वर्ग झाले आपल्याकडे फेज-2 व भुयारी गटर चालू असतांना त्यासाठी कालावधी 3-4 वर्षे गेला महापौरांनी मध्यंतरी दिनांक 06-05-2022 रोजी मिटींग घेतली त्यामध्ये 47 पैकी 5 रस्ते ताबडतोब करावे याबाबत पीडब्ल्युडी ला पत्र दिले. डांबराचा रेट वाढल्यामुळे ठेकेदार काम करीत नाही त्याठिकाणी फेज -2, भुयारी गटारीचे काम झाले त्यावेळी तेथे रस्ते का नाही केले. पीडब्ल्युडी अधिकारी म्हणतात आयुक्तांचे पत्र आम्हाला पाहीजे असे म्हणतात आपल्याकडे पैसे उपलब्ध असतांना काम करुन धेत नाही फेज-2 असेल भुयारी गटरचे असेल मध्य शहरात कोणी काही करणार का नाही. दरवाढ टेंडरमध्ये नाही त्यामुळे ठेकेदार काम करायला तयार नाही मुलभूत सोईसुविधा निधी मागणी करा. 15 दिवसात मी निधी आणतो. शहराची मध्यस्थिती नमूद करा. 5 कोटी पडून आहेत. ठेकेदाराला रेस्टीकेट करा तुम्हाला अधिकार आहेत.

**शहर अभियंता श्री.इथापे :** सावेडी नाका रस्ता खुलासा. सावेडी नाका ते शुभम मंगल कार्यालय रस्ता प्रत्यक्षात जागेवर 12 मीटर आहे. अतिक्रमण आहे. अतिक्रमण निघाले नसल्याने रस्ता करता आलेला नाही. रेणाविकर रस्ता समोर काम चालू आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** तो पंप कित्येक दिवसापासून आहे. सांडपाण्याचा निचरा होत नाही 13 मीटर अतिक्रमण निघत नाही. रॉयल्टीसाठी ठेकेदाराच्या गाड्या पकडल्या जातात. हेवी दंड त्यांना आकारतात त्यामुळे साईटवर मटेरियल येण्यास अडचणी येत आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** आहे तो रस्ता निट करुन घ्या. अतिक्रमण बाजुला ठेवा.

**शहर अभियंता श्री.इथापे :** सभा संपल्या नंतर आम्ही आयुक्त साहेबांशी चर्चा करतो निर्णय घेतो.

**मा.महापौर साहेब :** 15 दिवसात काम करुन घ्या.

**शहर अभियंता श्री.इथापे :** महापौर साहेबांच्या आदेशानुसार काम करुन देतो.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** आहे तेवढा रस्ता करुन द्या.

**मा.आयुक्त साहेब :** त्या एस्टीमेट प्रमाणे रस्ता असेल त्याप्रमाणे रस्ता करुन दिला जाईल. 15 दिवसात मार्गी लावतो.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** गेल्या दिड ते दोन महिन्यापासून डेंग्युने थैमान घातले पणे आपण त्या आजाराकडे गांभीर्याने पहात नाही प्रशासनाच्या वतीने पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. मा.उपमहापौर यांनी मिटींग घेतली तेंव्हा यंत्रणा जागी झाली. प्रत्येक प्रभागात फवारणी नियोजन झाले. अनेक स्कीम आहेत. याची माहिती नगरसेवकांना व नागरिकांना नाही या योजना जाणून बुजून पोहोचू द्यायच्या नाहीत का ? मी विनंती करतो ज्या योजना आहेत त्या योजनांची माहिती या ठिकाणी द्यावी.

**मा.श्री.गणेश कवडे :** विषयपत्रिकेवरील विषय अगोदर घ्या.

**डॉ.दळवी :** मा.उपमहापौर यांनी मिटींग घेवून आढावा घेतला. ज्या सूचना दिल्या त्याप्रमाणे कार्यवाही सुरु केली आहे. 50 कर्मचारी यांना औषध फवारणी तात्काळ सुरु केली. धूर फवारणी करण्यात आली. आरोग्य विभागामार्फत या योजना सुरु आहेत. या योजना सर्व वॉर्डापर्यंत पोहोचवण्यासंबंधी सूचीत केल्या प्रसिध्दी साठी आपण कमी पडतो. कोव्हीड काळात ग्राउंड लेव्हलवर आपण चांगले काम केले. गोवरचा एकही रुग्ण अजुन आलेला नाही.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** योजना सर्व सामान्यांपर्यत पोहोचत नाही. सविस्तर माहिती घ्या.

**डॉ.दळवी :** नागरी आरोग्य केंद्रात नियमीत लसीकरण चालू आहे. प्रधानमंत्री मातृत्व योजना चालू आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** गोरगरीब झोपडपट्टी पर्यत योजना पोहोचल्या पाहीजे.

**डॉ.दळवी :** एक भूमिका सर्व नागरिकांना देण्यांत येणार आहे. प्रसिध्दीत आम्ही कमी पडत आहोत.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** अनेक प्लॉट मोकळे आहेत. त्या ठिकाणी पाण्याचे डबके साचले आहे. त्याठिकाणी डासांची उत्पत्ती होते. त्यावर काही उपाययोजना करतायेत नाहीत का. काही कुटुंबातील तरुण मुले निधन पावले आहेत. कर्ता पुरुष गेले आहेत.

**डाॅ.दळवी :** ज्येष्ठ नागरिकांना ओपीडी मोफत आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** आपल्याकडच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचवल्या पाहीजेत.

**मा.श्री.अविनाश घुले :** आपण प्रसिध्दीला कुठेतरी कमी पडतो. सन्माननीय उपमहापौरांनी मिटींग घेतली नसती तर हा विषय पुढे आला असता का. तुम्हाला या योजना खुल्या की ताण येईल असे दिसते. उपायुक्तांना माहिती नव्हत्या योजना महिलांच्या योजना नगरसेवकांना माहिती आहेत का. ?

**मा.श्रीमती.कोतकर सुनिता :** मी प्रत्येत भागात जावून नागरिकांना मार्गदर्शन करते. नगरसेवक म्हणून आमची जबाबदारी आहे. कष्टकरी लोकांना माहिती दिली पाहीजे केडगांव मध्ये फवारणी गवत काढणे या काढतात. महिलांचे लसीकरणाचे अभियान वेळोवेळी केली जाते दळवीचे खरोखर कौतुक वाटते.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** तुमच्या भागात चांगले असेल यात दुमत नाही. काही योजनांचे फलक लावले का.

**डॉ.दळवी :** सर्व आरोग्य केंद्राबाहेर फलक लावले आहेत.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** फलक लावावे, पॉम्प्लेट वाटण्यांत यावेत. महानगर पालिका योजना राबविते त्याची व्यापक प्रसिध्दी करावी. तसे नियोजन करावे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** महिला समिती आहे त्यातुन निधी मिळतो.

**मा.श्री.अविनाश घुले :** मा.उपमहापौर यांचे अभिनंदन करतो. जे काम प्रशासनाने करायला पाहीजे ते काम त्यांनी केले. इथून पुढे योजना नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहीजेत यात कोणतीही हयगय करु नये.

**मा.श्री.मदन आढाव :** गणेश चौक चे कामास मंजूरी दिली त्याबद्दल आयुक्त महापौर सभापती यांचे आभार मानतो तो रोड किती दिवसात सुरु होईल.

**मा.सौ.शीला चव्हाण :** नविन उड्डाणपुल व कल्याण रोडवरील पुलावर वाहतुक पथकर लावावा व शहर खड्डे मुक्त करावे. व हा विषय अजेंडयावर घ्यावा.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** पथकर अशा प्रकारे लागू शकतो का.

**शहर अभियंता श्री.इथापे :** दोनही रस्ते महानगरपालिकेचे नाहीत. राष्ट्रीय महामार्गाचे आहेत त्यामुळे आपण कोणताही कर त्यावर लावू शकत नाही.

**मा.सौ.मीना चोपडा :** जातीवाचक नावे वगळण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मोचीगल्ली व कापडबाजाराचे नांव बाबा रामदेवजी मार्ग, पै.शकुर शेख चुडीवाले असे नाव घ्यावे. याबाबत मी दिनांक 03-11-2022 रोजी पत्र देवून पाठपुरावा केला.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** पै.शकुर शेख चुडीवाले यांचे नांव तीन वर्षापुर्वी नामकरण करणे बाबत पत्र दिले. त्यावर अद्याप कार्यवाही केली नाही.

**मा.सौ.शीला चव्हाण :** 305 व 506 सफाई कामगारांचा निकाल लागला त्यात काही वारले. त्यांचे वारसांना नोकरीत घ्यावे. घरी जरी दुसरी नोकरी असेल तर त्यांना काय उपयोग, शिक्षणाची अट शिथील करावी. सर्व वारसांना कामावर घ्यावे.

**मा.महापौर मॅडम :** प्रशासन सर्व तपासणी करुन उचित निर्णय घेईल.

**मा.सौ.सुरेखा कदम :** छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले पुतळा उभारणे बाबत माहिती घ्यावी.

**शहर अभियंता श्री.इथापे :** महानगरपालिका इमारती समोर शिवाजी महाराजांचा पुतळयासाठी जागा निश्चीत केली आहे. 2 मे, 2017 चे जी आर मध्ये 17 बाबींची पुर्तता करणेचे आदेशानुसार पुर्तता करुन दिली. 15 दिवसांपुर्वी जिल्हाधिकारी यांचेकडे बैठक झाली. पोलीस विभागाची एनओसी बाबत चर्चा झाली. पोलीस अधिक्षकांनी छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराजांच्या पुतळयासाठी एनओसी दिली. या दोन्ही पुतळयांचे चबुत-यांचे परवानगी साठीची आर्किटेक्ट यांचेशी संपर्क साधला त्यांना एनओसी व ठराव पाठविला आहे. नगरविकास विभागाची परवानगी मिळाल्यानंतर मा.जिल्हाधिकारी यांचेसमोर मिटींग घेतली जाईल. ब्रांझ धातुचा संभाजी महाराजांचा पुतळा तयार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा होता ती जागा महानगरपालिका प्रशासनाने ताब्यात घेतली. निविदा प्रक्रीया लवकर होईल. महात्मा फुले पुतळा मान्यता घेवून निविदा प्रसिध्द होईल. सर्व प्रोसेस पॅरलली होईल. लवकरच पुतळा बसविणेची कार्यवाही होईल. पोलिसांची परवानगी महत्वाची आहे. दोन पुतळयांना पोलिसांनी परवानगी दिली. नंतर चीफ आर्किटेक्ट यांची परवानगी महत्वाची आहे. ती पुढच्या आठवडयात मिळणे अपेक्षित आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :** किती दिवस लागतील चार-पाच वर्ष झाले. टाईम द्या आयुक्त साहेब.

**शहरअभियंता श्री.इथापे :** कायदेशीर अडचणी येतात. काही अडचणी येतात. संभाजी महाराजांचा पुतळा आपण आपल्या जागेत बसवित आहोत.

**मा.महापौर मॅडम :** लवकरात लवकर पुतळे बसवा.

**मा.सौ.सुरेखा कदम :** लवकरात लवकर पुतळे बसविण्यांत यावेत.

**मा.श्री.राहुल कांबळे :** सुख सागरची जागा सद्यस्थितीत किती आहे.

**शहर अभियंता श्री.इथापे :** टी.पी.स्कीम नंबर 3 मधला प्लॉट आहे. ती जागा 577 चौ.मी. रस्ता वाईडींग सोडून आहे. पहिल्या टप्प्यात पुतळयांची निविदा काढतो आहोत. नंतर सुशोभिकरणाची निविदा प्रसिध्द करण्यांत येईल.

**मा.श्री.राहुल कांबळे :** आता पुन्हा त्याठिकाणी अतिक्रमण होवू नये म्हणून उपाययोजना करावी.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** तसे होणार नाही.

**शहर अभियंता श्री.इथापे :** दोन पुतळे चीफ आर्किटेक्टची परवानगी साठी प्रस्ताव सादर केला आहे. त्याची मंजूरी मिळाल्यानंतर येत्या दोन महिन्यात पुतळे उभारु शकतो.

**मा.सौ.सुरेखा कदम :** उड्डाणपुलाच्या कामामुळे जे दुषीत पाणी उज्वल कॉम्प्लेक्स, मेहेर कॉलनी या भागास होत आहे.

**इंजिनिअर श्री.निंबाळकर :** इम्पीरियल चौकापर्यंत नविन लाईन टाकण्याचे काम झाले आहे.

**मा.श्री.मदन आढाव :** बोल्हेगांवचे रस्त्याचे काम कैंव्हा सुरु होईल. राघवेंद्र स्वामी ते केशव कॉर्नर.

**शहर अभियंता श्री.इथापे :** निविदा मा.स्थायी समितीमध्ये मंजूर झालेली आहे. ठराव प्राप्त झाल्यानंतर मा.आयुक्तांची मंजूरीसाठी प्रस्ताव ठेवू त्यानंतर करारनामा करुन घेवून कार्यारंभ आदेश देवू. 8 ते 10 दिवस लागतील अतिक्रमणाच्या नोटीस देण्याची कारवाई सुरु करु.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** फेज-2 अमृत योजनेत जे पाईप टाकले तेच खराब आहेत. रस्त्याच्या कामामुळे पाईपलाईन खराब झाल्या आहेत.

**इंजिनिअर श्री.सातपुते :** नागापूर बोल्हेगांव काही भागात काम झाले त्याठिकाणी लिकेज झाल्या त्याच ठेकेदाराकडून जॉईंट करतो डिपॉझिट आपल्याकडे आहे त्याच ठेकेदाराकडून आपण करुन घेतो.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** पाईपलाईन रोडला रिटर्नचे पाणी येते. त्या कर्मचा-यांना वॉलमनला वॉल बंद करायला सांगतात. टाकीवरील कर्मचा-यांना गाडळकर यांचे मॅसेज येतात. एकतर पाणी कमी येते आहे. आटे कमी करायला सांगतात.

**इंजिनिअर श्री.सातपुते :** मी चौकशी करतो व सांगतो.

**मा.श्री.अविनाश घुले :** सोलापूर हायवेवर काम चालू आहे. अमृतच्या पाण्याच्या लाईन तेथुन गेल्या आहेत. त्यावर काही उपाययोजना केली का. सारसनगर टाकी कमी भरते ती लाईन तेथुन गेली आहे.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** त्या काम करणारे ठेकेदार व आमचे प्रतिनिधी यांनी एकत्र पाहणी केली त्यांच्या खर्चाने ते शिफ्ट करुन देणार त्यांच्या मशिनरीमुळे तर 32 फुट नालीवर ते तातडीने दुरुस्त करुन देणार आहेत.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** मी मुंकुंदनगर प्रभाग क्रमांक 3 मधील पाणी पुरवठा संदर्भात प्रश्न विचारतो आर्ध्या भागाला दिवसाआड पाणी काही भागाला 5-6 दिवसाआड पाणी मिळते.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** उपाययोजना केली. फेज-2 चालू केली.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** साहित्य उपलब्ध करुन देत नाही. आपल्याच आरोग्य विभागातील कर्मचा-यांने फोन केला मला रात्री 12 वाजता पाणी नको. संबंधित अधिकारी यांनी मला ते सांगू नका मी भंगार एरियात राहतो.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** 50 ते 60% भागात पाणी पुरवठा व्यवस्थीत होतो. तेथे पाणीपुरवठा देवू शकत नाही. त्यासाठी मुकुंदनगरमधील पाण्याची टाकी चालू केली. ट्रायल घेतली, नागरिकांना दाखविले तुम्ही रितसर पावती करुन कनेक्शन घ्यायला सांगीतले. जवळजवळ 600-700 अनधिकृत घेतले ते रेग्युलराईज करुन घ्यायला सांगीतले.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** जुन्या लाईनवर दिवसाआड पाणी घ्या.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** जुन्या लाईनवर पाणी पुरवठा करु शकत नाही म्हणून नविन लाईन टाकली.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** नविन बजेटमध्ये पाईपलाईनसाठी 20 ते 30 लाख तरतुद करा. जे भरत नाहीत त्यांच्या घरपट्टी पाणी पट्टीत लावून टाका.

**मा.महापौर मॅडम :** सक्तीने कारवाई करण्यांत येईल.

**मा.आयुक्त साहेब :** अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करुन घ्यावे लागतील. अधिकृत करुन घेत नाही, तोपर्यंत सर्व कनेक्शन रेग्युलराईज होणार नाहीत तोपर्यंत पाणी पुरवठा होणार नाही. अनधिकृत नळ कनेक्शन धारकांना पाणी मिळणार नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** इनलिगल लोकांपाई लिगल लोकांना लाभ मिळत नाही. घरपट्टी भरा अन्यथा नळ कनेक्शन कट करा. इनलिगल कट करा.

**मा.आयुक्त साहेब :** अनधिकृत कनेक्शन कट केले जाईल. अधिकृत लाईनवरील कनेक्शन पाणी दिले जाईल. जुनी लाईन सुरु होणार नाही. जुन्याच लाईन कनेक्शन दिले जाईल.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** जे लिगल आहेत त्यांना पावती घेवून यायला सांगा ते आपण चालू करु.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** दिवसाला एक किंवा दोन टँकर द्या.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** निकम साहेब टँकर व्यवस्था करा.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** जिथे पाण्याची व्यवस्था नाही त्याठिकाणी टँकर देतो. जिथे डिस्टब होतो त्या ठिकाणी टँकर देतो.

**मा.श्री.अक्षय उणावने :** लालटाकी भागातील नागरिकांना कनेक्शन जोडून देत नाहीत.

विषय क्रमांक 22 चे वाचन -

**मा.श्री.कातोरे राजू :** नागापूर भागात चव्हाण हॉस्पीटल मागे टाकीवर कोणतेही झाकण नाही. त्यावर तातडीने उपाय योजना करावी. फेज-2 वर टाकी आहे.

**इंजिनियर श्री.सातपुते :** डिपार्टमेंटल पत्र दिले वरती झाकण बसवू व खाली गेट बसवू. 8-10 दिवसात करुन घेतो. दिवस कमी करु.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** अर्जंट मध्ये करुन घेवू.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** विषय क्रमांक 22 मंजूर करा.

**मा.महापौर मॅडम :** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. जिल्हा नियोजन समिती मार्फत अग्निशामन विभागाकरीता लागणारे उपयुक्त असे साधन सामुग्री खरेदी करणेकामी निधी अनुदान मिळणेबाबत प्रस्ताव पाठविणेस तसेच विकास समितीमार्फत "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानाअंतर्गत अनुदान व तांत्रीक मंजुरी घेणेकामी ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.विजय मोहनराव पठारे

अनुमोदक : मा.श्री.प्रकाश बाबुराव भागानगरे

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

| | |
|---|---|
| | **अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**<br>**नगरसचिव विभाग** |

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०४** **प्रस्ताव क्रमांक : २३** **दिनांक:- २५/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** सन 2022-2023 चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मा.स्थायी समिति ठराव क्र.97 दिनांक 27 09 2022 अन्वये शिफारस करण्यांत आली असून अखेर मंजूरीस्तव.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : बांधकाम विभागाचा दिनांक 10/०8/2022 चा प्रस्ताव.

विनंती टिप्पणी देण्यांत येते की, सन 2022-2023 चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मा.स्थायी समिती ठराव क्रमांक 97 दिनांक 27-09-2022 अन्वये शिफारस करण्यांत आली असून अखेर मंजुरीस्तव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यास सूचित केले आहे.

तरी सन 2022-2023 चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकाचा विषय मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात यावा हि विनंती.

**यावर मा.स्थायी समिती विषय क्रमांक : ९७ दिनांक :- २७/०९/२०२२**

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा बांधकाम विभागाचा दिनांक १०/०८/२०२२ रोजीचा प्रस्तावा बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर:-** अहमदनगर महानगरपालिका अर्थ विभाग

**संदर्भ :-** बांधकाम विभागाचा दि.१०/०८/२०२२ चा प्रस्ताव.

उपरोक्त विषयाचे संदर्भाकित प्रस्तावानुसार सादर करणेत येते की,अहमदनगर महानगरपालकेच्या सन २०२२-२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकबाबत महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम मधील कलम १०३ व अनुसुची "ड" मधील प्रकरण ७ मधील २(२) (अ)(ब)(क) अन्वये रकमा कमी करणे किंवा बदली करणे नुसार प्रस्ताव ठेवण्यात येत आहे.

उपरोक्त नियमानुसार स्थायी समितीस सरकारी वर्षात कोणत्याही वेळी-

(अ) अर्थसंकल्पीय अनुदानाची रक्कम कमी करता येईल.

(ब ) अर्थसंकल्पीय अनुदानातील कोणतीही रक्कम एका गौण शीर्षातुन दुस-या गौण शीर्षात किंवा एका गौण शीर्षाखालील दुय्यक शीर्षातुन दुस-या गौण शीर्षाखालील दुय्यम शीर्षात बदली करण्यास मंजुरी देता येईल.

(क) गौण शीर्षाखालील पाच हजार रूपयांपेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम,एका दुय्यम शीर्षातून दुस-या दुय्यम शीर्षात किंवा एका प्राथमिक घटकातून दुस-या प्राथमिक घटकात बदली करण्यास मंजुरी देता येईल,अशी तरतुद आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे " या तरतुदीनुसार "कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत

आणि एका अर्थसंकल्पीय शिर्षातुन दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षातर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत" अशी तरतुद असल्याने प्रकरण ७ मधील २(२) मधील (अ)(ब)(क) नुसार सन २०२२-२०२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सोबत जोडलेले सन २०२१-२०२२ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मंजुरीस्तव मा.स्थायी समितीसमोर ठेवणे नियमानुसार योग्य राहिल.कृपया आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे अहवाल असे.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की,अधिनियम कलम १०१ नुसार स्थायी समितीच्या शिफारशीवरून महानगरपालिकेस वेळोवेळी सरकारी वर्षात,अर्थसंकल्पीय अनुदानात वाढ करता येईल,सबब बांधकाम विभागाचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव सादर. /"अ"

यावर मा.उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की,प्रस्तावित "अ" नुसार कार्यवाही करणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,सर्व विभागप्रमुखांकडुन पनर्विनियोजन बाबत प्रस्ताव मागणी करणे उचित होईल.कारण की,फक्त बांधकाम विभागाचा प्रस्ताव झाला आहे.इतर विभागांकडुन प्रस्ताव मागवून नंतर मा.स्थायी समिती समोर ठेवणे उचित होईल.निर्णयास्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की,"अ" मान्य.

सबब प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेपुढे सादर.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चा नमुना क्रमांक १० नियम ३० (३) पहा अहमदनगर महानगरपालिका अ.नगर सन २०२२-२०२३ चे सादर केलेले पुनर्विनियोजनाचे विवरणपत्र

| | या शिर्षातून | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान, गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान २०२२-२३ | दि.२६ ऑगस्ट २२ अखेरचा खर्च | उपलब्ध शिल्लक (प्रस्तावीत कमी करावयाची रक्कम ) | (४-६) सुधारित तरतुद | अभिप्राय |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | बांधकाम विभाग | ठेकेदार (इतर अनामत) | ६३०००००० | ५४३६३६० | २०००००० | ४३०००००० | बांधकाम विभागाचा प्रस्ताव |
| | पाणी पुरवठा विभाग | रस्ता रूंदीकरणामुळे बाधित होणा-या पाईप लाईन स्थलांतरीत / नव्याने करणे | ७५ | ० | ३५ | ४० | पाणी पुरवठा योजना पुर्ण करणेकामी ठेकेदाराची राखीव ठेवलेली डिपॉझीटमध्ये ठेवलेली रकमे अदाईसाठी |
| | | एकुण रक्कम (तरतुद) | | | २०००००० | | |

***

| | हया शिर्षातून | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | प्रधान, गौण व तपशीलवार शीर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अुनदान २०२२-२३ | २६ऑगस्ट २२ अखेरचा खर्च | प्रस्तावीत वाढीची रक्कम | अभिप्राय (११+१३) सुधारित तरतुद | अभिप्राय |
| ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५- | १६ |
| १ | बांधकाम विभाग | ई डिपॉझिट | २५००००० | २४५२९०६ | १५०००००० | १७५००००० | बांधकाम विभागाचा प्रस्ताव |
| | | तांत्रिक लेखा परिक्षण फी | ३०००००० | ० | ५०००००० | ८०००००० | बांधकाम विभागाचा प्रस्ताव |
| | | एकुण रक्कम(तरतुद) | | | २०००००० | | |

**चर्चा :-**

मा.सभापती साहेबः- अहमदनगर महानगरपालिका सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात पुनर्विनियोजन अंदाजपत्रक करणे बाबतचा बांधकाम विभागाचा प्रस्ताव.

मा.श्री.रविंद्र बारस्कर :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवा.

त्यानुसार सभेमध्ये ऑफिस रिपोर्टचे वाचन करण्यात आले.

मा.सभापती साहेब :- या बाबतची सविस्तर माहिती सांगा.

मुख्यलेखाधिकारी श्री.मोरे :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १०३ नुसार "रकमा कमी करणे किंवा बदली करणे " या तरतुदीनुसार "कोणत्याही अर्थसंकल्पीय शिर्षात कमी करावयाच्या रकमा नियमानुसार कमी केल्या पाहिजेत आणि एका अर्थसंकल्पीय शिर्षातुन दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षातर्गत बदली करावयाच्या रकमा नियमानुसार बदली केल्या पाहिजेत" अशी तरतुद असल्याने प्रकरण ७ मधील २(२) मधील (अ)(ब)(क) नुसार सन २०२२-२०२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून शिफारसी करीता मा.स्थायी समितीसमोर ठेवण्यात आले आहे.

मा.श्री.गणेश कवडे :- बांधकाम विभागाकरीता सन २०२२-२०२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्याची शिफारस करण्यात यावी.

मा.श्री.समद खान :- .आगामी सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घेण्याच्या अटीवर ऑफिस रिपोर्ट मंजुर करण्यात यावा.

मा.सभापती साहेब :- बांधकाम विभागातील प्रस्तावित कमी करावयाची रक्कम त्या त्या लेखाशिर्षाला कमी पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. बांधकाम विभाग ठेकेदार (इतर अनामत)या लेखाशिर्षा मधून २ कोटी कमी करून ई - डिपॉझिट लेखाशिर्षावर रक्कम रूपये १ कोटी ५०लाख व तांत्रिक लेखा परिक्षण फी रक्कम रूपये ५० लाख वर्ग बाबतच्या लेखा विभागाकडून सादर करण्यात आलेल्या तक्त्यानुसार बांधकाम विभागाकरीता सन २०२२-२०२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास मा.महानगरपालिका सभे पुढे सादर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.आगामी सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घेण्याच्या अटीवर ऑफिस रिपोर्ट मंजुर.

**<u>ठराव</u>** :- ऑफिस रिपोर्ट नुसार बांधकाम विभागातील प्रस्तावित कमी करावयाची रक्कम त्या त्या लेखाशिर्षाला कमी पडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. बांधकाम विभाग ठेकेदार (इतर अनामत)या लेखाशिर्षा मधून २ कोटी कमी करून ई - डिपॉझिट लेखाशिर्षावर रक्कम रूपये १ कोटी ५०लाख व तांत्रिक लेखा परिक्षण फी रक्कम रूपये ५० लाख वर्ग बाबतच्या लेखा विभागाकडून सादर करण्यात आलेल्या तक्त्यानुसार बांधकाम विभागाकरीता सन २०२२-२०२३ चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रकास शिफारस करण्यात येत आहे.आगामी सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घेण्याच्या अटीवर ऑफिस रिपोर्ट मंजुर. कायदेशीर व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सुचक :- मा.श्री.गणेश कवडे अनुमोदक :- मा.श्री. समद खान ठराव सर्वानुमते मंजूर.

**सही**/-सभापती
स्थायी समिती,अहमदनगर महानगरपालिका

---*---

चर्चा :

**मा.श्री.अनिल शिंदे :** विरोधी पक्ष नेत्यांनी सर्वात शेवटी बोलावे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** प्रभाग क्रमांक 1 पासून फवारणी मोहिम चालू केली. प्रथमतः उपमहापौर यांचे अभिनंदन करतो स्वच्छता मोहिम दर 30 तारखेला सुरु केली त्यांचा वॉर्ड ग्रीन केला. आपण या लगतच्या विषयात पुढे जात आहोत. आपण 5 हजार झाडे लावण्याचा संकल्प केला आयुक्तांना भेटतो. झाडाचे टेंडर बाबत काय झाले त्यांची प्रक्रीया केंव्हा होईल.

**शहर अभियंता श्री.इथापे :** डीएसआर ला आयटेमला आम्ही मंजूरी दिली. मागच्या आठवडयात.

**मा.श्री.संपत बारस्कर :** तुम्ही सर्व नगरसेवकांना वेडयात काढता. किती दिवसात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणार.

**शहर अभियंता श्री.इथापे :** आम्हाला कायद्याच्या चौकटीतच जावे लागते. शासनाचे पुतळयाचे बाबतीत अतिशय कडक धोरण आहे. चौकटीच्या बाहेर जावू शकत नाही. पोलिसांची एनओसी मिळाली. चिफ आर्किटेक्टची परवानगी 8 दिवसात मिळणे अपेक्षित आहे. दोन महिन्यात पुतळे परवानगी मिळाल्यानंतर बसवू शकतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :** प्रशासन पाहिजे तेवढा पाठपुरावा पाहिजे तेवढा घेतांना दिसुन येत नाही.

**शहर अभियंता श्री.इथापे :** कलेक्टर साहेबांकडे 3 वेळा प्रस्ताव दिला पोलिसांची एनओसी कलेक्टर साहेबांकडे दिली. कोव्हीड पासून वैयक्तीक पाठपुरावा करीत आहोत.

**मा.श्री.संपत बारस्कर :** मला या विषयावर 4-8 दिवसात लेखी द्या किती दिवसात पुतळा बसवू.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** 2-4 दिवसात टेंडर प्रसिध्द होईल. कॅफो रजेवर असल्याने विलंब झाला.

**मा.श्री.संपत बारस्कर :** आज त्या डिपार्टमेंटचा माणूसच उपस्थित नाही तर आम्हाला उत्तरे कसे मिळणार आपल्याकडे रक्त मोफत मिळते का ?

**आरोग्य अधिकारी डॉ.राजुरकर :** 7 प्रा. आरोग्य केंद्र आहेत तेथे सेवा काय आहेत. ते सांगतो त्यात कोव्हीड बाह्यरुग्ण तपासणी किरकोळ आजारावर सेवा. एनएचपी केंद्राचे प्रोगॅम पल्स पोलीओ, महिला व बाल संगोपन सेवा, बालकासाठी 6 आजार बीईओ,गोवर, डेंग्यू, खोकला, नियमीत लसीकरण चालू असते. गरोदर मातांचा लसीकरण होते. प्रसुती सुस्थीतीत व्हावी म्हणून अॅमिनिया प्रोग्राम आहे. आरोग्य केंद्रात कोव्हीड तपासणी कमी रुपयात होते. ज्येष्ठ नागरिकांची तपासणी मोफत केली जाते.

**मा.श्री.संपत बारस्कर :** सावेडी येथे आरोग्य उपकेंद्रासाठी प्रस्ताव दिला त्याचे काय ?

**आरोग्य अधिकारी डॉ.राजुरकर :** आरोग्य वर्धीनी केंद्र तपोवन रोडला मंजूर केले आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** आठरेपाटील पुलाजवळ महानगरपालिकेची जागा आहे. त्याठिकाणी आरोग्य केंद्र उभारणीसाठी प्रस्ताव दिला पण कारवाई का करीत नाही. सावेडी महानगरपालिकेचे केंद्र उभारण्यात यावे. मी पुन्हा पत्र देतो तुम्ही कसे करणार याचे पुढच्या सभेत सांगा. निधी उपलब्ध करुन घ्या.

**मा.महापौर साहेब :** ठिक आहे.

**मा.श्रीमती.सुनिता कोतकर :** कोव्हीड काळात कॉन्ट्रॅक्ट बेसवर नेमलेले कर्मचारी यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून चांगले काम केले आहे. ओपीडी कॉन्ट्रॅक्ट बेसवर काम करतात आरसीएच क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमा अंतर्गत 10-15 वर्षापासुन ते एकत्रित मानधनावर काम करतात त्यांना कायम सेवेत सामावुन घेणेसाठी नविन पदे निर्माण करावी. त्यांना कायम नेमणूक देणेकामी नगरविकास विभागाकडे प्रस्ताव पाठविणेस महासभेने मंजूरी दिली आहे. कंत्राटी कर्मचा-यांनी चांगले काम केले आहे. सर्व कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या सेवेत रुजू करुन घ्यावे.

**मा.महापौर मॅडम :** मा.शासनाकडे पाठपुरावा चालू आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** एकवीरा चौक राजनंदिनी हॉटेल व इतर 2 एकुण 3 रस्त्याबाबत मा.आयुक्त साहेब, मा.आमदार साहेब, मा.महापौर मॅडम यांनी समक्ष पाहणी केली त्यावर एक रुपया निधी पडलेला नाही. गॅसवाल्यांनी रस्त्याची चाळण केली आहे ते

रस्त्याचे वाटोळे करत आहेत. प्रशासन यावर काय उपाययोजना करणार ते केंव्हाही येतात खोदकाम करतात. ते काय नगरसेवकाचे काम आहे. लोक आमच्या कडे येतात. त्यांनी आमची पाईपलाईन तोडली. ड्रेनेजलाईन तोडली आम्हाला तर त्याची माहितीच नसते. इथापे साहेबांना सर्व प्रश्न माहिती आहेत खड्डे कधी बुजविणार ते सांगा नगर शहरात तशीच परिस्थिती आहे. इतका चांगला उड्डाणपुल झाला पण लोकांचे समाधान नाही तोफेच्या तोंडी सर्वात अगोदर नगरसेवक येतात. रस्ते मंजूर आहेत मग ते का करीत नाही. कशामुळे थांबले.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** बुरुडगांव रोड 7 कोटी, राधाबाई काळे 1 कोटी, कल्याण रोडला 1 कोटी निधी थांबविला कितीतरी कोटी निधी नविन सरकारच्या माध्यमातुन थांबवला आहे. अनिल शेठला मी विनंती करतो त्यांनी ही स्थगीती उठवण्यासाठी प्रयत्न करावा. एवढा निधी आणणार कोठून.

**मा.श्री.संपत बारस्कर :** सध्या महानगरपालिकेची काम करण्याची पध्दत अगोदर रस्ता करतो. मग ड्रेनेज लाईन टाकतो, मग पाण्याची लाईन टाकतो यामुळे नविन रस्ते पुन्हा खोदले जातात. रस्त्यांची कामे का होत नाहीत.

**शहर अभियंता श्री.इथापे :** आपण या तीन रस्त्यांची चर्चा केली त्यात प्रशासकीय अडचण आहे. काम सुचवायचे अधिकार प्रशासनास नाहीत. तथापि जुना पिंपळगांव माळवी रोड 15 वर्षे झाली ही वस्तुस्थिती आहे. एस्टीमेट 2 वर्षापासुन तयार आहे. नागापूर बोल्हेगांव, सारसनगर, केडगांव हे डी.पी रोड आहेत. बोल्हेगांव 2 रस्ते सर्वसाधारणपणे 30 रस्ते गेल्या 10-15 वर्षापासुन केले नाहीत. रस्त्यावर ड्रेनेज लाईन, पाण्याच्या लाईन गेल्या गॅसच्या लाईन गेल्या आहेत बोल्हेगावातील नविन रस्ता पुर्ण खराब झाला आहे. काळी माती आहे. रस्त्याचे अंदाजपत्रक केले. निधी उपलब्ध नाही त्यामुळे रस्ते करु शकत नाही. गॅस कंपनी कडून 7-8 कोटी वसुल करुन जमा करुन घेतले आहेत. कंपनीच्या प्रतिनिधी सोबत वारंवार बैठका घेतल्या केंद्राच्या योजना आहेत ते पुर्ण करणे गरजेचे आहे. उपनगरात प्रायोगिक तत्वावर परवानगी दिल्या. सावेडीत रोड मोठे आहेत. रस्ता खोदण्यास परवानगी दिलेली नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :** रोड झाल्यानंतर गॅस पाईपलाईनसाठी रोड तोडतो का नाही.

**शहर अभियंता श्री.इथापे :** एक काम एका योजनेत मंजूर होते. दुसरे दुस-या योजनेत होते आमचा प्रयत्न असतो. शक्यतो नविन रस्ता खोदला जावू नये जिथे काम करायचे तिथे आरोग्य, पाणीपुरवठा विभागाशी समन्वय करतो. जिथे प्रोव्हीजन करणे शक्य आहे तिथे करतो. संभाजी नगरमध्ये 17 ठिकाणी रस्ता नागरिकांना खोदला आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** फेज-2 लाईनसाठीचा रस्ता फोडल्यानंतर चारी व्यवस्थीत भरण्यांत येत नाही. कंपनीकडून पैसे भरुन घेतांना पूर्ण रस्त्याचे पैसे भरुन घ्या.

**शहर अभियंता श्री.इथापे :** एस्टीमेटला फ्री हॅण्ड असावा अशी आमची विनंती आहे.

**मा.सौ.रुपाली वारे :** शिवनगर मधील रस्ता गॅसवाल्यांनी पुर्णपणे फोडला.

**शहर अभियंता श्री.इथापे :** नोटीस देवून त्यांचेकडून रक्कम वसुल करण्यांत येईल.

**मा.श्री.अविनाश घुले :** सोलापूर रोडचा रस्ता चालू आहे. त्या रस्त्याचे खाली फेज-2 लाईन आहे. सोलापूर रोड, कानडे मळा, या भागात रस्त्याचे कामामध्ये पाण्याची लाईन,ड्रेनेज लाईन तुटफुट होत आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** ठेकेदाराला शिफ्टींग करायला सांगीतले आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** चार ते पाच जे रस्ते सांगीतले त्यासाठी निधी उपलब्ध कैंव्हा करुन देणार आहेत.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** जे बजेट रिलीज करणार आहेत त्यातून देवू.

**मा.श्री.संपत बारस्कर :** महाल परिसरात नविन पाण्याची टाकी उभारणेचे काम तातडीने मार्गी लावा. नगरशहर उपनगर रोड पार्किंग हा विषय का पेंडींग आहे.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** शहरात तात्पुरत्या स्वरुपात ;;;;;

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** तातडीने मंजूरी दिली पाहीजे. साईड मार्जीन सोडून बांधकाम करतात.

**मा.महापौर मॅडम :** पुढच्या महासभेत घ्या.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :** टेंडर करण्याची परवानगी देवून टाका. फार गंभीर विषय आहे.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** जे पार्किंगचे धोरण अवलंबवायचे त्यांचे धोरण ठरवायचे आहे. त्यासाठी महासभेसमोर प्रस्ताव सादर केला आहे. त्याचा डीपीआर बनविला आहे. महासभेच्या मंजूरी नंतर पुढील प्रक्रीया होईल.

**मा.श्री.संपत बारस्कर :** टेंडरला महासभेची परवानगी लागेल. अशा अटीवर टेंडर प्रसिध्द करता येईल. अटी शर्ती टाकुन टेंडर प्रसिध्द करा.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** मा.महासभेची मान्यता घ्यावी लागेल.

**मा.श्री.संपत बारस्कर :** महासभा जो रस्ता वगळेल तो रस्ता वगळा या अटीवर टेंडर प्रसिध्द करा.

**मा.आयुक्त साहेब :** महासभेच्या मंजूरी अगोदर धोरण ठरविणे संयुक्तीत नाही. यामध्ये दर किती लावायचे, बिल्डींग डेव्हलप करायचे, कोणते रस्ते योग्य, कोणते अयोग्य आहे याचा विचार धोरण ठरवितांना करावा लागणार आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** पुढच्या आठ दहा दिवसात बोर्ड काढा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** पुढच्या चार पाच दिवसात बोर्ड काढू.

**मा.श्री.गणेश कवडे :** विषय मंजूर करणेत यावा.

**मा.महापौर मॅडम :** विषय पत्रिकेवरील विषय घेण्यांत यावेत. विषय क्रमांक 23 मंजूर

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. सन 2022-2023 चे पुनर्विनियोजन अंदाजपत्रक मा.स्थायी समिती ठराव क्र.97 दिनांक 27 09 2022 अन्वये केलेल्या शिफारशीस ही सभा मान्यता देत आहे.

पाणीपुरवठा विभागाचे मागणी नुसार (1) पाणी पुरवठा साहित्य (खरेदी व रिपेअर) - 40 लक्ष, (2) मुळानगर पंपिंग स्टेशन ते वसंत टेकडी पाईपलाईन दुरुस्तीचे खर्च - 15 लक्ष, (3) टॅंकरव्दारे पाणी पुरवठा करणे - 88 लक्ष, (4) शहरात नविन पाईपलाईन टाकणे - 25 लक्ष, (5) मुळानगर/विळद/नागापूर/वसंत टेकडी/ शहर इ. पाणी पुरवठा केंद्राचे मजबुतीकरण/बळकटीकरण करणे - 10 लक्ष (6) नळ कनेक्शन बदलणे - 7 लक्ष इत्यादी लेखाशिर्षकाच्या तरतुदीमध्ये वरीलप्रमाणे वाढ करण्यांत यावी.

यासाठी पाणीपुरवठा सर्वेक्षण करणे/हायड्रोलिक व्यवस्था -10 लक्ष, कार्यालयीन खर्च (बाहय यंत्रणा) 35 लक्ष, पिंपळगांव तलाव जमीन विकसित करणे अनुदान -12 लक्ष, विळद वाया जाणा-या पाण्याचा पुनर्वापर करणे/पाण्याची टाकी परिसर बळकटीकरण/पा.पु.बांधकाम विषयक कामे /नविन सुधारणा कामे -5 लक्ष, पा.पु.योजनेसाठी मुळानगर, विळद येथील विद्युत भार वाढविणे -10 लक्ष, केडगांव पाणीपुरवठा योजनेतुन नळ जोडणी स्थलांतरीत करणे - 7 लक्ष इत्यादी अंदाजपत्रकातील लेखाशिर्षातुन तरतुद कमी करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.गणेश खंडेराव कवडे,

अनुमोदक : मा.सौ.सुरेखा संभाजी कदम,

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०४** **प्रस्ताव क्रमांक : २४** **दिनांक:- २५/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** १५ वा वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन कामे करणे मा. महासभेची खर्च करणेकामी मंजुरी मिळणेबाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : 1) मा.शासनाकडील निर्णय क्र.एफ.एफ.सी.2020/प्र.क्र.56 मा.शासनाकडील शासन निर्णय क्र.एफएफसी 2020/प्र.क्र.56 नवि-4 मंत्रालय, मुंबई दिनांक 28 ऑक्टोबर 2020 रोजी स्वराज्य संस्था करीता प्राप्त अनुदानाच्या वितरण व विनियोगाबाबतची कार्यपध्दती निश्चीतीनुसार.

2) मा.शासनाकडील शासन निर्णय क्र.एफएफसी 2020/प्र.क्र.32 नवि-4 मंत्रालय, मुंबई दिनांक 22 मार्च, 2022 रोजीचा शासन निर्णय.

उपरोक्त संदर्भातील विषयानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, 15 वा वित्त आयोगातुन घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता बंधनकारक अनुदानाचा दुसरा हप्ता रक्कम रु.4,06,24385/- प्राप्त झालेले आहे. त्यानुसार सदरील संदर्भ क्र.1 अंवये खालील प्रमाणे निधी विनियोगाबाबत कार्यपध्दती निश्चीत करण्यात आलेली आहे.

| अ.क्रं | प्राप्त एकुण अनुदान | विनियोगाबाबत कार्यपध्दती | प्राप्त निधी | निधी |
|---|---|---|---|---|
| 01 | रु.4,06,24,385/- | Tied Grants :- Drinking water ( Incliding rainwater harvesting and recycling) (५०%) | ५०% | २,०३,१२,१२१/- |
| | | Solid waste Management (५०%) | ५०% | २,०३,१२,१२१/- |

वरिलप्रमाणे निधी विनियोगाबाबत घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कामे पार पाडणेकामी एकूण रक्कम रु.2,03,12,121/- उपलब्ध आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे नियोजन करुन घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कामे करणेकामी आवश्यक आहे.

| अ.क्रं | तपशील | अंदाजीत खर्च | आवश्यक निधी |
|---|---|---|---|
| 01 | संपुर्ण शहरातील कचरा संकलन व वाहतूक करणे व कचरा संकलन वाहतूक अंतर्गत येणा-या कामाकरीता | रु.1,25,00,000/- | रु.1,25,00,000/- |

| अ.क्रं | तपशील | अंदाजीत खर्च | आवश्यक निधी |
|---|---|---|---|
| 02 | सन 2022-2023 एक वर्षाकरीता अॅनिमल इन्सिनरेटर प्रकल्प देखभाल व दुरुस्तीसह चालविणे. | रु.20,00,000/- | रु.20,00,000/- |
| 03 | बुरुडगांव स.नं.34 या ठिकाणी दैनंदिन 100 मे.टन क्षमतेचा कचरा खत प्रकल्प देखभाल व दुरुस्ती | रु.60,00,000/- | रु.60,00,000/- |
| | एकुण | | रु.2,03,12,122/- |

वरिल प्रमाणे 01 ते 03 मुद्दे कामाकरीता निधी लागणार आहे. त्याकरीता 15 व्या वित्त आयोगातून घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीत बंधनकारक अनुदानाचा दुसरा हप्ता एकूण रक्कम रु.2,03,12,122/- प्राप्त आहेत. त्यानुसार 15 व्या वित्त आयोगातून प्राप्त रकमेतून वरीलप्रमाणे 1 ते 3 मुद्यांकरीता रक्कम रु. 2,03,12,122/- प्रस्तावित कामासाठी तसेच खालील तक्त्यासमध्ये दर्शविल्याप्रमाणे अबंधनकारक निधी मधून काम करणे आवश्यक आहे.

| अ.क्रं | प्राप्त एकूण अनुदान | विनियोगाबाबत कार्यपध्दती | निधी |
|---|---|---|---|
| 01 | रु.2,70,82,923/- | Non Million Plus Cities अंतर्गत सन 2021-2022 करीता अंतरिम मूलभूत अनुदानाचा दुसरा हप्ता Untied Grants | रु.2,70,82,923/- |
| | | | रु.2,70,82,923/- |

| अ.क्रं | तपशील | अंदाजीत खर्च | आवश्यक निधी |
|---|---|---|---|
| 01 | सोशल मिडीया मार्फत अहमदनगर महानगरपालिकेने केलेल्या विविध उपाययोजना व कार्यक्रमांबाबतची माहिती लोकांपर्यंत पोहोचविणे कामी | रु.15,00,000/- | रु.15,00,000/- |
| | एकूण | | रु.15,00,000/- |

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, 1) घनकचरा व्यवस्थापन विभागाने Tide grants बाबत प्रस्तावित केलेप्रमाणे महासभेची मंजुरी आवश्यक आहे.

2) Untide प्रस्तावित केलेल्या खर्चाबाबत सदर खर्च अनुदेय ठरत नाही. 15 वा वित्त आयोगाच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभीप्राय की, टाईड अनुदानाबाबत शासन निर्णय दिनांक 28/10/2020 मधील परिछेद II (अ)(1)(2) आणि अनटाईड बाबत परिच्छेद II (ब) 1,2,3,4 नुसार निकषात काम बसत असलेबाबत विभागाने खात्री करुन व उपरोक्त अ येथील नमुद अभिप्रायानुसार पुढील निर्णयास्तव.

यावर उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, दि.18/10/2022 रोजी

अ) (1) देयक न दिल्याने संबधीत ठेकेदाराकडील कामगारांनी संप केला आहे. महासभेकडे यथाअवकाश प्रस्ताव पाठवण्यास कार्योत्तर मंजुरी घेणेसाठी मान्यततेस्तव व तोपर्यंत जुले तर देयक अदा करणे.

अ) (2) आवश्यकता नाही. घनकचरा SWM DPR SBM-२ TEC साठी निधी राखीव आहे.

यावर मा. आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, A नुसार माहे Jully-22 देयक अदा करुन महासभेसमोर अवलोकनार्थ पाठवावे.

---*---

चर्चा :

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** किती निधी प्राप्त झाला. शासनाचे काय अटी आहेत. कशा कशावर निधी खर्च करणार या विषयी माहिती घ्यावी.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** 15 व्या वित्त आयोगा अंतर्गत निधी प्राप्त होतो. त्याची वितरण व विनियोगा बाबतची कार्यपध्दत टाईड ग्रँट 50%, ओपन टाईड ग्रँट 50% पाणी पुरवठा विभागासाठी 50%, घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी 4 कोटी 6 लक्ष प्राप्त झालेले आहे. 2 कोटी पैकी 1 कोटी 23 लाख कचरा वाहतुक ठेकेदार देयक अदा करणे, मृत जनावरे विल्हेवाट 20 लाख साठी प्रस्तावीत.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** कचरा ठेका संपला त्याचे टेंडर काढले 3 पैकी BVG हिचे जयपूर महानगरपालिकेने ब्लॅक लिस्ट केली आहे. त्याबाबत माहिती द्यावी भविष्यात जर ही कंपनी आली तर आज ज्या रँकवर महानगरपालिका आहे त्या रँकवरुन ती खाली येईल.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** तीन निविदा आल्या आहेत. 1) BVG 2) अपलेट 3) सुरतची आहे. कागदपत्र तपासायचे काम चालू आहे. 7 दिवस लागतील हायकोर्ट ऑर्डर आहे त्यातब्लॅक लिस्ट वगैरे केले नाही.

**मा.श्री.सागर बोरुडे :** एफएसटीपी ची खोटी माहिती दिली. डीएनएफपी मानांकन मुळे महानगरपालिकेचा नंबर मायनस मध्ये गेला.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** डीएफटीपी झाल्याशिवाय थ्री स्टार मानांकन मिळत नाही.

रिव्हीजनवर निर्णय झालेला नाही. ड्रायब्रेड आउटडेटेड केले आहे त्यामुळे आपल्याला फेल केले आहे. आपल्याला आपला रिझल्ट सुधारीत करुन घ्यावयाचा आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे** : ठेकेदाराकडून वाहन भाडे अद्यापपर्यंत किती भाडे वसुल झाले आहे.

**मा.उपायुक्त श्री.डांगे** : प्रत्येक महिन्याच्या देयकातुन महानगरपालिकेने दिलेल्या वाहनाचे भाडे वसुल करतो. दोन कोटी वसूल केले आहेत. चालू तीन चार बिले घ्यायची ते राहीले आहेत. सध्या जी तरतुद आहे तीच ठेवली. आरटीओ नियमानुसार बदलले नाही. वाहने जुनी आहेत घसारा 10 ते 15% जास्त आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे** : जुन्या ठेकेदाराकडून वाहने ताब्यात घेतांना वाहनाची स्थीती तपासून घ्यावी. नविन स्वच्छ सर्व्हेक्षण बाबत माहिती घ्या.

**मा.उपायुक्त श्री.डांगे** : शहर स्वच्छता व सौदर्यीकरण करण्याचे शासनाने ठरविले आहे. लोकसंख्येनुसार गट केले आहे. ड वर्ग महानगरपालिकेसाठी 15, 10 व 5 कोटी बक्षीस आहे. बक्षीसाचा निकष स्वच्छता व सुशोभिकरण यावर देणार आहेत. रस्ते स्वच्छ, चौक सुशोभिकरण, साईड पट्टे, भिंती रंगविणे इत्यादी काम करायचे आहे. डिसेंबर 2023 पर्यंत मुदत आहे. नेमलेली एजन्सी येवून पाहणी करतील व बक्षीस गुणानुसार मिळतील..

**मा.श्री.शाम नळकांडे** : 15 कोटीचे बक्षीसासाठी एक टीम करावी. व ते बक्षीस नगर शहराला कसे मिळेल यासाठी काही केले का ? कोणावर जबाबदारी निश्चीत केली का ?

**मा.उपायुक्त श्री.डांगे** : काही ठिकाणी निधीची अडचण आहे. पुढच्या महासभेला विषय घेवून येत आहोत. शेडाळे, इथापे, निकम यांचा प्रमुख यांचेसमवेत आमची बैठक झाली. त्यांना कामही सांगीतले आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे** : स्वयंभूची निविदा मंजूर केली. त्याचे तीन वर्ष पूर्ण झाले का. अंदाजे वाहनाचे भाडे माझे माहिती प्रमाणे 10 ते 15 लाख महिन्यास होतात. उपायुक्त म्हणतात पावणे दोन कोटी वसुल केले. दीड वर्षाचे भाडे आपण त्यांचेकडून केंव्हा घेणार. महानगरपालिकेचे 64 ते 65 वाहनांचे वार्षिक भाडे किती होते व तीन वर्षाचे किती होते.

**मा.उपायुक्त श्री.डांगे** : 8 लाख 25 हजार फक्त भाडे होते. 64 घंटागाड्या -12 हजार मासिक भाडे, 48 हजार मासिक भाडे कॉम्प्युटरचे आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे** : 25% इतर कशावर खर्च करणार ते सांगा. डिटेल सांगा. त्याचे भाडे इतके होते. 2.5 कोटी त्याचेकडून घेणे आहे.

**मा.उपायुक्त श्री.डांगे** : जे बिल आपण देतो. त्यातुन भाडे आपण वसुल करतो.

**मा.सौ.पल्लवी जाधव** : सूर्यनगर मध्ये ओढया जवळ अॅनिमल वेस्ट टाकतात त्यामुळे दुर्गंधी सूटते. अशा ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसवावेत.

**मा.सौ.शीला चव्हाण** : 133 अ इतर आपत्तीनुसार कोव्हीड काळातील नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन

अंतर्गत घरपट्टी माफी मिळावी तसा ठराव करावा व शासनाकडे पाठवावा.

**मा.श्री.शाम नळकांडे :** विषय मंजूर करावा. पाणी पुरवठा विभागासाठीचे पैसे द्या.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** विषय आयुक्तांसमोर मांडू.

**मा.महापौर मॅडम :** ऑफिस रिपोर्ट मंजूर. घनकचरा व्यवस्थापन विभाग व पाणी पुरवठा विभागासाठी प्राप्त अनुदानातून कामे करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. १५ वा वित्त आयोगाच्या प्राप्त निधीतुन घनकचरा व्यवस्थापन विभागाने कामे प्रस्तावीत केलेनुसार व पाणी पुरवठा विभागाकरीता प्राप्त निधीतुन सदर विभागाने प्रस्तावीत केलेनुसार युआयडीएसएसएमटी अंतर्गत अहमदनगर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा योजना फेज-2 करीता रक्कम रु.1,53,12,263/-, शहर पाणीपुरवठा योजनेसाठी अकुशल कामगार कंत्राटी स्वरुपात उपलब्ध करणे करीता रक्कम रु.50,00,000/- वापरणेस ही सभा मान्यता देत आहे.

सदरच्या प्रस्तावीत कामांकरीता 15 व्या वित्त आयोगातून खर्च करणेच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.शाम किसन नळकांडे,

अनुमोदक : मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०४ प्रस्ताव क्रमांक : २५ दिनांक:- २५/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** वैशिष्ट्यपुर्ण योजनेअंतर्गत (रु.10.00 कोटी) मंजुर विकास कामांबाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुरः**

**संदर्भ** : 1. मा.अवर सचिव, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. पुरक-2017/प्र.क्र.123(55) नवि-16 दि.31 आक्टोबर, 2017

2. इकडील जा.क्र.सा.बां. 5142 दि. 1.2.208 व जा.क्र.सा.बां. 5286 दि.17.02.2018

3. मा.शासन न्रिर्णय क्र. मनपा-2018/ प्र.क्र.141/नवि-16 दि.15 सप्टेबर, 2018

4. मा.कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग,अ.नगर यांचेकडील पत्र जा.क्र./लेखा/ निविदा/ 426/सन 2019 दि. 16.2.2019

5. मा.कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,अ.नगर यांचेकडील पत्र क्र.लेखा/अनामत/ 5581/ 2019 दि.06/07/2019

6. मा.प्रधान सचिव,(2) नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन, यांना मंजूर निधी वगळता अधिक्याची रक्कम मंजूर करणेबाबत इकडील पत्र क्र.सा.बां.1383 दि.03/09/2019 अन्वये दिलेले पत्र

7. शासन निर्णय क्रमांक - मनपा-2018/प्र.क्र.141/ नवि-16 दि.15 सप्टेबर,2018

8. मा.कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. अंशठेव कामे/ अहमदनगर महानगरपालिका/ 1747/सन 2022 दि.15/03/2022

शासनाच्या वॆशिष्ट्यपुर्ण योजनेअंतर्गत अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील विविध विकास कामे करणेसाठी रक्कम रु.10.00 कोटीचा निधी संदर्भिय पत्र क्र. 1 नुसार मंजुर करण्यात आला, त्यानुसार सविस्तर अंदाजपत्रके तयार करुन शासनाच्या सार्व.बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घेवुन सदरच्या प्रकल्प अहवाल शासनास निधी मागणीसाठी सादर करणेबाबत आदेशित केले होते. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेने सदरचा प्रकल्प अहवाल सार्वजनिक बांधकाम विभागाकडेस सादर केला होता, याकामी संदर्भिय पत्र क्र. 2 नुसार रु.10.00 कोटींच्या प्रस्तावित विकास कामांच्या तांत्रिक मान्यतेसाठी 1.25% प्रमाणे रक्कम धनादेश क्र. 836135 दि.14/2/2018 अन्वये जमा करण्यात आलेली आहे.

उक्त योजनेतील प्रस्तावित विकास कामांना सार्वजनिक बांधकाम विभागाने दिलेल्या तांत्रिक मान्यतेनुसार रक्कम रु.9,98,03,225/- खर्चाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अ.नगर यांचेमार्फत मा.शासनास सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास संदर्भिय पत्र क्र. 3 अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे. **सदर शासन निर्णयानुसार प्रकल्पाअंतर्गतच्या कामांसाठी कार्यान्वयन यंत्रणा म्हणुन सार्वजनिक बांधकाम विभाग, राहील. असे नमुद असल्या**मुळे पुढील सर्व कार्यवाही सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन झालेली आहे.

उक्त योजनेअंतर्गत मंजूर कामांसाठी एकुण रक्कम रु.9.74 कोटी इतके अनुदान शासनाकडुन वर्ग करण्यात आले. त्याअंतर्गत 47 विकास कामांची ई-निविदा प्रकिया राबवून सार्वजनिक बांधकाम विभागाने मे.ए.सी.कोठारी, अहमदनगर यांना कार्यारंभ आदेश दिलेले आहेत. सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | निविदा रक्कम (लाखात) | कामांची संख्या | निविदा रकमेपेक्षा मंजुर करण्यात आलेली टक्केवारी | चालू दरसूचीनुसार येणारी टक्केवारी | कार्यारंभ आदेश क्रमांक |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 249.93 | 13 | 21.80% जादा | 2.093% कमी | कार्यारंभ आदेश बी-1/ सीई-14/2018-19 दि.8/03/2019 |
| 2 | 379.85 | 14 | 13.86765% जादा | 0.11893% कमी | बी-1/ सीई-23/2018-19 दि.29/01/2019 |
| 3 | 398.22 | 20 | 15.58229% जादा | 0.13785% कमी | बी-1/ सीई-09/2018-19 दि.24/02/2020 |

मा.कार्यकारी अभियंता, यांनी संदर्भिय क्र.8 नुसार उक्त 3 निविदांची एकुण रक्कम रु.1028.00 लक्ष होत असून या 3 कामापोटीची GST रक्कम रु.123.36 लक्ष कंत्राटदारालाअ स्वतंत्र अदा करावे लागणार आहे. सदर कामे ठेव अंशदानातून हाती घेतलेली असल्याने सार्वजनिक बांधकाम नियमावलीच्या परिशिष्ट -7 नियम 5 नुसार अशा बांधकामावर 5% खर्चाची आकारणी केली जाते, ज्याची रक्कम रु.57.57 लक्ष इतकी होते. अशाप्रकारे मंजूर करण्यात आलेल्या निविदेतील सर्व कामे करण्य़ासाठी एकुण रु.1208.93 लक्ष इतक्या रकमेची आवश्यकता असल्याचे कळविले आहे. त्यामुळे मंजूर निधी वगळता रु.234.79 लक्ष इतक्या रकमेची अतिरिक्त निधीची आवश्यकता या विभागास भासणार आहे तसेच सदरहू कामे या विभागाकडुन ठेव अंशदानातून हाती घेतलेली कामे असल्यामुळे मंजूर निविदेत्भाववाढ कलमाचा अंतर्भाव केलेला नाही, त्यामुळे आपणासोबत मंगळवार दि.08.03.2022 रोजी झालेल्या चर्चेनुसार या विभागामार्फत करावयाची मात्र सस्यस्थितीत अपूर्ण असलेली कामे संबंधित ठेकेदार यांनी पूर्ण केल्यानंतर संबंधित ठेकेदार यांना भाववाढ कलम लागू करुन येणारी भाववाढ रक्कम रु.237.67 लक्ष अंदाजे आपलेस्तरावरुन स्वतंत्ररित्या ठेकेदारास अदा करावी लागेल. सर्व कामे पूर्ण करण्यासाठी रु.234.79 लक्ष इतका अतिरिक्त निधी या विभागाकडे उपलब्ध करुन द्यावा व आपले स्तरावरुन भववाढ रक्कम अदा करण्यासाठी आवश्यक निधी रक्कम रु.237.67 लक्ष इतकी तरतूद करावा व सद्यस्थितीत अपूर्ण असलेली सर्व कामे पूर्ण करण्यास 15 दिवसात निधी उपलब्ध करुन द्यावा अन्यथा या प्रकरणी विलंब झाल्यास भाववाढीची रक्कम सतत बदलत राहील असे नमूद केले आहे.

विषयांकित योजनेतील कामे करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग ही कार्यन्वयन यंत्रणा आहे. या विभागाने उपरोक्त निविदा जादा दराने मंजूर करताना अहमदनगर महानगरपालिकेची कोणतीही सहमती घेतलेली नाही, त्यामुळे अधिक्याची रक्कम मनपा देय रहात नाही. तसेच त्यांचे मंजूर निविदेमध्ये भाववाढ अंतर्भूत नाही. सबब भववाढ देणे संयुक्तीक नाही, परंतू सदर कामांसाठी शहर गावठाण भागामध्ये पाणी पुरवठा योजना, अमृत भुयारी गटर योजना या योजनांची कामे सुरु असल्याने सदर रस्त्यांची कामे करता आलेली नाहीत, तथापि सध्या सदर अमृत भुयारी गटर योजनेची कामे पूर्ण झालेली असूनही संबंधिताकडुन कामे प्रलंबित आहेत. लवकरच पावसाळ्यास सुरुवात होणार असल्याने व बाजारपेठेतील मुख्य रस्ते असल्याने खाली

नमूद केलेली कामे लवकरात लवकर तयार होणे अत्यंत आवश्यक आहेत. याबाबत मा.महापौर, यांचेकडेस दि.06/05/2022 रोजी सर्व संबंधितांची बैठक झाली. सदर बैठकीमध्ये उर्वरीत शिल्लक रकमेतून प्रामुख्याने खाली नमूद रस्ते करणेबाबत सुचित करण्यात आलेले आहे व तसे पत्र मा.महापौर, यांनी मा.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना पत्रसुध्दा दिलेले आहे.

1. रामचंद्र खुंट ते तेलीखुंट ते नेता सुभाष चौकपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे (दाळमंडई, झंवर ते तेलीखुंट पॉवर हाऊस, आडतेबाजार, काळूराम मंगलचंद कोठारी ते झंवर वगळून)
2. अहमदनगर वाचनालय ते चितळेरोड ते चौपाटी कारंजा ते दिल्लीगेट वेसपर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे
3. नगर वाचनालय ते भा,ज,पा. कार्यालय ते पटवर्धन चौकापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.
4. तख्ती दरवाजा ते घुमरे गल्ली ते समाचार प्रेस ते लक्ष्मी कारंजापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे
5. शहर सहकारी बँक, नवीपेठ ते लोढा हाईट्स , नेता सुभाष चौकापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.

अहमदनगर महानगरपालिकेने सदर योजनेतील कामे पूर्ण करण्यासाठी मंजूर निधीवगळता अधिक्याची रक्कम मंजूर करण्याबाबत संदर्भिय क्र. 6 नुसार मा.प्रधान सचिव (2) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना विनंती पत्र दिले होते, परंतू अद्यापपावेतो मंजूरी अप्राप्त आहे.

तरी उक्तबाबतचा प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी मा.महासभेपुढे ठेवणेस आदेशार्थ ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर सहाय्यक आयुक्त, यांचा अभिप्राय की, प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सा), यांचा अभिप्राय की, मुलेअ, मुलेप अभिप्राय

यावर मुख्यलेखाधिकारी, यांचा अभिप्राय की, प्रस्तावित बाबत आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक, यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ नुसार नमुद केलेनुसार सदरची बाब ही धोरणात्मक असल्याने मा.महासभा मंजूरीकरीता कार्यवाहीस्तव सादर.

यावर मा.उपायुक्त (सा), यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांनी प्रस्तावीत केल्यानूसार व मुलेप यांचे अभिप्रायानुसार अधिक्याची रक्कमेबाबत व इतर बदलांबाबत मा.महासभेपुढे निर्णयार्थ ठेवून मा.शासनाकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

चर्चा :

**मा.श्री.अनिल शिंदे :** 47 पैकी किती काम मंजूर झाली.

**शहरअभियंता श्री.इथापे :** कार्यान्वय यंत्रणा पीडब्ल्युडी कडे असल्याने त्यांना बैठकीस उपस्थित राहणे बाबत पत्र दिले ते किती कामे झाले हे सांगू शकतील. उपनगरात काम पूर्ण झाले शहर गावठाण भागातील राहीले.

**मा.श्री.अनिल शिंदे :** आज जे काम प्रलंबित आहे त्या पिरीयड मध्ये का केले नाही. 60 लाख दिल्यावर तो काम करणार का.

**शहरअभियंता श्री.इथापे :** टी.एस घेवून शासनाकडे प्रस्ताव सादर केला. शासनाने कार्यान्वय यंत्रणा पीडब्ल्यूडीकडे दिली आहे. त्यांनी 3 टेंडर केले, टेंडर जादा दराने मंजूर केले

महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेतली नाही. जीएसटी 12% व चार्जेस असे 204.79 लक्ष जास्त त्यांना द्यावेत. या पत्राला 3-9-2019 ला शासनाला कळविले. त्यांचे टेंडर मध्ये भाव वाढीचा कॉलम हवा होता तो नाही. त्यामुळे आज भाव वाढ महानगरपालिका देवू शकत नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे** : त्याच पिरीयड मध्ये कामे का करुन घेतली नाही. महानगरपालिकेच्या तिजोरीतून 20 लाख त्या ठेकेदाराला द्यायचे असा प्रस्ताव आला आहे.

**शहर अभियंता श्री.इथापे** : वर्क ऑर्डर 2019 ला दिली. मध्यंतरी कोव्हीड कालावधी गेला. जानेवारी 2022 पासून पाठपुरावा केला. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केलेल्या कामाची रक्कम वजा जाता उरलेल्या रक्कमेतून 5 रस्ते पावसाळयापूर्वी करायचे ठरले. असे पत्र महापौरांनी बांधकाम विभागाला दिले. काम बदलले नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे** : हे पैसे 47 कामावर लागले पाहीजे. उर्वरीत कामाचे काय होणार यावर कोणी तक्रार केली तर काय करणार. 60 लाख दिले तर 5 रस्ते पुर्ण होणार.

**शहर अभियंता श्री.इथापे** : वाढीव पैसे द्यावे. असे आमचे म्हणणे नाही सभागृहासमोर वस्तुस्थिती आणली आहे. टेंडर क्लॉजमध्ये तशी तरतुद नाही. वाढीव रक्कम देता येणार नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे** : किती दिवसात 5 रस्ते होतील. कार्यकारी अभियंता, आयुक्त साहेब, यांनी बसून चर्चा करावी. आम्ही पैसे खर्च करायला तयार आहोत पण रस्ते केंव्हा होणार ते सांगा. 60 लाख वर्ग करुन किती दिवसात काम करुन देणार ते सभागृहास सांगा. महापौर यांनी जे पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले ते वाचून दाखविले.

**शहरअभियंता श्री.इथापे** : 60 लाख रक्कम नाही रक्कम खुप मोठी आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे** : 4 कोटी 72 लाखांचा प्रस्ताव तयार केला आहे.

**शहरअभियंता श्री.इथापे** : 237.67 + 234.79 = 4 कोटी 65 लाखाच्या आसपास रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविल्यानुसार 47 रस्त्यांसाठी घ्यावे लागतील.

**मा.श्री.अनिल शिंदे** : एवढे पैसे वर्ग केले का.

**शहरअभियंता श्री.इथापे** : सार्वजनिक बांधकाम विभाग पैसे मागतो. आम्ही द्यावे असे कुठेही म्हटलेले नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले** : 5 रस्त्यांसाठी किती द्यावे लागतील.

**शहरअभियंता श्री.इथापे** : शिल्लक 5 कोटी रुपयातुन होवू शकतील. भाववाढ देण्याची तरतुद कोठेही नाही. उरलेल्या रक्कमेतुन सर्व रस्ते होवू शकणार नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले** : 5 रस्ते करुन घेवू.

**मा.श्री.अनिल शिंदे :** डांबराची भाववाढ रक्कम दिल्यानंतर काम किती दिवसात पूर्ण करणार ते सांगा. उद्या पैसे वर्ग करुन टाका. 15 व्या वित्त आयोगातून घ्या. ठेकेदार एस्टीमेट रेटमध्ये करायला तयार नाही.

**शहरअभियंता श्री.इथापे :** आम्ही गेल्या दोन वर्षापासुन पाठपुरावा करत आहोत.

**मा.श्री.अनिल शिंदे :** डांबराचे भाववाढ झाल्याने तो ठेकेदार काम करायला तयार नाही.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** 5 कोटीत चार रस्ते होत असतील तर तेवढे करा.

**मा.श्री.सचिन शिंदे :** सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनियर बैठकीला का आले नाहीत.

**शहरअभियंता श्री.इथापे :** आपण भाववाढ कोणत्या अधिकारात देणार हा प्रश्न आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** सभागृह सर्वोच्च आहे.

**मा.श्री.सचिन शिंदे :** दोनच रस्ते करा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** आपण संयुक्त मिटींग घेवू. अजेंडयावर विषय घेवू. प्रोसिडींग घेवू.

**मा.श्री.अनिल शिंदे :** काही स्कीमचे पैसे शासनाने परत घेतलेले आहेत. याचेही असे होवू नये.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** पुढचा विषय घ्या.

**.श्री.मनोज कोतकर :** सिस्टरांचा विषय घ्या.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** मा.आयुक्त यांनी एलईडी कंपनीला 80 % वीज बिल बचत बाबत नोटीस दिली. नोटीसीला त्यांनी थातुर मातुर उत्तर दिले. वायर वगैरे घ्यावे लागते. नियम अटी शर्तीचा त्याने भंग केला पर डे 1 लाख दंड करणार होतो. त्याबाबत विभाग प्रमुख यांनी माहिती द्यावी. वीज बचत होत नसेल तर संस्थेला दंड करावा. काही ठिकाणी चिमणी सारखा प्रकाश पडतो. विभाग प्रमुखांनी माहिती द्यावी. मुदत संपली. मुदतवाढ दिलेली नाही.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.वैभव जोशी :** एलईडी निविदा धारकां बाबत सविस्तर अहवाल सादर केला आहे. कारवाईचा प्रस्ताव दिला होता. निविदा धारका सोबत 2-3 मिटींग घेवून कामात सुधारणा करण्यांबाबत सूचना देण्यांत आलेल्या आहेत. बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार 5 डिसेंबर 2022 पर्यंत पुर्तता करणे बाबत कंपनीला सूचना देण्यांत आलेल्या आहेत.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** त्यानतर दंड वगैरे करणार का. आयुक्तांनी लक्ष द्यावे पुढच्या सभेत माहिती द्यावी.

**मा. महापौर मॅडम**: विषय मंजुर.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट व महासभेत झालेल्या चर्चेनुसार शहरातील मध्यभागातील रस्ते अत्यंत खराब झालेले आहे. रस्त्यांची दुरावस्था झालेली आहे. मध्यवस्तीत या भागात बाजारपेठ असल्याने या रस्त्यांवरुन मोठ्या प्रमाणात वर्दळ आहे. मध्यभागातील रस्त्यांचे काम झाल्यास नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद रस्ते

1. रामचंद्र खुंट ते तेलीखुंट ते नेता सुभाष चौकपर्यंत रस्ता डांबरीकरण करणे (दाळमंडई, झंवर ते तेलीखुंट पॉवर हाऊस, आडतेबाजार, काळूराम मंगलचंद कोठारी ते झंवर वगळून)
2. अहमदनगर वाचनालय ते चितळेरोड ते चौपाटी कारंजा ते दिल्लीगेट वेसपर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे
3. नगर वाचनालय ते भा,ज,पा. कार्यालय ते पटवर्धन चौकापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.
4. तख्ती दरवाजा ते घुमरे गल्ली ते समाचार प्रेस ते लक्ष्मी कारंजापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे
5. शहर सहकारी बँक, नवीपेठ ते लोढा हाईट्स , नेता सुभाष चौकापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे.

ह्या रस्त्यांचे काम तातडीने पुर्ण करावेत या करिता च्या आवश्यक भाववाढीचा प्रस्तावाचे विभागामार्फत परिगणना करण्यात येऊन ही कामे पुर्ण झाल्यानंतर आपल्याकडे स्वतंत्ररित्या सादर करण्यात येईल .असे सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर यांनी कळविलेनुसार प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. रक्कम महानगरपालिका हिस्सा पोटी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच प्रशासनाने उर्वरीत कामांसाठी निधी मागणी कामी मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणे बाबत कार्यवाही करावी.

प्रशासनाने सदरचे रस्त्यांचे काम संबंधीत विभागाकडुन करुन घेणेबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.सचिंन चंद्रशेखर शिंदे

अनुमोदक : मा.सौ. सुरेखा संभाजी कदम.

ठराव सर्वानुमते मंजूर.

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०४** **प्रस्ताव क्रमांक : २६** **दिनांक:- २५/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** ७० व्या वरिष्ठ गट पुरुष / महिला राज्य अजिंक्यपद स्पर्धेस निधी मिळणेबाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ :

1. अहमदनगर जिल्हा: हौशी कबड्डी संघटना, सलग्न महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन यांचे दि.27/10/2022 रोजीचे पत्र.
2. नगरसेवक मा. श्री. योगीराज शशिकांत गाडे यांचे दि. 4/11/2022 रोजीचे पत्र.
3. नगरसेवक मा. श्री.ध्यानेश्वर शिवाजी येवेले यांचे दि. 4/11/2022 रोजीचे पत्र.
4. नगरसेविका मा. सौ. सुवर्णा दत्ता जाधव यांचे दि. 4/11/2022 रोजीचे पत्र.
5. नगरसेविका मा. श्रीमती सुनिता संजय कोतकर यांचे दि. 4/11/2022 रोजीचे पत्र.
6. नगरसेविका मा. श्रीमती मंगल सुनिल लोखंडे यांचे दि. 4/11/2022 रोजीचे पत्र.

वरिल विषयांन्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, वरिल मान्यवरांनी तसेच अहमदनगर जिल्हा हॉशी कबड्डी संघटना यांनी मा. महापॉर साहेब व मा. आयुक्त साहेब यांना पत्र देऊन अहमदनगर शहरामध्ये 70 वी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद व निवडचाचणी कबड्डी स्पर्धा वरिष्ठ गट पुरुष / महिला ही स्पर्धा 27 ते 30 डिसेंबर 2022 या कालावधीमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्राच्या 25 जिल्ह्याचे पुरुष व महिला संघ निवडला जाणार आहे.सध्या प्रो. कबड्डीत सहभागी असणारे राष्ट्रीय स्पर्धा गाजवणारे अनेक खेळाडू या स्पर्धेमध्ये खेळणार आहेत. या स्पर्धेसाठी मॅटची 6 मैदाने, प्रेक्षक गॅलरी, भव्य असे स्टेज तसेच सामने संध्याकाळच्या सत्रात असल्यामुळे लाईट व्यवस्था या सर्व सुविधा उच्च दर्जाच्या पुरविणे आवश्यक आहे.

सदर स्पर्धेसाठी 600 खेळाडु, 100 संघ व्यवस्थापक /कोच, 200 पंच/ पदाधिकारी/ अधिकारी व 100 इतर स्वयंसेवक असे 1000 जण 4 दिवस उपस्थीत असणार आहेत. या सर्वाची निवास/भोजन/प्रवास यांची व्यवस्था सुध्दा आयोजक संस्थेला करावयाची आहे. हे सर्व करत असताना खर्चही मोठा होणार आहे. संयोजक संस्था त्यासाठी प्रयत्नशील आहेत.

स्पर्धेसाठी लागणारा खर्च खेळाडु व्यवस्था, मार्गदर्शक पंच, कर्मचारी व इतर यांचे भोजन, निवास व्यवस्था,प्रेक्षक गॅलरी, प्रकाश योजना साउंड सिस्टीम, कमानी, बॅरिकेट्स, शामियाना, व्हीआयपी झोन, स्पर्धेसाठी कामासाठी स्वयंसेवकाचे मानधन, पंच पदाधिकारी यांचे मानधन, क्रीडांगन बनविणॆ, सन्मानचिन्ह ट्रॉफी, वाहतुक व्यवस्था, सांदिल खर्च, स्पर्धा उद्घाटन समारोप, खेळाडुंना उत्तेजनार्थ बक्षिसे, प्रसिद्धी, स्क्रीन, प्रक्षेपण व इतर खर्च अंदाजे रक्कम रुपये 75,09,000/- इतका येणार असल्याबाबत त्यांनी इकडॆस कळविले आहे. महानगरपालिकेकडून रक्कम रुपये पाच लाख आर्थिक मदत मिळणेबाबत आयोजकांनी मागणी केलेली आहे. आयोजकांनी आपले रजिस्ट्रेशन, तीन वर्षाचा सी.ए. चा ऑडीट रिपोर्ट, पॅनकार्ड नं. AAGTA7689F तसेच महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन जा.क्र.150/2022-23 दि.14/09/2022 रोजीचे आयोजनास मान्यतेचे पत्र जोडले आहे.

एवढी मोठी स्पर्धा अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये होणे हे अभिमानास्पद बाब असून शहराच्या नांव लौकीकात भर पडेल.

मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 चे कलम 66 (11) महानगरपालिकेस स्वेच्छा निर्णयानुसार तरतूद करता येतील अशा बाबीमधील क्रमांक 11 प्रदर्शने, व्यायामाचे किंवा अन्य खेळाचे सामने भरविणे बाबत असणा-या तरतूद अंतर्गत महानगरपालिकेच्या 2022-2023 च्या अंदाजपत्रकामध्ये महापौर चषक स्पर्धा या लेखाशिर्षाखालील रक्कम रुपये 20 लाख तरतूद करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार प्रतिवर्षी मा.मनपा पदाधिकारी व प्रशासकीय स्तरावर ठरविण्यांत आलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार विविध खेळाचे स्पर्धा भरविण्यांत येत असतात. एवढा मोठया प्रमाणात खर्च महानगरपालिकेला करणे शक्य नसल्याने प्रायोजिक तत्वावर स्विकारुन तसेच विषयांकित स्पर्धा अहमदनगर महानगरपालिकेच्या सहकार्याने भरविण्यास अहमदनगर जिल्हा हौशी कबड्डी संघटनेला प्रायोगिक तत्वावर अहमदनगर महानगरपालिकेचे नांव, मोनोग्राम मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, पदाधिकारी यांचे नांवे अशा अटीसह आयोजन करण्याबाबत बंधनकारक राहील.

तरी अहमदनगर महानगरपालिके मार्फत किती निधी उपलब्ध करुन द्यावयाचा हा धोरणात्मक निर्णय असून याबाबत मा.महासभेने निर्णय घेणे उचित होईल. तरी आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, अ मान्यतेस्तव

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, सदर प्रस्तावातील अ नुसार अ.नगर मनपामार्फत किती निधी उपलब्ध करुन द्यावयाचा हा धोरणात्मक निर्णय असल्याने

मा.महासभेने निर्णय घेणे उचित होईल.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, यापूर्वी मनपाने कोणकोणत्या खेळांना संस्थांना निधी वितरीत करण्यांत आला आहे ? निधी वितरणाचे निकषासह फेरसादर करावे.

यावर क्रीडा विभागाकडून फेरसादर रिपोर्ट की, यापुर्वी मनपाने (1) अहमदनगर महानगरपालिकेने व राणी लक्ष्मीबाई कला,क्रीडा सांस्कृतिक उद्देशीय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने 17 वी महिला राज्य अजिंक्य मुलींची स्पर्धा 14.15 एकुण 10,000/- (2) अहमदनगर जिल्हा हॉकी असोसिएशन अहमदनगर, राज्य स्तरीय हॉकी स्पर्धा भरविणे कामी अर्थसहाय्य 2015-2016 एकुण 500000/- (3) अहमदनगर जिल्हा क्रीकेट असोसिएशन लेदर बॉल क्रीकेट स्पर्धा Day / Night 2015-2016 रु.500000/- (4) अहमदनगर जिल्हा आयोजित शासकीय राष्ट्रीय शालेय बॅडमिंटन क्रीडा स्पर्धा सहाय्य 2019-2020 रु. 500000/- (65 National Badmition game 2019-2020) (5) राज्य स्तरीय महापौर चषक सायकल स्पर्धा आयोजित दिनांक 19-2-2022 रु.5,47,550/-

या स्पर्धेसाठी मा.महासभेचा ठराव घेवून अर्थसहाय्य देण्यांत आले आहे.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, प्रस्तावित बाबत रु. 5 लक्षच्या मर्यादेत आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणेस हरकत नसावी. सबब मा.महासभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सादर.

---*---

चर्चा :

**मा.श्री.अनिल शिंदे** : पैसे किती द्यावे

**मा.महापौर मॅडम** : 3 लाख देतो.

**मा.श्री.अनिल शिंदे** : रक्कम रु.5 लाख द्यायला हरकत नाही.

**मा.श्री.गणेश कवडे** : नगर शहरात क्रीडा पटू अनेक स्पर्धा आयोजित करतात. महापौर केसरी स्पर्धा आयोजित करावी लागणार आहे. सभागृहाने तीन लाख मंजूर केले तरी चालेल. इतर खेळही महत्वाचे आहेत.

**मा.महापौर मॅडम** :महापौर मॅडम कडुन रुलिंग देण्यात आले. चार लाख देण्यांत यावेत.

**मा.श्री.शाम नळकांडे** : पंकज शिरसाठने तीन वेळेला भारताचे प्रतिनिधीत्व केले. कबड्डी स्पर्धेला चार लाख द्यावेत.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट व महासभेत झालेल्या चर्चेनुसार अहमदनगर जिल्हा हौशी कबड्डी संघानी आयोजित 70 व्या वरिष्ठ गट पुरुष / महिला राज्य अजिंक्यपद स्पर्धेस रक्कम रुपये 4 लाख अर्थ सहाय्य देणेस ही सभा मान्यता देत आहे.सदर स्पर्धेसाठी महानगरपालिका प्रायोजक असलेबाबत उल्लेख करावा. तसेच आवश्यक ते कार्यालयीन सोपस्कार पार पाडणेबाबत संबंधित विभागाने याबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.गणेश खंडेराव कवडे,

अनुमोदक : मा.श्री.शाम किसन नळकांडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०४ प्रस्ताव क्रमांक : २७ दिनांक:- २५/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** सावेडी भागात दफनभुमी / स्मशानभुमी उपलब्ध करुन देणेच्या अनुषंगाने जमिनीचे भुसंपादन करणेबाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

संदर्भ : 1) मा.श्री. संपत विजय बारस्कर, नगरसेवक, तथा विरोधीपक्ष नेता यांची दिनांक 01/04/2022 रोजीची यादी.

2) मा. महापौर, सौ. रोहिणी संजय शेंडगे, अहमदनगर महानगरपालिका यांनी उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने दिनांक 07/04/2022 रोजी घेतलेली बैठक व इतिवृत्त.

उपरोक्त विषयात नमुद केलेल्या विकसित उपनगरासाठी अनिवार्य असलेल्या दफनभुमी / स्मशानभुमी अशा मुलभुत सुविधेची कमतरता आहे. ही वस्तुस्थीती आहे. या कमतरतेमुळे या परिसरातील नागरीकांमध्ये मोठी अस्वस्थतता आहे. विशेषंत: ख्रिश्चन बांधवामध्ये या बाबत मोठा आक्रोश आहे. या बाबतीत या समाजाकडुन वेळोवेळी मोर्चे काढुन निवेदने देवुन नाराजी व्यक्त केली जात आहे.

उपरोक्त संदर्भित सन्माननीय मा. महापौर व सदस्याकडुन देखील अशा सुविधा पुरविणे बाबत सातत्याने पाठपुरावा होत आहे.

उपरोक्त परिस्थीती विचारात घेवुन या कामाची निकड आणि गांभिर्य विचारात घेवुन मा. महापौर महोदयांनी या संदर्भात दिनांक 07/04/2022 रोजी बैठक घेतली. (बैठकीचे इतीवृत्त निशाणी "अ") या बैठकीत मा. महापौर महोदयांनी या बाबत विषयाकिंत प्रश्नाबाबत विकास योजनेचा अभ्यास करुन आरक्षणे शोधणे व त्या तात्काळ संपादन करणे बाबत कार्यवाही करणे" त्यास विलंब होणार असल्यास ख्रिश्चन समाजाच्या दृष्टीने सोयीस्कर अशा इतर जागांचा शोध घेणे आणि अशा जागा मिळु शकतील काय? याचा शोध घेणे बाबत सुचना केल्या व ही कार्यवाही कालबध्द मुदतीत पुर्ण करण्याच्या सुचना दिल्या.

**नगररचना विभागाने या बाबत खालील प्रमाणे अभ्यास/कार्यवाही केलेली आहे.**

अ) दफनभुमी' या सुविधेची कमतरता ख्रिश्चन बांधवांना प्रकर्षाने जाणवत आहे.

ब) रोमन कॅथलिक आणि प्रोटेस्टंट या ख्रिश्चिन धर्माच्या दोन पंथापैकी रोमन कॅथलिक पंथीय नागरीकांसाठी ही दफन भुमीची समस्या अधिक गंभिर आहे.

क) नगर शहरातील उत्तरेकडील भागातील ख्रिश्चन नागरीकांचा विचार करता या नागरीकांकरिता प्रोटेस्टंट पंथियांसाठी सिधार्थनगर व बु-हाणनगर (महानगरपालिका हद्दी बाहेर) येथे: तर रोमन कॅथॉलिक पंथासाठी बु-हाणनगर (हद्दीबाहेर) येथे ही व्यवस्था उपलबध आहे. तथापि नागापुर, बोल्हेगांव , सावेडी इत्यादी परिसरायील नागरीकांसाठी ही व्यवस्था गैरसोयीची आणि अपुरी आहे.

ड) वरीप्रमाणे जागेवरील प्रत्यक्ष परिस्थीतीची माहिती घेतल्यानंतर मंजुर विकास योजनेतील या स्वरुपाच्या आरक्षणांची माहिती घेण्यात आली. नागापुर, बोल्हेगांव, सावेडी या उपनगरांचा एकत्रीत विचार करता आरक्षण क्र. 58 दफनभुमी व आरक्षण क्र. 59 स्मशानभुमी ही आरक्षणे सर्वात सोयीस्कर आढळुन आली. सध्या या जागेस विद्यमान रस्ता उपलब्ध नसल्याने लगतच्या रस्त्यासह ही आरक्षणे संपादन करणे योग्य होईल असे लक्षात आल्यानंतर या आरक्षणाखालील जमिनींच्या मालकांना ही जमिन हस्तंतरणीय विकासहक्क (T.D.R.) देण्याच्या मोबदल्यात हस्तांतरण करण्याची विनंती करण्यात आली. तथापि या आरक्षणालगत या जमिनी मालकांची वस्ती असल्यामुळे व इतरही कारणांमुळे त्यांनी सदर जमिन देण्यास तिव्र विरोध केला आहे. त्यामुळे सदर जमिनीचे अनिवार्य भुसंपादन (Compulsory Land Acquisition ) करणे आवश्यक राहिल. तथापि या प्रक्रियेस देखील मोठा कालावाधी लागणार आहे. ही बाब स्पष्ट आहे.

इ) उपरोक्त परिस्थीती स्पष्ट झाल्यानंत मा. महापौर यांनी दिलेल्या सुचनेनुसार इतरही जागांचा शोध घेण्यात आला. ज्या जागा अनारक्षित आहेत. तथापि प्रस्तुत प्रस्तावाच्या दृष्टीकोणातुन योग्य आहेत. अशा जागांबाबत ख्रिश्चन समुदायांच्या धुरिणींशी देखील चर्चा करण्यात आली.

फ) डॉन बास्को सोसायटी व परिसरामध्ये ख्रिश्चन बांधवांची वस्ती मोठ्या प्रमाणामध्ये आहे. तसेच या ठिकाणी रोमन कंथिलिक समाजाचे चर्च देखील आहे. या वस्तीजवळ आणि डॉन बास्को शाळेच्या पश्चिमेस स.नं. 261/अ/1 ( जुना स.नं 233/अ (भाग) ही सुमारे चार एकर जागा सर्वार्थाने दफनभुमीसाठी योग्य असल्याबाबत सर्वांचे एकमत झाले. या बाबत मा. महापौर यांना माहिती दिल्यानंतर त्यांनी संबधित जागा मालकास सदर जागा महानगरपालिकेस देणे बाबत विनंती केली (निशाणी ब ) आणि संबधित जमिन मालकाने देखील सदर जागा काही अटीसह महानगरपालिकेस देण्याची तयारी दर्शविलेली आहे.

**<u>वरील परिस्थिती महानगरपालिकेकडेस काय पर्याय उपलब्ध आहेत ?</u>**

अ) आरक्षण क्र. 58 दफनभुमी व आरक्षक्र. क्र. 59 स्मशानभुमी या जागा अनिवार्य भुसंपादन करणे, तथापि यासाठी मोठा कालावधी लागणार आहे. तसेच संबधित जमिन मालकांचा मोठा विरोध पत्करावा लागणार आहे. तसेच प्रस्तावित जागा प्रस्तावित विकास योजना रस्त्यासह संपादित करावी लागेल.

ब) स.नं. 261/अ/1 ही जाग रहिवास विभागात समाविष्ट असुन उत्तर व पश्चिम बाजुने सदर जागेस अनुक्रमे 12.00 मी. रुंद व 15.00 मी. रुंद विद्यमान विकास योजना रस्ते उपलब्ध आहेत. जागेवर दक्षिणेस व पुर्वेस ओढा असुन जागेत विहिर सुध्दा आहे. ही जागा डॉन बास्को सोसायटीपासुन जवळ व ख्रिश्चन बांधवांनसाठी सोयीस्कर व उपयुक्त आहे. तथापि ही जागा अनारिक्षित असल्याने ही जागा बिगरविकास योजना प्रस्ताव ( Non D.P. Proposal ) गृहीत धरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमांतर्गत संपादित करावी लागेत.

**<u>नगररचना विभागाचे अभिप्राय</u>**

**<u>अ) विकास योजना प्रस्ताव</u>**

i) वर नमुद केल्याप्रमाणे सदर परीसरात आरक्षण क्र. 58 दफ़नभुमी व आरक्षण क्र 59 स्मशानभुमी ही आरक्षणे मंजुर विकास योजना अहमदनगर ( वाढिव क्षेत्र ) मध्ये प्रस्तावित आहे,तथापी सद्य स्थितीत या आरक्षणाखालील जागेस विद्यमान रस्ता उपल्बध नाही. आणि या आरक्षणा लगतच संबधित जमिन मालकाची वस्ती आहे.

ii) उपरोक्त स.नं 261/अ/1 ही जमिन मंजुर विकास योजना ( वाढीव क्षेत्र ) अहमदनगर यामध्ये रहीवास विभागात अंतर्भुत असुन सदर जागेस 12.00 मी व 15.00 मी. रुंद रस्ते पोहोच मार्ग म्हणुन उपल्बध आहेत.

उपरोक्त जागा निळ्या पुर रेषेने (Blue Flood Line) काहीशी बाधित होते तथापि असे असले तरीही त्यामुळे या जागेस विकास योजनेच्या दृष्टीकोनातुन ही जागा रहिवास विभागात अंतर्भुत असल्याने त्या जागेस रहीवास विकसन क्षमता प्राप्त आहे.

iii) मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र 58 दफनभुमी व आरक्षण क्र 59 स्मशांभुमी या हेतु करीता प्रस्तावित केलेल्या आरक्षित जागेपासुन वर नमुद केलेली सावेडी स.नं 261/अ/1 ही जागा जवळच आहे.

**<u>ब) स्थळ निरिक्षण अहवाल</u>**

उपरोक्त नमुद दोन्ही जागांची व परीसराची मा. महापौर, मा आयुक्त, संबधित प्रभागातील सन्मानिय नगरसेवक श्री. संपत बारस्कर आदींसह पहाणी करण्यात आलेली आहे. या स्थळ निरिक्षणात खालील बाबी आढळुन आलेल्या आहेत.

i) मंजुर आरक्षणाखालील जमिनीवर सध्या शेती करण्यात येत असुन लगतच संबधित जमिन मालकांची मोठी वस्ती असुन त्यास शेरवस्ती असे संबोधले जाते. सदर आरक्षित जमिनीस सध्या पोहोच मार्ग उपलब्ध नाही.

ii) सावेडी स.नं 261/अ/1 या जमिनीवर सध्या शेती करण्यात येत आहे. या जमिनीच्या पुर्वेस बिनशेती विकास झालेला असुन या जमिनी लगत पुर्वेस व दक्षिणेस ओढा आहे. या जागेस उत्तरेकडुन 12.00 मी रुंद तर पश्चिमेकडुन 15.00 मी रुंद विद्यमान विकास योजना रस्ते उपलव्ध आहेत.

iii) या जागेलगत पुर्व दक्षिण भागात रोमन कँथलिक पंथियांचे चर्च आणि डाँन बास्को स्कुल आहे. आणि याच भागात या पंथाच्या ख्रिश्चन बांधवांची मोठी वसाहत आहे.

iv) या जागेच्या दक्षिण-पश्चिम (South-West) भागात काही शेत जमिन असुन पुढे सिना नदी व ओढा आहे.

v) वरील प्रमाणे परीस्थिती असल्याने ही जागा जरी रहीवास विभागात असली तरीही अलग/वेगळी (Isolated) आहे. त्यामुळेच ती ' दफनभुमी ' (Burial Ground ) या वापरासाठी योग्य आहे.

**<u>क) नगररचना विभागाची शिफारस</u>**

1) सावेडी स.नं 261/अ/1( जुना स.नं 233/अ/(भाग) ) ही जागा ' दफनभुमी' (Burial Ground) या हेतुसाठी सर्व दृष्टीकोनातुन योग्य असल्याने या जागेपैकी 12.00 मी पुर्व-पश्चिम रस्त्याच्या दक्षिणेकडील भाग 'दफनभुमी' या कारणासाठी आरक्षण क्र 58अ द्वारे राखीव ठेवणे योग्य होईल. तसेच या जागेचे जमिन मालक यांनी त्यांची संपुर्ण जागा संपादन करण्याची अट घातली असल्याने उर्वरीत उत्तरेकडील जागा आरक्षण क्र 58 ब द्वारे महानगरपालिकेच्या उपयोगासाठी (Municipal Purpose) राखीव ठेवणे योग्य होईल.

2) उपरोक्त प्रमाणे दफनभुमी ही सुविधा उपलब्ध झाल्यानंतर मंजुर विकास योजनेतील आरक्षण क्र 58 दफनभुमी या आरक्षणांची आवश्यकता रहाणार नाही. तथापि या बाबत यथावकाश निर्णय घेणे योग्य होईल.

उपरोक्त सर्व कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम 1966 च्या कलम 37 प्रमाणे करावयाची असल्याने उपरोक्त प्रमाणे फेरबदलास कलम 37(1) अन्वये मा. महासभेची प्रारंभिक मंजुरी घेणे आवश्यक आहे.

3) सावेडी स.नं 261/अ/1 या जागेवर दफनभुमी व महानगरपालिकेच्या उपयोगासाठी अशी दोन आरक्षणे कलम 37 अन्वये प्रस्तावित करावयाची आहेत. व त्यानंतर कालांतराने यथावकाश या आरक्षणाखालील जमिनी भुसंपादनाच्या माध्यमातुन महानगरपालिकेच्या

ताब्यात येतील. परंतु त्यास मोठा कालावधी लागणार आहे. आणि या परीसरातील ख्रिश्चन समाजाची तातडीची निकड विचारात घेता ही जागा तातडीने संपादन करुन ताब्यात घेणे आवश्यक आहे.या करीत खालील प्रमाणे कार्यवाही करता येईल असे मत आहे.

अ) या बाबतचा कलम 37(1) अन्वयेचा फेरबदलाचा प्रस्ताव योग्य ती कार्यवाही करुन शासनास मंजुरीसाठी पाठविणे.

ब) सदरचे भुसंपादन हे दफनभुमी व तदनुषंगिक वापरासाठी होणार आहे. व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 63(11) मधील तरतुदीनुसार दफनभुमीची व्यवस्था करुन देणे हे महानगरपालिकेचे अनिवार्य कर्तव्य आहे. व त्यासाठी भुसंपादन देखील करता येईल.त्यामुळे कलम 37 च्या फेरबदलास शासनाची मंजुरी मिळेपर्यंत मध्यंतरीच्या काळात सदर जागा बिगर विकास योजना प्रस्ताव (Non Development Plan Proposal) करुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील 76 व 77 मधील तरतुदीनुसार संपादन करण्याची प्रक्रिया सुरु करता येईल. या कार्यवाहीसाठीही मा. महासभेची मंजुरी आवश्यक आहे.

क) सदर संपादीत करण्यात येणा-या जागेची शासनाच्या बाजार मुल्य दर तक्त्याप्रमाणे रक्कम काढुन या जमिनीचा मोबदला भुसंपादन कायद्यातील तरतुदीप्रमाणे देणे आवश्यक राहील. त्यामुळे या जागेची मोबदला रक्कम सर्वसाधारणपणे दुप्पट होईल. त्यासही मंजुरी घेणे आवश्यक राहील.

वरील सर्व मुद्यांचा सांगोपांग विचार करुन उपरोक्त सर्व बाबींचा निर्णय मा. महासभेने घेणे आवश्यक आहे. सबब उपरोक्त विषयांकित निर्ण्य धोरणात्मक असल्याने सदरचा विषय मा. महासभेपुढे मंजुरीसाठी सादर करणे योग्य होईल. तथापि आदेशार्थ सादर.

सोबत संदर्भित पत्रे, मा. महापौर यांच्या बैठकीचे इतिवृत व इतर सर्व कागदपत्रे असणारी धारिका, प्रस्तावित जागा व त्यावरील प्रस्ताव दर्शविणारा नकाशा, प्रस्तावित फेरबद्दल दर्शविणारा विकास योजनेचा भाग नकाशा, गुगल मॅप, मोजणी नकाशा, 7/12 उतारा इ. कागदपत्रे सादर करीत आहे.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की,कृ.चर्चा करा.

मा.आयुक्त साहेब यांचेबरोबर दिनांक 02-11-2022 रोजी चर्चा केली. (स.स.नं.2) यांचेशी खालील मुद्याबाबत सविस्तर खुलासा आवश्यक सादर करावा. खालील प्रमाणे

1) Complilsory land reqisition करणे आरक्षण क्रमांक 58959 साठी का प्रस्तावित करणेत येत नाही ?

2) पोहोच मार्गासाठी संपादनाची प्रक्रीया राबविण्यास अडचण काय आहे ? उपाय योजना काय?

3) विकास योजनेत आरक्षण नमुद असतांना नविन जागा संपादीत/खरेदीची निकड काय ?

4) विषयांकित जागा प्रस्तावित आरक्षण क्रमांक 58 अ व विकास योजनेतील आरक्षण संपादन या साठी अपेक्षीत मुल्यांकन काय आहे ?

5) जागा मालकीचे पुरावे अद्यावत आहेत काय खात्री करावी.

6) सदरच्या संपादनाचा / खरेदीची प्रक्रीया साठी विहित कायदा व पध्दतीची स्पष्टीकरण करावे.

7) प्रस्तावित बाबत अपेक्षीत खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष व तरतुद याचे विवेचन दिसुन येत नाही. ते स्पष्ट करावे.

8) मनपाकडे MRTP ACT 1966 127,128 व नुसार प्रकरण प्रलंबित आहेत काय? त्या अनुषंगाने काय प्रस्तावीत आहे व काय उपाययोजना करणेत आलेली आहे. याचे विवेचन करावे.

9) अस्तीत्वात असलेली आरक्षणांची स्थिती नविन प्रस्तावित संपादन / खरेदी अनुसरुन बाधीत होणार कि कसे ?

उपरोक्त विषयाबाबत दिनांक 02-11-2022 रोजी दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने फेर अहवाल सादर करीत आहे.

1) या विषयाबाबत सन्माननीय नगरसेवकांनी दिलेल्या याद्या (पत्रे) व मा.महापौर अहमदनगर महानगरपालिका यांच्या अध्यक्षतेंखाली दिनांक 25-04-2022 रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्ताचे फेर अवलोकन करणेस विनंती आहे. विषयांकित मुलभूत सुविधा पुरविण्याची आवश्यकता व तातडी विचारात घेवून उपलब्ध पर्यायांचा उहापोह या विभागाच्या दिनांक 07 09 2022 रोजीच्या अहवालात करण्यांत आलेला आहे. याबाबतचा निर्णय सर्वस्वी मा.महासभेने घेणे अपेक्षित आहे.

2) आपण उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत खालील प्रमाणे मुद्दे निहाय अहवाल सादर करीत आहे.

I) मुद्दा क्रमांक 1 :-

मंजूर विकास योजनेतील आरक्षण क्रमांक 58 व 59 ही आरक्षणे T.D.R. च्या माध्यमातुन संपादन करण्याचा प्रयत्न करण्यांत आला तथापि त्यास यश आले नाही. उलटपक्षी या आरक्षणासच जमीन मालकांचा विरोध असल्याचे स्पष्ट झाले. तथापि या आरक्षणा खाली जागा Compulsory Land Acqisition च्या माध्यमातुन संपादन करता येणे शक्य आहे. तसेच या आरक्षणा बरोबरच या आरक्षणास पोहोच रस्ता उपलब्ध होण्यासाठी उक्त अधिनियमानुसार एक विकास योजना रस्ता (15.00 मी.रुंद) देखील संपादीत करता येईल. (क्षेत्र सुमारे 3000.00 चौ.मी.)

II) मुद्दा क्रमांक 2 :-

पोहच मार्गासाठी सुध्दा वर नमुद केल्याप्रमाणे Compulsory Land Acqisition चा प्रस्ताव सादर करावा लागेल.

III) मुद्दा क्रमांक 3 :-

मा.महापौर अहमदनगर महानगरपालिका यांनी उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने दिनांक 07-04-2022 रोजी घेतलेली बैठक व त्याचे इतिवृत्ती यामध्ये सदर बाब सविस्तर नमुद आहे. कृपया अवलोकनी यावे.

IV) मुद्दा क्रमांक 4 :-

मुल्यांकन : महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम 37 अन्वये सदर प्रस्तावाचा प्राथमिक ठराव मंजूर झाल्यास व तशा बाबतही अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यास ही प्रसिध्दीची तारीख मुल्यांकनासाठी गृहीत धरली जाईल. व त्या दिनांका प्रमाणे मूल्यांकन करावे लागेल. तथापि या मूल्यांकनासाठी मा.महासभेची तत्वतः मंजूरी घेण्यासाठी सध्याच्या बाजारमूल्य तक्त्याप्रमाणे (Ready Reckoner Rate) या जमिनीचा दर खालील प्रमाणे :-

1) सावेडी स.नं.261/अ/1 पै. प्रस्तावीत आरक्षण क्रमांक 58 अ (Municipal Purpose) क्षेत्र 6476.58 चौ.मी.

| | | |
|---|---|---|
| 1 | प्रथम=500 चौ.मी.पर्यंत =500 चौ.मी.पर्यंत | 13150 x 100% = 6575000/- |
| 2 | पुढील = 1500 चौ.मी. | 13150 x 90% = 17752500/- |
| 3 | पुढील = 2000 चौ.मी. | 13150 x 80% = 21040000/- |
| 4 | उर्वरीत = 2476.58 चौ.मी. | 13150 x 70% = 22796919/- |
| | एकुण | 68164419/- |

2) सावेडी स.नं.261/अ/1 पै. प्रस्तावीत आरक्षण क्रमांक 58 अ (Burial Ground) क्षेत्र 8961.06 चौ.मी.

| | | |
|---|---|---|
| 5 | प्रथम=500 चौ.मी.पर्यंत =500 चौ.मी.पर्यंत | 13150 x 100% = 6575000/- |
| 6 | पुढील = 1500 चौ.मी. | 13150 x 90% = 17752500/- |
| 7 | पुढील = 2000 चौ.मी. | 13150 x 80% = 21040000/- |
| 8 | उर्वरीत = 4961.06 चौ.मी. | 13150 x 70% = 45666557/- |
| | एकुण | 91034057/- |

उपरोक्त दर विचारात घेवून भूसंपादन अधिनियमातील तरतूदीनुसार या दराच्या दुप्पट दराने मोबदला द्यावा लागेल. आणि या जमिनीचा आगावू ताबा घेतल्यास ताबा घेण्याच्या दिनांकापासून प्रत्यक्ष रक्कम अदा करणेच्या काळासाठी व्याज द्यावे लागेल. उपरोक्त दरात प्रत्यक्ष तपशीलवार मुल्यांकनाप्रमाणे आणि मूल्यांकन दिनांकाप्रमाणे बदल होवू शकतो.

तथापि सदरचे भू संपादन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियमाच्या कलम 126 (1) (अ) अन्वये करणेचे असल्याने महानगरपालिका व जमीन मालक यांच्या संम्मतीने करणेचे असल्याने याबाबत योग्य तो निर्णय महासभेने घेणे अपेक्षित आहे.

V) मुद्दा क्रमांक 5 :-

अद्यावत 7/12 उता-याची तपासणी केली आहे. तसेच अद्यावत Search Report जोडला आहे.

VI) मुद्दा क्रमांक 6 :-

प्रस्तुत अहवालात नविन प्रस्तावीत जागेवर स्मशान भूमी / दफनभूमी दर्शविण्याची कलम 37 अन्वये विकास योजनेत फेरबदल करण्यासाठीची प्राथमिक मंजूरी अपेक्षीण्यात आलेली आहे. ही मंजूरी मिळाल्यास आणि त्याबाबतची अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्यास या जागेचे संपादन महाराष्ट्र प्रादेशिक व अधिनियमाच्या कलम 126 (1)(अ)अन्वये खाजगी वाटाघाटीने करता येणे शक्य आहे. मात्र अशा संपादनास मा.महासभेची मंजूरी मिळणे आवश्यक आहे. अन्यथा पुर्वी अहवालात नमुद केल्याप्रमाणे या जागेचे संपादन महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी प्रमाणे देखील करता येईल असे असले तरीही त्यास देखील मा.महासभेची मंजूरी अनिवार्य आहे.

VII) मुद्दा क्रमांक 7 :-

नव्याने प्रस्तावित जागेवर स्मशानभुमी / दफनभुमी हे आरक्षण दर्शविण्याचा कलम 37 अन्वयेचा प्रस्ताव मंजूर झाल्यास हे आरक्षण प्रारुप विकास योजनेतील आरक्षण आहे. असे गृहीत धरुन त्यावर विकास भाराच्या माध्यमातुन विकास भार (Development Charge) जमा झालेल्या विकास निधी (Devrlopment Fund) या लेखाशिर्षातुन सदरचा खर्च करणे शक्य आहे. अन्यथा महानगरपालिकेच्या इतर माध्यमातुन जमा झालेल्या निधीतुन हा खर्च करावा लागेल.

VIII) मुद्दा क्रमांक 8 :-

कलम 127 अन्वयेच्या दोन खरेदी सूचना अहमदनगर महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या होत्या तथापि यावर विहित कालावधीत कार्यवाही न झाल्याने या जागांवरील आरक्षणे व्यपगत झाली आहेत. त्यामुळे सद्यस्थितीत या प्रकरणांसाठी निधीची आवश्यकता लागणार नाही.

IV) मुद्दा क्रमांक 9 :-

आता शहराच्या दोन्ही विकास योजना (जुन्या व नव्या हद्दीची एकत्रीत विकास योजना) सुधारीत करण्याचे काम लवकरच हाती घेण्यांत येणार आहे. आरक्षण क्रमांक 58 व 59 विद्यमान आरक्षणा बाबत योग्य ते धोरण व निर्णय अशी विकास योजना तयार करतांना घेता येईल. त्यामुळे सद्यस्थितीत या आरक्षणा बाबत परिस्थीती जैसे थे ठेवणे योग्य होईल असे मत आहे.

उपरोक्त याप्रमाणे अहवाल सादर करण्यांत येत आहे. पुढील आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, प्रस्तावित बाबत मा.महासभेसमोर अवलोकनार्थ व नियमानुसार निर्णयार्थ सादर करणेंत यावा.

यावर मा.महापौर मॅडम, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवा.

---*---

चर्चा :

**मा.श्री.अनिल शिंदे :** टोटल क्षेत्र 2 हेक्टर आहे. तक्ता दिला आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** स्मशान भुमी दफनभुमी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने जमिनीचे भुसंपादन करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. दिनांक 22-4-2022 रोजी मा.महापौर मॅडम यांनी मिटींग घेतली त्या अनुषंगाने विषय घेतला. मा.सदस्यांनी पत्र दिले आहे. आपण जी स्मधानभूमी आहे त्यामध्ये मॉडीफिकेशन करणे गरजेचे आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** आरक्षण किती आहे. आपण आरक्षीत करत आहोत. कलम 127 अन्वये 2 खरेदी सूचना महानगरपालिकेस प्राप्त झाल्या त्या विहित कालावधीत कार्यवाही न झाल्याने व्यपगत झाल्या आहेत. व्यपगत झाल्या म्हणजे काय ? हे विषय सभागृहासमोर का आणले नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** सन 2018 च्या सभेत प्रस्ताव घेतलेले आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :** मग एकदा सभागृहात विषय आल्यानंतर पुन्हा सभागृहा समोर का आणला ? भूसंपादनासाठी आला होता. महासभेने निर्णय घेतलेला नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** मालकाने 127 नुसार नोटीस दिली तर भूसंपादनासाठी प्रोसेस करावी लागणार.

**मा.श्री.अनिल शिंदे :** एखादा गरीब असता तर शासनाकडे प्रस्ताव पाठवला असता का ? मी या संदर्भात गृह खात्याकडे चौकशी लावणार. सभागृहाची कोणतीही मंजूरी नसतांना शासनाकडे प्रस्ताव कसा पाठविला.

**मा.आयुक्त साहेब :** 127 च्या प्रोसीजर नगररचनाकार सांगतील. जर फॉलोअप झाल्या नसतील तर चौकशी लावा.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** 127 कलम अंतर्गत जमिन मालकाने महानगरपालिकेने नोटीस दिली. त्यावर विहित कालावधी झाला नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 4 एकर जागा आरक्षीत करायची मग जमीन अधिग्रहण करायची किती रक्कम तुमच्याकडे शिल्लक आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** 15 कोटी रक्कम शिल्लक आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** ज्याच्यावर आरक्षण टाकायचे तो सर्व्हे कोणाचा आहे. नंबर किती आहे.?

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** सर्व्हे नंबर 261 आहे व तो शिवाजी महादेव कराळे यांचा आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** तो विषय कोणाचा तुमच्याकडे 15 कोटी शासनाकडून मंजूरी आणल्या नंतर पैसे देणे बंधनकारक आहे. 32 कोटी द्यावे लागतील आपल्याकडे 15 कोटीच आहे. त्याला द्यावे लागेल.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** आज रोजी असेप्ट केले नाही. तत्वतः मंजूरीसाठी च्या अनुषंगाने पुढची कार्यवाहीसाठी प्रस्तावीत केले आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** ज्या वेळेस खरेदी करायची त्या वेळेस पैसे द्यावे लागतील.

**मा.श्री.अनिल शिंदे :** मी माझे लेखी म्हणणे पीठासीन अधिकारी यांना दिले आहे.

**मा.सौ.आशा कराळे :** दुसरी कोणती जमीन असेल तर ती घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :** मी स्मशान भूमी संदर्भात बरीच पत्र दिले. मी सावेडी कचरा डेपो येथे प्रथम मागणी केली तेथे का केली नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** मॉडीफिकेशन प्रस्ताव बंधनकारक आहे तो ऑलरेडी कचरा डेपो आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** सावेडी कचरा डेपो वर स्मशान भूमी का करत नाही. आता जो प्रस्ताव घेतला आपल्या मागणीवरुनच घेतला आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** डी.पी.प्लॅन सुधारीत करायचा मुळ हद्दीला 17 वर्षे पुर्ण झाले आहेत एक एजन्सी यासाठी नेमली आहे. इरादा जाहीर करायचा आहे. परंतु आज रोजी मंजूर झालेला नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :** डी.पी प्लॅन बद्दल किती नगरसेवकांना माहिती दिली.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** महासभेने पूर्वी विषय घेतला मसुदा सादर केला परंतु विषय मंजूर नाही. आता फक्त इंटेशनल घेणार आहोत. लाभार्थ्यांची मिटींग घेवून सूचना घेणार आहोत डॉक्टर वकील यांचे मत घेणार आहोत. 20 वर्षानंतर डी.पी. प्लॅन बदलावा लागतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :** डी.पी प्लॅन हा विषय सर्व नगरसेवकांना माहिति पाहिजे तुम्ही या ठिकाणी आरक्षण टाकता ते लोक जमिनी देत नाही. जेवढे आरक्षण टाकतो त्याची माहिती द्या.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** 31 हजार आरक्षणा पैकी 20% आरक्षण 40 वर्षात डेव्हलप झाले. 300 जमिनी महानगरपालिकेच्या ताब्यात नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :** ते भुखंड ताब्यात का देत नाही. तुम्ही कंम्पलसरी अॅक्वाझीशन ताब्यात का घेत नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** महासभेने तसे निर्णय घेणे आवश्यक आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** जलतरण तलाव महानगरपालिकेचा 1 आहे. अमरधाम 3आहेत, प्ले.ग्राउंड 1. ज्यांच्या जमिनी तुम्ही ताब्यात घेता त्याला जेवढा मोबदला मिळाला पाहीजे तेवढा मिळत नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** त्यासाठी निधी आवश्यक आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** चार झोनला चार जलतरण तलाव पाहीजे. आपल्या महानगरपालिकेची कॅपॅसिटी नसते पैसे द्यायची. प्रथमतः टीडीआर दिला पाहीजे. 100% पै. 80% नुकसान शेतक-यांचे होते. व्यापारी लोक 20% वर टीडीआर चे पैसे देत नाहीत. एक ठराव असा करा महानगरपालिकेच्या सर्व भूखंडा बाबत शासनाने एक परिपत्रक काढले ज्यांची जमिन आहे त्यांना टीडीआर चा मोबदला मिळाला पाहीजे.

आरक्षीत जागेत भूखंडधारकांना नोटीसा काढा. राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवा. भूखंड द्यायला तयार नाही तसा ठराव करा. जेणे करुन बिगर पैशाचे भूखंड ताब्यात येतील. पुढच्या सभेत हा विषय सभागृहात मांडला पाहीजे.

**मा.श्री.मदन आढाव :** किती आरक्षण स्मशान भूमीसाठी आहेत.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** सध्या 58, 59 दोन आरक्षण आहेत. त्या लोकांनी तक्रार दिली त्या ठिकाणी जायला रस्ता नाही. डॉन बॉस्को जवळ ही जागा आहे.

**मा.श्री.मदन आढाव :** ती जागा का घेत नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** याचेसुध्दा भूसंपादन करावे लागणार. आरक्षण प्रस्तावीत आहे. 2013 नुसार आरक्षण प्रस्तावीत करणार.

**मा.श्री.मदत आढाव :** त्या दोन जमिनी आहेत त्याचे नांव सांगता का.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** सदाशिव लक्ष्मण बारस्कर, सुभाष जगन्नाथ बारस्कर ;;;;;;;;;; त्यांनी जमिनी देण्यास नकार दिला आहे.

**मा.श्री.मदत आढाव :** कचरा डेपोवर करोनात अंत्यविधी केल्या.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** टीडीआर मार्फत जमिनी कचरा डेपोसाठी घेतली.

**मा.श्री.मदत आढाव :** शहरात चूकीचा मॅसेज जात आहे. प्रशासनाने जनतेला सांगीतले पाहीजे. 32 कोटी खर्चून जमिन घेत असू. तर कचरा डेपोवर करायला काय अडचण आहे. तो प्रस्तावीत करा. पुढच्या सभागृहासमोर तो विषय मांडा.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** महासभेचा अधिकार आहे.

**मा.श्री.मदत आढाव :** एवढा तातडीने विषय घ्यायची का गरज आहे. सावेडी भागात अमरधाम होत असेल तर सर्वांची सोय होईल. आम्ही लेखी म्हणणे दिले आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** मूल्यांकन जमिनीचे जेवढे होईल तेवढे द्यावे लागेल.

**मा.श्री.मदन आढाव :** कचरा डेपोवर केले तर महानगरपालिकेचे 32 कोटी रुपये वाचतील.

सावेडी भागात दफंनभुमी / स्मशानभुमी उपलब्ध करुन देणेच्या प्रस्तावास मा.सौ.शीला दिप चव्हाण यांनी लेखी पत्र देवून विरोध नोंदविलेला आहे.
मा.सदस्य यांनी सभागृहामध्ये लेखी पत्र दिले.

**मा.श्री.गणेश कवडे :** नालेगांव अमरधामचे ओट्याच्या जाळया तुटल्या, ओटे तुटले, स्थायी समिती मध्ये यावर बोललो आहे. नालेगावात संपूर्ण शहरातून लोक अंत्यविधीसाठी येतात. सावेडीसाठी अमरधाम जरुरी आहे.

**मा.महापौर मॅडम :** सदर विषयाबाबत सभागृहात झालेल्या चर्चेनुसार योग्य निर्णय घेण्यांत येईल.

---*---

**ठराव :**

ऑफीस रिपोर्ट व सभागृहात याबाबत झालेली चर्चा व ब-याच मा.नगरसेवक यांनी लेखी पत्र देवून सावेडी स्मशानभुमीसाठी जागा भूसंपादनास विरोध केला आहे. तसेच सभागृहात देखील ब-याच मा.नगरसेवक यांनी सावेडी स्मशानभुमीसाठी सभागृहात चर्चेत भाग घेवून जमिनीचे भूसंपादन करुन घेण्यास विरोध केला आहे. सावेडी भागात स्मशानभूमी व्हावी यासाठी सावेडी परिसरातील नागरिकांनी मागणी केली होती. त्यांच्या मागणी नुसार या जागेसाठी बैठक घेवून तसेच सावेडी भागामध्ये स्मशानभूमीची आवश्यकता पाहून याबाबत चर्चा करुन सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे आणला होता. शहरासाठी नालेगांव अमरधाम हे

एकमेव अमरधाम असून सावेडी उपनगर या भागातुन नागरीक मृतदेह अंत्यविधीसाठी नालेगांव अमरधाम येथे आणतात. त्यामुळे नालेगांव अमरधाम मधील मृतदेह दहन करणेची जागा कमी पडत आहे. याकरीता भविष्यातील लोकसंख्येचा विचार करता सावेडी उपनगरात नविन स्मशानभूमी होणे आवश्यक आहे. परंतु सदर विषयाबाबत सभागृहात मा.नगरसेवक यांनी केलेला विरोध व महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थिती बाबत केलेला उहापोह पाहता सावेडी भागात दफनभूमी / स्मशानभुमी उपलब्ध करुन देणेच्या अनुषंगाने जमिनीचे भुसंपादन करणेचा विषय ही सभा नामंजूर करीत आहे.

याबाबत प्रशासनाने सदरचा प्रस्ताव नस्तीबंध करणे बाबत पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.गणेश खंडेराव कवडे,

अनुमोदक : मा.श्री.सचिन चंद्रशेखर शिंदे,

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०४** **प्रस्ताव क्रमांक : २८** **दिनांक:- २५/११/२०२२**

---

**प्रस्तावाचा विषय :-** मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :**

1) श्री.अशोक किसन बडे, मला बाहेरगांवी जावयाचे असल्याने दिनांक 25/11/2022 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

2) सौ.विद्या दिपक खैरे, माझेकडे धार्मिक कार्य असल्यामुळे आज दिनांक 25/11/2022 च्या सभेस उपस्थित राहू शकत नसलेबाबत रजेचा अर्ज मंजूर करणेबाबत...

---*---

**ठराव :**

नोंद घेण्यांत येत आहे.

सुचक : मा.श्री.उमेश (गणेश) खंडेराव कवडे

अनुमोदक :मा.श्री.परसराम बाळु गायकवाड,

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**चर्चा :**

**मा.श्री.गणेश कवडे :** महाराष्ट्राचे राज्यपालांनी छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा फुले यांचे बद्दल जे वक्तव्य केले त्याचा मी शिवसेना पक्षाच्या वतीने निषेध व्यक्त करतो.

आपण महाराष्ट्रात राहून आपण ज्यांच्यामुळे हिंदू म्हणून ताठ मानेने जगतो त्यांच्या बद्दल असे वक्तव्य करतो त्याबद्दल मी निषेध करतो.

श्रध्दाचे जे हत्याकांड लवजिहादच्या माध्यमातुन हत्यांकांड घडले त्याचा मी निषेध करतो या खटल्याची रोजच्या रोज सुनावणी फास्टट्रॅक कोर्टात झाली पाहीजे. असे गैरकृत्य करणा-यांना हूकूमशाही पध्दतीने भर चौकात फाशी दिली पाहीजे लवइन रिलेशनशिप मध्यमातून बातम्या वाचायला मिळतात संपूर्ण नगर शहराच्या वतीने निषेध या कृत्याचा नोदवावा. नराधमाला कठोरात कठोर शिक्षा व्हावी. श्रध्दाच्या मृतात्म्यास शांती लाभो यासाठी दोन मिनीटे स्तब्धता पाळावी.

**मा.श्री.मनोज कोतकर :** उड्डाणपुलाच्या अभिनंदनाचा ठराव सर्वांच्या वतीने घ्यावा सर्वांना वाटत होते उड्डाणपुल या शहरात व्हावा ब-याच आजी माजी सदस्यांनी यात पाठपुरावा केला असेल. आजी माजी नगरसेवक पदाधिकारी व तत्कालीन खासदार दिलीपजी गांधी यांनी भूमीपुजन केले नितीनजी गडकरी साहेब यांनी निधी दिला त्याबद्दल मी त्यांचे शहराच्या वतीने आभार मानतो त्याचप्रमाणे फडणवीस साहेब 50 कोटी रुपये पुलाच्या जमिनीखाली सुविधा कामासाठी निधी दिला. त्याबद्दल त्यांचेही आभार. या जिल्ह्याचे खासदार डॉ.सुजय विखे पाटील यांचे शहराच्या वतीने आभार मानतो ज्या अडचणी आल्या त्या सोडविण्यासाठी अथक प्रयत्न मा.आमदार संग्रामभैय्या जगताप यांना बरोबर घेवून सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. मा.खासदार श्री.सुजयजी विखे पाटील, मा.आमदार श्री.संग्रामभैय्या जगताप त्याचबरोबर महानगरपालिकेचे आभार मानतो. त्याबद्दल अभिनंदनाचा ठराव मांडावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :** मा.खासदार डॉ.सुजयजी विखे पाटील, मा.आमदार श्री.संग्रामभैय्या जगताप सर्व आजी माजी पदाधिकारी यांनी जे सहकार्य केले त्याबद्दल आभार मानतो व अनुमोदन देतो. त्यांच्या शिरावर ;;;;;;;; हायवेवरील खड्डे, स्वच्छता, रंगरंगोटी याची आपल्याकडून पाठपुरावा त्या नगरसेवकांनी करण्यासाठी प्रयत्न करावे. काळजी घ्यावी अशी मी विनंती करतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :** ब्रिजवर जी तिरंगाची रोषणाई लायटींग केली बंद पडल्यानंतर महानलगरपालिकेने ती लावावी तसा ठराव करावा. केडगांव परिसरात छत्रपती शिवाजी महाराज पुतळयासाठी निधी उपलब्ध करुन दिला, पुतळा दुरुस्त करावा. व सुशोभीत करण्याची मागणी केली पण प्रतिसाद मिळाला नाही. व्यापा-यांना आवाहन करुन आम्ही

कामास सुरुवात केली मा.आयुक्त यांना आम्ही विनंती केली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयाची दुरावस्थ्ज्ज्ञ झाली आहे. त्याठिकाणी सुशोभिकरण करावे. अशी विनंती केली त्यास अडचण काय आहे. याबाबत माहिती द्यावी.

**शहरअभियंता श्री.इथापे :** छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा सुशोभिकरणाचे काम प्रगती पथावर आहे. यशवंतराव चव्हाण, महात्मा ज्योतिबा फुले यांचेबाबत चर्चा झाली जे कोणी खाजगी तत्वावर करण्यास तयार असतील त्यांनी प्लॅन एस्टीमेट महानगरपालिकेस सादर करावे अटी-शर्ती तपासुन परवानगी दिली जाईल.

रस्त्याच्या कडेवर पुतळा आहे जागा अतिशय थोडी आहे. जागा मर्यादीत असल्याने मर्यादा येतात.

**मा.श्री.मनोज कोतकर :** रस्ता वाढेल त्यावेळेस वाढेल आज आपण सुशोभिकरण करु शकतो. ज्या वेळेस रस्ता वाढेल त्यावेळेस काढून घेवू. आज आवश्यकता आहे असे समजू. 10-20 लाख निधी टाकला तो वाया गेला. आयुक्त साहेबांनी आदेश द्यावा. 10-20 लाख निधी उपलब्ध करुन द्यावा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** काय असेल ते एस्टीमेट करुन घ्या.

**शहरअभियंता श्री.इथापे :** मान्यता घेवून कारवाई करु.

**मा.डॉ.सागर बोरुडे :** पूर्ण दाबाने पाणी देत नाही. दिवसाआड पाणी पुरवठा करता. वार्षिक खर्च कीती केला जातो. लाईन फुटते यावर शेडयुल पुर्ववत यायला आठ दिवस लागतात. यावर पर्याय काढला पाहीजे आज पाण्याची भयानक स्थिती आहे. जनरेटरची सोय का होत नाही. एक एमरजन्सी टीम करावी. लेसीबी वगैरे तातडीने उपलब्ध करुन घ्यावे.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** शहर हे उंचावर असल्याने मुळानगर येथुन विळद येथे पंपिंग करुन पाणीपुरवठा उपलब्ध करावा लागतो. सातत्याने वीज पुरवठा खंडीत होण्याचे प्रमाण वाढते आहे. 5 मिनीटे जर वीज पुरवठा खंडीत झाला तर परिस्थीती पूर्ववत होण्यासाठी 2 ते अडीच तास लागतो एमएसईबी ला तातडीने संपर्क करतो फोन चालू असतो. पाईपलाईन फुटते विळद ते वसंत टेकडी 2 लाईन आहे हवेच्या दाबामुळे, वाहनाच्या धडकेने, गॅस पाईपलाईनचे कामामुळे लाईन फुटते. गॅस पाईपलाईनचे कामामध्ये तुटल्या संदर्भात एमआयडीसी पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल केला आहे. ईमजन्सी टिम दुरुस्तीचे कामासाठी तयार आहे. लाईनलिकेजचा मॅसेज मिळाला की पाईपलाईन दुरुस्ती तातडीने करुन घेतो. जनरेटर एवढया मोठया क्षमतेचे उपलब्ध नसते. सोलरची वीज जनरेट होवून ती एमएसईबीला जाते मग आपल्याला मिळते.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** त्याक्षमतेचे जनरेटर घेता येणार नाही का. एक इमरजन्सी टीम तयार करावी.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** टीम तयार आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** अमृतचे काम 95% पूर्ण झाले आहे. 5% काम पूर्ण का होत नाही. टाक्या पूर्ण क्षमतेने भरत नाहीत.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** 1.2% काम बाकी आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** वसंतटेकडी येथे मोटर बसविणे बाकी आहे. एस्टीमेट मध्ये ती धरली नव्हती. दीड वर्ष झाले 5% काम पूर्ण होत नाही. आपण 5 लाख लोकांना वेठीस धरतो.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** मुळ योजनेत मोटारी व पंप न धरल्याने ट्रान्सफार्मर पॅनल बसवता येत नाही.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** हे काम झाले तर लोकांना बोलण्याची गरज पडणार नाही. सावेडीतील रस्त्याबाबत मी लेखी पत्र दिले त्याचे उत्तर सुध्दा दिले नाही.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** डी.पी.आर पाहील्या शिवाय काम कसे चालू होवू शकते.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** राज्याचे मेन एमजीपी यांचेकडून डीपीआर चेक होवून आला आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** तुम्ही पंपाची वर्क ऑर्डर दिली का

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** डिसेंबर 15 पर्यंत व त्यानंतर 8 दिवसांनी पंप येणार आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** आयुक्तांना रस्त्याचे पत्र दिले. दीड दोन महिन्यांनी मुरुम खडी त्याठिकाणी टाकली. रस्ता मंजूर आहे कॅश निधी आहे.

**मा.श्री.महेंद्र गंधे :** माझ्या घरा समोरील रस्त्याची तात्पुरती डागडूजी केली नागरीक टीका करतात. एक रस्ता धड नाही व्हाटसअप व इन्टाग्राम बघा लोक टीका करतात.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :** हा जो रस्ता आहे. त्या रस्त्यावरुन नागरीक ब-याच कॉलनीतुन ये-जा करतात.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** आयुक्त साहेबांनीच उत्तर द्यावे. मी आयुक्तांना पत्र दिले. इथापेंनी मागच्या सभेत उत्तर दिले.

**मा.श्री.गणेश भोसले :** सिटी इंजिनियर विभाग प्रमुख आहेत ते उत्तर देत आहेत. तुम्ही महापौर राहीले आहेत.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :** आयुक्त साहेब यांनी उत्तर द्यावे.

**मा.आयुक्त साहेब :** शहर अभियंता उत्तर देतील शहर अभियंता याबाबत सविस्तर निवेदन देतील मी याबाबत आढावा घेतो. शहर अभियंत्या सोबत बैठक घेवून प्रश्न मार्गी लावण्यांत येईल.

**मा.श्री.अनिल शिंदे :** दिनांक 15-09-2018 साली 9 कोटी फडणवीस साहेबांनी निधी प्राप्त करुन दिला. त्यामध्ये 47 काम मंजूर झाले ते एस्टीमेट साठी पीडल्ब्युडी कडे वर्ग झाले आपल्याकडे फेज-2 व भुयारी गटर चालू असतांना त्यासाठी कालावधी 3-4 वर्षे गेला महापौरांनी मध्यंतरी दिनांक 06-05-2022 रोजी मिटींग घेतली त्यामध्ये 47 पैकी 5 रस्ते ताबडतोब करावे याबाबत पीडब्ल्युडी ला पत्र दिले. डांबराचा रेट वाढल्यामुळे ठेकेदार काम करीत नाही त्याठिकाणी फेज -2, भुयारी गटारीचे काम झाले त्यावेळी तेथे रस्ते का नाही केले. पीडब्ल्युडी अधिकारी म्हणतात आयुक्तांचे पत्र आम्हाला पाहीजे असे म्हणतात आपल्याकडे पैसे उपलब्ध असतांना काम करुन धेत नाही फेज-2 असेल भुयारी गटरचे असेल मध्य शहरात कोणी काही करणार का नाही. दरवाढ टेंडरमध्ये नाही त्यामुळे ठेकेदार काम करायला तयार नाही मुलभूत सोईसुविधा निधी मागणी करा. 15 दिवसात मी निधी आणतो. शहराची मध्यस्थिती नमूद करा. 5 कोटी पडून आहेत. ठेकेदाराला रेस्टीकेट करा तुम्हाला अधिकार आहेत.

**शहर अभियंता श्री.इथापे :** सावेडी नाका रस्ता खुलासा. सावेडी नाका ते शुभम मंगल कार्यालय रस्ता प्रत्यक्षात जागेवर 12 मीटर आहे. अतिक्रमण आहे. अतिक्रमण निघाले नसल्याने रस्ता करता आलेला नाही. रेणाविकर रस्ता समोर काम चालू आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** तो पंप कित्येक दिवसापासून आहे.

सांडपाण्याचा निचरा होत नाही 13 मीटर अतिक्रमण निघत नाही. रॉयल्टीसाठी ठेकेदाराच्या गाड्या पकडल्या जातात. हेवी दंड त्यांना आकारतात त्यामुळे साईटवर मटेरियल येण्यास अडचणी येत आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** आहे तो रस्ता निट करुन घ्या. अतिक्रमण बाजुला ठेवा.

**शहर अभियंता श्री.इथापे :** सभा संपल्या नंतर आम्ही आयुक्त साहेबांशी चर्चा करतो निर्णय घेतो.

**मा.महापौर साहेब :** 15 दिवसात काम करुन घ्या.

**शहर अभियंता श्री.इथापे :** महापौर साहेबांच्या आदेशानुसार काम करुन देतो.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :** आहे तेवढा रस्ता करुन द्या.

**मा.आयुक्त साहेब :** त्या एस्टीमेट प्रमाणे रस्ता असेल त्याप्रमाणे रस्ता करुन दिला जाईल. 15 दिवसात मार्गी लावतो.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** गेल्या दिड ते दोन महिन्यापासून डेंग्युने थैमान घातले पणे आपण त्या आजाराकडे गांभीर्याने पहात नाही प्रशासनाच्या वतीने पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. मा.उपमहापौर यांनी मिटींग घेतली तेंव्हा यंत्रणा जागी झाली. प्रत्येक प्रभागात फवारणी

नियोजन झाले. अनेक स्कीम आहेत. याची माहिती नगरसेवकांना व नागरिकांना नाही या योजना जाणून बुजून पोहोचू द्यायच्या नाहीत का ? मी विनंती करतो ज्या योजना आहेत त्या योजनांची माहिती या ठिकाणी द्यावी.

**मा.श्री.गणेश कवडे :** विषयपत्रिकेवरील विषय अगोदर घ्या.

**डॉ.दळवी :** मा.उपमहापौर यांनी मिटींग घेवून आढावा घेतला. ज्या सूचना दिल्या त्याप्रमाणे कार्यवाही सुरु केली आहे. 50 कर्मचारी यांना औषध फवारणी तात्काळ सुरु केली. धूर फवारणी करण्यात आली. आरोग्य विभागामार्फत या योजना सुरु आहेत. या योजना सर्व वॉर्डापर्यंत पोहोचवण्यासंबंधी सूचीत केल्या प्रसिध्दी साठी आपण कमी पडतो. कोव्हीड काळात ग्राउंड लेव्हलवर आपण चांगले काम केले. गोवरचा एकही रुग्ण अजुन आलेला नाही.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** योजना सर्व सामान्यांपर्यंत पोहोचत नाही. सविस्तर माहिती घ्या.

**डॉ.दळवी :** नागरी आरोग्य केंद्रात नियमीत लसीकरण चालू आहे. प्रधानमंत्री मातृत्व योजना चालू आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** गोरगरीब झोपडपट्टी पर्यत योजना पोहोचल्या पाहीजे.

**डॉ.दळवी :** एक भूमिका सर्व नागरिकांना देण्यांत येणार आहे. प्रसिध्दीत आम्ही कमी पडत आहोत.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** अनेक प्लॉट मोकळे आहेत. त्या ठिकाणी पाण्याचे डबके साचले आहे. त्याठिकाणी डासांची उत्पत्ती होते. त्यावर काही उपाययोजना करतायेत नाहीत का. काही कुटुंबातील तरुण मुले निधन पावले आहेत. कर्ता पुरुष गेले आहेत.

**डा ॅ.दळवी :** ज्येष्ठ नागरिकांना ओपीडी मोफत आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** आपल्याकडच्या योजना नागरिकांपर्यत पोहोचवल्या पाहीजेत.

**मा.श्री.अविनाश घुले :** आपण प्रसिध्दीला कुठेतरी कमी पडतो. सन्माननीय उपमहापौरांनी मिटींग घेतली नसती तर हा विषय पुढे आला असता का. तुम्हाला या योजना खुल्या की ताण येईल असे दिसते. उपायुक्तांना माहिती नव्हत्या योजना महिलांच्या योजना नगरसेवकांना माहिती आहेत का. ?

**मा.श्रीमती.कोतकर सुनिता :** मी प्रत्येत भागात जावून नागरिकांना मार्गदर्शन करते. नगरसेवक म्हणून आमची जबाबदारी आहे. कष्टकरी लोकांना माहिती दिली पाहीजे केडगांव मध्ये फवारणी गवत काढणे या काढतात. महिलांचे लसीकरणाचे अभियान वेळोवेळी केली जाते दळवीचे खरोखर कौतुक वाटते.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** तुमच्या भागात चांगले असेल यात दुमत नाही. काही योजनांचे फलक लावले का.

**डॉ.दळवी :** सर्व आरोग्य केंद्राबाहेर फलक लावले आहेत.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** फलक लावावे, पॉम्प्लेट वाटण्यांत यावेत. महानगर पालिका योजना राबविते त्याची व्यापक प्रसिध्दी करावी. तसे नियोजन करावे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** महिला समिती आहे त्यातुन निधी मिळतो.

**मा.श्री.अविनाश घुले :** मा.उपमहापौर यांचे अभिनंदन करतो. जे काम प्रशासनाने करायला पाहीजे ते काम त्यांनी केले. इथून पुढे योजना नागरिकांपर्यंत पोहोचल्या पाहीजेत यात कोणतीही हयगय करु नये.

**मा.श्री.मदन आढाव :** गणेश चौक चे कामास मंजूरी दिली त्याबद्दल आयुक्त महापौर सभापती यांचे आभार मानतो तो रोड किती दिवसात सुरु होईल.

**मा.सौ.शीला चव्हाण :** नविन उड्डाणपुल व कल्याण रोडवरील पुलावर वाहतुक पथकर लावावा व शहर खड्डे मुक्त करावे. व हा विषय अजेंडयावर घ्यावा.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** पथकर अशा प्रकारे लागू शकतो का.

**शहर अभियंता श्री.इथापे :** दोनही रस्ते महानगरपालिकेचे नाहीत. राष्ट्रीय महामार्गाचे आहेत त्यामुळे आपण कोणताही कर त्यावर लावू शकत नाही.

**मा.सौ.मीना चोपडा :** जातीवाचक नावे वगळण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मोचीगल्ली व कापडबाजाराचे नांव बाबा रामदेवजी मार्ग, पै.शकुर शेख चुडीवाले असे नाव घ्यावे. याबाबत मी दिनांक 03-11-2022 रोजी पत्र देवून पाठपुरावा केला.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** पै.शकुर शेख चुडीवाले यांचे नांव तीन वर्षापुर्वी नामकरण करणे बाबत पत्र दिले. त्यावर अद्याप कार्यवाही केली नाही.

**मा.सौ.शीला चव्हाण :** 305 व 506 सफाई कामगारांचा निकाल लागला त्यात काही वारले. त्यांचे वारसांना नोकरीत घ्यावे. घरी जरी दुसरी नोकरी असेल तर त्यांना काय उपयोग, शिक्षणाची अट शिथील करावी. सर्व वारसांना कामावर घ्यावे.

**मा.महापौर मॅडम :** प्रशासन सर्व तपासणी करुन उचित निर्णय घेईल.

**मा.सौ.सुरेखा कदम :** छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, महात्मा ज्योतिबा फुले सावित्रीबाई फुले पुतळा उभारणे बाबत माहिती घ्यावी.

**शहर अभियंता श्री.इथापे :** महानगरपालिका इमारती समोर शिवाजी महाराजांचा पुतळयासाठी जागा निश्चीत केली आहे. 2 मे, 2017 चे जी आर मध्ये 17 बाबींची पुर्तता करणेचे आदेशानुसार पुर्तता करुन दिली. 15 दिवसांपुर्वी जिल्हाधिकारी यांचेकडे बैठक झाली. पोलीस विभागाची एनओसी बाबत चर्चा झाली. पोलीस अधिक्षकांनी छत्रपती शिवाजी महाराज व संभाजी महाराजांच्या पुतळयासाठी एनओसी दिली. या दोन्ही पुतळयांचे चबुत-यांचे परवानगी साठीची आर्किटेक्ट यांचेशी संपर्क साधला त्यांना एनओसी व ठराव पाठविला आहे.

नगरविकास विभागाची परवानगी मिळाल्यानंतर मा.जिल्हाधिकारी यांचेसमोर मिटींग घेतली जाईल. ब्रांझ धातुचा संभाजी महाराजांचा पुतळा तयार आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा होता ती जागा महानगरपालिका प्रशासनाने ताब्यात घेतली. निविदा प्रक्रीया लवकर होईल. महात्मा फुले पुतळा मान्यता घेवून निविदा प्रसिध्द होईल. सर्व प्रोसेस पॅरलली होईल. लवकरच पुतळा बसविणेची कार्यवाही होईल. पोलिसांची परवानगी महत्वाची आहे. दोन पुतळयांना पोलिसांनी परवानगी दिली. नंतर चीफ आर्किटेक्ट यांची परवानगी महत्वाची आहे. ती पुढच्या आठवडयात मिळणे अपेक्षित आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :** किती दिवस लागतील चार-पाच वर्ष झाले. टाईम द्या आयुक्त साहेब.

**शहरअभियंता श्री.इथापे :** कायदेशीर अडचणी येतात. काही अडचणी येतात. संभाजी महाराजांचा पुतळा आपण आपल्या जागेत बसवित आहोत.

**मा.महापौर मॅडम :** लवकरात लवकर पुतळे बसवा.

**मा.सौ.सुरेखा कदम :** लवकरात लवकर पुतळे बसविण्यांत यावेत.

**मा.श्री.राहुल कांबळे :** सुख सागरची जागा सद्यस्थितीत किती आहे.

**शहर अभियंता श्री.इथापे :** टी.पी.स्कीम नंबर 3 मधला प्लॉट आहे. ती जागा 577 चौ.मी. रस्ता वाईडींग सोडून आहे. पहिल्या टप्प्यात पुतळयांची निविदा काढतो आहोत. नंतर सुशोभिकरणाची निविदा प्रसिध्द करण्यांत येईल.

**मा.श्री.राहुल कांबळे :** आता पुन्हा त्याठिकाणी अतिक्रमण होवू नये म्हणून उपाययोजना करावी.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** तसे होणार नाही.

**शहर अभियंता श्री.इथापे :** दोन पुतळे चीफ आर्किटेक्टची परवानगी साठी प्रस्ताव सादर केला आहे. त्याची मंजूरी मिळाल्यानंतर येत्या दोन महिन्यात पुतळे उभारु शकतो.

**मा.सौ.सुरेखा कदम :** उड्डाणपुलाच्या कामामुळे जे दुषीत पाणी उज्वल कॉम्प्लेक्स, मेहेर कॉलनी या भागास होत आहे.

**इंजिनिअर श्री.निंबाळकर :** इम्पीरियल चौकापर्यंत नविन लाईन टाकण्याचे काम झाले आहे.

**मा.श्री.मदन आढाव :** बोल्हेगांवचे रस्त्याचे काम केंव्हा सुरु होईल. राघवेंद्र स्वामी ते केशव कॉर्नर.

**शहर अभियंता श्री.इथापे :** निविदा मा.स्थायी समितीमध्ये मंजूर झालेली आहे. ठराव प्राप्त झाल्यानंतर मा.आयुक्तांची मंजूरीसाठी प्रस्ताव ठेवू त्यानंतर करारनामा करुन घेवून कार्यारंभ आदेश देवू. 8 ते 10 दिवस लागतील अतिक्रमणाच्या नोटीस देण्याची कारवाई सुरु

करु.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** फेज-2 अमृत योजनेत जे पाईप टाकले तेच खराब आहेत. रस्त्याच्या कामामुळे पाईपलाईन खराब झाल्या आहेत.

**इंजिनिअर श्री.सातपुते :** नागापूर बोल्हेगांव काही भागात काम झाले त्याठिकाणी लिकेज झाल्या त्याच ठेकेदाराकडून जॉईंट करतो डिपॉझिट आपल्याकडे आहे त्याच ठेकेदाराकडून आपण करुन घेतो.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :** पाईपलाईन रोडला रिटर्नचे पाणी येते. त्या कर्मचा-यांना वॉलमनला वॉल बंद करायला सांगतात. टाकीवरील कर्मचा-यांना गाडळकर यांचे मॅसेज येतात. एकतर पाणी कमी येते आहे. आटे कमी करायला सांगतात.

**इंजिनिअर श्री.सातपुते :** मी चौकशी करतो व सांगतो.

**मा.श्री.अविनाश घुले :** सोलापूर हायवेवर काम चालू आहे. अमृतच्या पाण्याच्या लाईन तेथुन गेल्या आहेत. त्यावर काही उपाययोजना केली का. सारसनगर टाकी कमी भरते ती लाईन तेथुन गेली आहे.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** त्या काम करणारे ठेकेदार व आमचे प्रतिनिधी यांनी एकत्र पाहणी केली त्यांच्या खर्चाने ते शिफ्ट करुन देणार त्यांच्या मशिनरीमुळे तर 32 फुट नालीवर ते तातडीने दुरुस्त करुन देणार आहेत.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** मी मुंकुंदनगर प्रभाग क्रमांक 3 मधील पाणी पुरवठा संदर्भात प्रश्न विचारतो आर्ध्या भागाला दिवसाआड पाणी काही भागाला 5-6 दिवसाआड पाणी मिळते.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** उपाययोजना केली. फेज-2 चालू केली.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** साहित्य उपलब्ध करुन देत नाही. आपल्याच आरोग्य विभागातील कर्मचा-यांने फोन केला मला रात्री 12 वाजता पाणी नको. संबंधित अधिकारी यांनी मला ते सांगू नका मी भंगार एरियात राहतो.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** 50 ते 60% भागात पाणी पुरवठा व्यवस्थीत होतो. तेथे पाणीपुरवठा देवू शकत नाही. त्यासाठी मुकुंदनगरमधील पाण्याची टाकी चालू केली. ट्रायल घेतली, नागरिकांना दाखविले तुम्ही रितसर पावती करुन कनेक्शन घ्यायला सांगीतले. जवळजवळ 600-700 अनधिकृत घेतले ते रेग्युलराईज करुन घ्यायला सांगीतले.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** जुन्या लाईनवर दिवसाआड पाणी घ्या.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** जुन्या लाईनवर पाणी पुरवठा करु शकत नाही म्हणून नविन लाईन टाकली.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** नविन बजेटमध्ये पाईपलाईनसाठी 20 ते 30 लाख तरतुद करा. जे भरत नाहीत त्यांच्या घरपट्टी पाणी पट्टीत लावून टाका.

**मा.महापौर मॅडम :** सक्तीने कारवाई करण्यांत येईल.

**मा.आयुक्त साहेब :** अनधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करुन घ्यावे लागतील. अधिकृत करुन घेत नाही, तोपर्यंत सर्व कनेक्शन रेग्युलराईज होणार नाहीत तोपर्यंत पाणी पुरवठा होणार नाही. अनधिकृत नळ कनेक्शन धारकांना पाणी मिळणार नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** इनलिगल लोकांपाई लिगल लोकांना लाभ मिळत नाही. घरपट्टी भरा अन्यथा नळ कनेक्शन कट करा. इनलिगल कट करा.

**मा.आयुक्त साहेब :** अनधिकृत कनेक्शन कट केले जाईल. अधिकृत लाईनवरील कनेक्शन पाणी दिले जाईल. जुनी लाईन सुरु होणार नाही. जुन्याच लाईन कनेक्शन दिले जाईल.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** जे लिगल आहेत त्यांना पावती घेवून यायला सांगा ते आपण चालू करु.

**मा.श्री.आसीफ सुलतान :** दिवसाला एक किंवा दोन टँकर द्या.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** निकम साहेब टँकर व्यवस्था करा.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** जिथे पाण्याची व्यवस्था नाही त्याठिकाणी टँकर देतो. जिथे डिस्टब होतो त्या ठिकाणी टँकर देतो.

**मा.श्री.अक्षय उणावने :** लालटाकी भागातील नागरिकांना कनेक्शन जोडून देत नाहीत.

विषय क्रमांक 22 चे वाचन -

**मा.श्री.कातोरे राजू :** नागापूर भागात चव्हाण हॉस्पीटल मागे टाकीवर कोणतेही झाकण नाही. त्यावर तातडीने उपाय योजना करावी. फेज-2 वर टाकी आहे.

**इंजिनियर श्री.सातपुते :** डिपार्टमेंटल पत्र दिले वरती झाकण बसवू व खाली गेट बसवू. 8-10 दिवसात करुन घेतो. दिवस कमी करु.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** अर्जंट मध्ये करुन घेवू.

विषय क्रमांक 22 मंजूर.

**मा.श्री.अनिल शिंदे :** विरोधी पक्ष नेत्यांनी सर्वात शेवटी बोलावे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** प्रभाग क्रमांक 1 पासून फवारणी मोहिम चालू केली. प्रथमतः उपमहापौर यांचे अभिनंदन करतो स्वच्छता मोहिम दर 30 तारखेला सुरु केली त्यांचा वॉर्ड ग्रीन केला. आपण या लगतच्या विषयात पुढे जात आहोत. आपण 5 हजार झाडे लावण्याचा संकल्प केला आयुक्तांना भेटतो. झाडाचे टेंडर बाबत काय झाले त्यांची प्रक्रीया केंव्हा होईल.

**शहर अभियंता श्री.इथापे :** डीएसआर ला आयटेमला आम्ही मंजूरी दिली. मागच्या आठवडयात.

**मा.श्री.संपत बारस्कर :** तुम्ही सर्व नगरसेवकांना वेडयात काढता. किती दिवसात छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविणार.

**शहर अभियंता श्री.इथापे :** आम्हाला कायद्याच्या चौकटीतच जावे लागते. शासनाचे पुतळयाचे बाबतीत अतिशय कडक धोरण आहे. चौकटीच्या बाहेर जावू शकत नाही. पोलिसांची एनओसी मिळाली. चिफ आर्किटेक्टची परवानगी 8 दिवसात मिळणे अपेक्षित आहे. दोन महिन्यात पुतळे परवानगी मिळाल्यानंतर बसवू शकतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :** प्रशासन पाहिजे तेवढा पाठपुरावा पाहिजे तेवढा घेतांना दिसुन येत नाही.

**शहर अभियंता श्री.इथापे :** कलेक्टर साहेबांकडे 3 वेळा प्रस्ताव दिला पोलिसांची एनओसी कलेक्टर साहेबांकडे दिली. कोव्हीड पासून वैयक्तीक पाठपुरावा करीत आहोत.

**मा.श्री.संपत बारस्कर :** मला या विषयावर 4-8 दिवसात लेखी द्या किती दिवसात पुतळा बसवू.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** 2-4 दिवसात टेंडर प्रसिध्द होईल. कॅफो रजेवर असल्याने विलंब झाला.

**मा.श्री.संपत बारस्कर :** आज त्या डिपार्टमेंटचा माणूसच उपस्थित नाही तर आम्हाला उत्तरे कसे मिळणार आपल्याकडे रक्त मोफत मिळते का ?

**आरोग्य अधिकारी डॉ.राजुरकर :** 7 प्रा. आरोग्य केंद्र आहेत तेथे सेवा काय आहेत. ते सांगतो त्यात कोव्हीड बाह्यरुग्ण तपासणी किरकोळ आजारावर सेवा. एनएचपी केंद्राचे प्रोगॅम पल्स पोलीओ, महिला व बाल संगोपन सेवा, बालकासाठी 6 आजार बीईओ,गोवर, डेंग्यू, खोकला, नियमीत लसीकरण चालू असते. गरोदर मातांचा लसीकरण होते. प्रसुती सुस्थीतीत व्हावी म्हणून अॅमिनिया प्रोग्राम आहे. आरोग्य केंद्रात कोव्हीड तपासणी कमी रुपयात होते. ज्येष्ठ नागरिकांची तपासणी मोफत केली जाते.

**मा.श्री.संपत बारस्कर :** सावेडी येथे आरोग्य उपकेंद्रासाठी प्रस्ताव दिला त्याचे काय ?

**आरोग्य अधिकारी डॉ.राजुरकर :** आरोग्य वर्धीनी केंद्र तपोवन रोडला मंजूर केले आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** आठरेपाटील पुलाजवळ महानगरपालिकेची जागा आहे. त्याठिकाणी आरोग्य केंद्र उभारणीसाठी प्रस्ताव दिला पण कारवाई का करीत नाही. सावेडी महानगरपालिकेचे केंद्र उभारण्यात यावे. मी पुन्हा पत्र देतो तुम्ही कसे करणार याचे पुढच्या सभेत सांगा. निधी उपलब्ध करुन घ्या.

**मा.महापौर साहेब :** ठिक आहे.

**मा.श्रीमती.सुनिता कोतकर :** कोव्हीड काळात कॉन्ट्रॅक्ट बेसवर नेमलेले कर्मचारी यांनी स्वत:चा जीव धोक्यात घालून चांगले काम केले आहे. ओपीडी कॉन्ट्रॅक्ट बेसवर काम करतात

आरसीएच क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमा अंतर्गत 10-15 वर्षापासुन ते एकत्रित मानधनावर काम करतात त्यांना कायम सेवेत सामावुन घेणेसाठी नविन पदे निर्माण करावी. त्यांना कायम नेमणूक देणेकामी नगरविकास विभागाकडे प्रस्ताव पाठविणेस महासभेने मंजूरी दिली आहे. कंत्राटी कर्मचा-यांनी चांगले काम केले आहे. सर्व कर्मचा-यांना महानगरपालिकेच्या सेवेत रुजू करुन घ्यावे.

**मा.महापौर मॅडम :** मा.शासनाकडे पाठपुरावा चालू आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** एकवीरा चौक राजनंदिनी हॉटेल व इतर 2 एकुण 3 रस्त्याबाबत मा.आयुक्त साहेब, मा.आमदार साहेब, मा.महापौर मॅडम यांनी समक्ष पाहणी केली त्यावर एक रुपया निधी पडलेला नाही. गॅसवाल्यांनी रस्त्याची चाळण केली आहे ते रस्त्याचे वाटोळे करत आहेत. प्रशासन यावर काय उपाययोजना करणार ते केंव्हाही येतात खोदकाम करतात. ते काय नगरसेवकाचे काम आहे. लोक आमच्या कडे येतात. त्यांनी आमची पाईपलाईन तोडली. ड्रेनेजलाईन तोडली आम्हाला तर त्याची माहितीच नसते. इथापे साहेबांना सर्व प्रश्न माहिती आहेत खड्डे कधी बुजविणार ते सांगा नगर शहरात तशीच परिस्थिती आहे. इतका चांगला उड्डाणपुल झाला पण लोकांचे समाधान नाही तोफेच्या तोंडी सर्वात अगोदर नगरसेवक येतात. रस्ते मंजूर आहेत मग ते का करीत नाही. कशामुळे थांबले.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** बुरुडगांव रोड 7 कोटी, राधाबाई काळे 1 कोटी, कल्याण रोडला 1 कोटी निधी थांबविला कितीतरी कोटी निधी नविन सरकारच्या माध्यमातुन थांबवला आहे. अनिल शेठला मी विनंती करतो त्यांनी ही स्थगीती उठवण्यासाठी प्रयत्न करावा. एवढा निधी आणणार कोठून.

**मा.श्री.संपत बारस्कर :** सध्या महानगरपालिकेची काम करण्याची पध्दत अगोदर रस्ता करतो. मग ड्रेनेज लाईन टाकतो, मग पाण्याची लाईन टाकतो यामुळे नविन रस्ते पुन्हा खोदले जातात. रस्त्यांची कामे का होत नाहीत.

**शहर अभियंता श्री.इथापे :** आपण या तीन रस्त्यांची चर्चा केली त्यात प्रशासकीय अडचण आहे. काम सुचवायचे अधिकार प्रशासनास नाहीत. तथापि जुना पिंपळगांव माळवी रोड 15 वर्षे झाली ही वस्तुस्थिती आहे. एस्टीमेट 2 वर्षापासुन तयार आहे. नागापूर बोल्हेगांव, सारसनगर, केडगांव हे डी.पी रोड आहेत. बोल्हेगांव 2 रस्ते सर्वसाधारणपणे 30 रस्ते गेल्या 10-15 वर्षापासुन केले नाहीत. रस्त्यावर ड्रेनेज लाईन, पाण्याच्या लाईन गेल्या गॅसच्या लाईन गेल्या आहेत बोल्हेगावातील नविन रस्ता पुर्ण खराब झाला आहे. काळी माती आहे. रस्त्याचे अंदाजपत्रक केले. निधी उपलब्ध नाही त्यामुळे रस्ते करु शकत नाही. गॅस कंपनी कडून 7-8 कोटी वसुल करुन जमा करुन घेतले आहेत. कंपनीच्या प्रतिनिधी सोबत वारंवार बैठका घेतल्या केंद्राच्या योजना आहेत ते पुर्ण करणे गरजेचे आहे. उपनगरात

प्रायोगिक तत्वावर परवानगी दिल्या. सावेडीत रोड मोठे आहेत. रस्ता खोदण्यास परवानगी दिलेली नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :** रोड झाल्यानंतर गॅस पाईपलाईनसाठी रोड तोडतो का नाही.

**शहर अभियंता श्री.इथापे :** एक काम एका योजनेत मंजूर होते. दुसरे दुस-या योजनेत होते आमचा प्रयत्न असतो. शक्यतो नविन रस्ता खोदला जावू नये जिथे काम करायचे तिथे आरोग्य, पाणीपुरवठा विभागाशी समन्वय करतो. जिथे प्रोव्हीजन करणे शक्य आहे तिथे करतो. संभाजी नगरमध्ये 17 ठिकाणी रस्ता नागरिकांना खोदला आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** फेज-2 लाईनसाठीचा रस्ता फोडल्यानंतर चारी व्यवस्थीत भरण्यांत येत नाही. कंपनीकडून पैसे भरुन घेतांना पूर्ण रस्त्याचे पैसे भरुन घ्या.

**शहर अभियंता श्री.इथापे :** एस्टीमेटला फ्री हॅण्ड असावा अशी आमची विनंती आहे.

**मा.सौ.रुपाली वारे :** शिवनगर मधील रस्ता गॅसवाल्यांनी पुर्णपणे फोडला.

**शहर अभियंता श्री.इथापे :** नोटीस देवून त्यांचेकडून रक्कम वसुल करण्यांत येईल.

**मा.श्री.अविनाश घुले :** सोलापूर रोडचा रस्ता चालू आहे. त्या रस्त्याचे खाली फेज-2 लाईन आहे. सोलापूर रोड, कानडे मळा, या भागात रस्त्याचे कामामध्ये पाण्याची लाईन,ड्रेनेज लाईन तुटफुट होत आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** ठेकेदाराला शिफ्टींग करायला सांगीतले आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** चार ते पाच जे रस्ते सांगीतले त्यासाठी निधी उपलब्ध केंव्हा करुन देणार आहेत.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** जे बजेट रिलीज करणार आहेत त्यातून देवू.

**मा.श्री.संपत बारस्कर :** महाल परिसरात नविन पाण्याची टाकी उभारणेचे काम तातडीने मार्गी लावा. नगरशहर उपनगर रोड पार्किंग हा विषय का पेंडींग आहे.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** शहरात तात्पुरत्या स्वरुपात ;;;;;

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** तातडीने मंजूरी दिली पाहीजे. साईड मार्जीन सोडून बांधकाम करतात.

**मा.महापौर मॅडम :** पुढच्या महासभेत घ्या.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :** टेंडर करण्याची परवानगी देवून टाका. फार गंभीर विषय आहे.

**मेकॅनिकल इंजिनिअर श्री.निकम :** जे पार्किंगचे धोरण अवलंबवायचे त्यांचे धोरण ठरवायचे आहे. त्यासाठी महासभेसमोर प्रस्ताव सादर केला आहे. त्याचा डीपीआर बनविला आहे. महासभेच्या मंजूरी नंतर पुढील प्रक्रीया होईल.

**मा.श्री.संपत बारस्कर :** टेंडरला महासभेची परवानगी लागेल. अशा अटीवर टेंडर प्रसिध्द करता येईल. अटी शर्ती टाकुन टेंडर प्रसिध्द करा.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** मा.महासभेची मान्यता घ्यावी लागेल.

**मा.श्री.संपत बारस्कर :** महासभा जो रस्ता वगळेल तो रस्ता वगळा या अटीवर टेंडर प्रसिध्द करा.

**मा.आयुक्त साहेब :** महासभेच्या मंजूरी अगोदर धोरण ठरविणे संयुक्तीत नाही. यामध्ये दर किती लावायचे, बिल्डींग डेव्हलप करायचे, कोणते रस्ते योग्य, कोणते अयोग्य आहे याचा विचार धोरण ठरवितांना करावा लागणार आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** पुढच्या आठ दहा दिवसात बोर्ड काढा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** पुढच्या चार पाच दिवसात बोर्ड काढू.

**मा.महापौर मॅडम :** विषय पत्रिकेवरील विषय घेण्यांत यावेत.

विषय क्रमांक 23 मंजूर विषय क्रमांक 24 चे वाचन

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :** किती निधी प्राप्त झाला. शासनाचे काय अटी आहेत. कशा कशावर निधी खर्च करणार या विषयी माहिती घ्यावी.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** 15 व्या वित्त आयोगा अंतर्गत निधी प्राप्त होतो. त्याची वितरण व विनियोगा बाबतची कार्यपध्दत टाईड ग्रँट 50%, ओपन टाईड ग्रँट 50% पाणी पुरवठा विभागासाठी 50%, घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी 4 कोटी 6 लक्ष प्राप्त झालेले आहे. 2 कोटी पैकी 1 कोटी 23 लाख कचरा वाहतुक ठेकेदार देयक अदा करणे, मृत जनावरे विल्हेवाट 20 लाख साठी प्रस्तावीत.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** कचरा ठेका संपला त्याचे टेंडर काढले 3 पैकी BVG हिचे जयपूर महानगरपालिकेने ब्लॅक लिस्ट केली आहे. त्याबाबत माहिती द्यावी भविष्यात जर ही कंपनी आली तर आज ज्या रँकवर महानगरपालिका आहे त्या रँकवरुन ती खाली येईल.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** तीन निविदा आल्या आहेत. 1) BVG 2) अपलेट 3) सुरतची आहे. कागदपत्र तपासायचे काम चालू आहे. 7 दिवस लागतील हायकोर्ट ऑर्डर आहे त्यातब्लॅक लिस्ट वगैरे केले नाही.

**मा.श्री.सागर बोरुडे :** एफएसटीपी ची खोटी माहिती दिली. डीएनएफपी मानांकन मुळे महानगरपालिकेचा नंबर मायनस मध्ये गेला.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** डीएफटीपी झाल्याशिवाय थ्री स्टार मानांकन मिळत नाही. रिव्हीजनवर निर्णय झालेला नाही. ड्रायब्रेड आउटडेटेड केले आहे त्यामुळे आपल्याला फेल केले आहे. आपल्याला आपला रिझल्ट सुधारीत करुन घ्यावयाचा आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :** ठेकेदाराकडून वाहन भाडे अद्यापपर्यंत किती भाडे वसुल झाले आहे.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** प्रत्येक महिन्याच्या देयकातुन महानगरपालिकेने दिलेल्या वाहनाचे भाडे वसुल करतो. दोन कोटी वसूल केले आहेत. चालू तीन चार बिले घ्यायची ते राहीले आहेत. सध्या जी

तरतुद आहे तीच ठेवली. आरटीओ नियमानुसार बदलले नाही. वाहने जुनी आहेत घसारा 10 ते 15% जास्त आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :** जुन्या ठेकेदाराकडून वाहने ताब्यात घेतांना वाहनाची स्थीती तपासून घ्यावी. नविन स्वच्छ सर्व्हेक्षण बाबत माहिती घ्या.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** शहर स्वच्छता व सौदर्यीकरण करण्याचे शासनाने ठरविले आहे. लोकसंख्येनुसार गट केले आहे. ड वर्ग महानगरपालिकेसाठी 15, 10 व 5 कोटी बक्षीस आहे. बक्षीसाचा निकष स्वच्छता व सुशोभिकरण यावर देणार आहेत. रस्ते स्वच्छ, चौक सुशोभिकरण, साईड पट्टे, भिंती रंगविणे इत्यादी काम करायचे आहे. डिसेंबर 2023 पर्यंत मुदत आहे. नेमलेली एजन्सी येवून पाहणी करतील व बक्षीस गुणानुसार मिळतील..

**मा.श्री.शाम नळकांडे :** 15 कोटीचे बक्षीसासाठी एक टीम करावी. व ते बक्षीस नगर शहराला कसे मिळेल यासाठी काही केले का ? कोणावर जबाबदारी निश्चीत केली का ?

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** काही ठिकाणी निधीची अडचण आहे. पुढच्या महासभेला विषय घेवून येत आहोत. शेडाळे, इथापे, निकम यांचा प्रमुख यांचेसमवेत आमची बैठक झाली. त्यांना कामही सांगीतले आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** स्वयंभूची निविदा मंजूर केली. त्याचे तीन वर्ष पूर्ण झाले का. अंदाजे वाहनाचे भाडे माझे माहिती प्रमाणे 10 ते 15 लाख महिन्यास होतात. उपायुक्त म्हणतात पावणे दोन कोटी वसुल केले. दीड वर्षाचे भाडे आपण त्यांचेकडून केंव्हा घेणार. महानगरपालिकेचे 64 ते 65 वाहनांचे वार्षिक भाडे किती होते व तीन वर्षाचे किती होते.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** 8 लाख 25 हजार फक्त भाडे होते. 64 घंटागाड्या -12 हजार मासिक भाडे, 48 हजार मासिक भाडे कॉम्प्युटरचे आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 25% इतर कशावर खर्च करणार ते सांगा. डिटेल सांगा. त्याचे भाडे इतके होते. 2.5 कोटी त्याचेकडून घेणे आहे.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** जे बिल आपण देतो. त्यातुन भाडे आपण वसुल करतो.

**मा.सौ.पल्लवी जाधव :** सूर्यनगर मध्ये ओढया जवळ अॅनिमल वेस्ट टाकतात त्यामुळे दुर्गंधी सूटते. अशा ठिकाणी सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसवावेत.

**मा.सौ.शीला चव्हाण :** 133 अ इतर आपत्तीनुसार कोव्हीड काळातील नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत घरपट्टी माफी मिळावी तसा ठराव करावा व शासनाकडे पाठवावा.

**मा.श्री.शाम नळकांडे :** विषय मंजूर करावा. पाणी पुरवठा विभागासाठीचे पैसे द्या.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** विषय आयुक्तांसमोर मांडू.

**मा.महापौर मॅडम :** ऑफिस रिपोर्ट मंजूर. घनकचरा व्यवस्थापन विभाग व पाणी पुरवठा विभागासाठी प्राप्त अनुदानातून कामे करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

विषय क्रमांक 25 मंजूर.
ऑफिस रिपोर्टचे वाचन केले.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 47 पैकी किती काम मंजूर झाली.

**शहरअभियंता श्री.इथापे :** कार्यान्वय यंत्रणा पीडब्ल्युडी कडे असल्याने त्यांना बैठकीस उपस्थित राहणे बाबत पत्र दिले ते किती कामे झाले हे सांगू शकतील. उपनगरात काम पूर्ण झाले शहर गावठाण भागातील राहीले.

**मा.श्री.अनिल शिंदे :** आज जे काम प्रलंबित आहे त्या पिरीयड मध्ये का केले नाही. 60 लाख दिल्यावर तो काम करणार का.

**शहरअभियंता श्री.इथापे :** टी.एस घेवून शासनाकडे प्रस्ताव सादर केला. शासनाने कार्यान्वय यंत्रणा पीडब्ल्यूडीकडे दिली आहे. त्यांनी 3 टेंडर केले, टेंडर जादा दराने मंजूर केले महानगरपालिकेची कोणतीही परवानगी घेतली नाही. जीएसटी 123% व चार्जेस असे 204.79 लक्ष जास्त त्यांना द्यावेत. या पत्राला 3-9-2019 ला शासनाला कळविले. त्यांचे टेंडर मध्ये भाव वाढीचा कॉलम हवा होता तो नाही. त्यामुळे आज भाव वाढ महानगरपालिका देवू शकत नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :** त्याच पिरीयड मध्ये कामे का करुन घेतली नाही. महानगरपालिकेच्या तिजोरीतून 20 लाख त्या ठेकेदाराला द्यायचे असा प्रस्ताव आला आहे.

**शहर अभियंता श्री.इथापे :** वर्क ऑर्डर 2019 ला दिली. मध्यंतरी कोव्हीड कालावधी गेला. जानेवारी 2022 पासून पाठपुरावा केला. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे केलेल्या कामाची रक्कम वजा जाता उरलेल्या रक्कमेतून 5 रस्ते पावसाळयापूर्वी करायचे ठरले. असे पत्र महापौरांनी बांधकाम विभागाला दिले. काम बदलले नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :** हे पैसे 47 कामावर लागले पाहीजे. उर्वरीत कामाचे काय होणार यावर कोणी तक्रार केली तर काय करणार. 60 लाख दिले तर 5 रस्ते पुर्ण होणार.

**शहर अभियंता श्री.इथापे :** वाढीव पैसे द्यावे. असे आमचे म्हणणे नाही सभागृहासमोर वस्तुस्थिती आणली आहे. टेंडर क्लॉजमध्ये तशी तरतुद नाही. वाढीव रक्कम देता येणार नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :** किती दिवसात 5 रस्ते होतील. कार्यकारी अभियंता, आयुक्त साहेब, यांनी बसून चर्चा करावी. आम्ही पैसे खर्च करायला तयार आहोत पण रस्ते केंव्हा होणार ते सांगा. 60 लाख वर्ग करुन किती दिवसात काम करुन देणार ते सभागृहास सांगा. महापौर यांनी जे पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले ते वाचून दाखविले.

**शहरअभियंता श्री.इथापे :** 60 लाख रक्कम नाही रक्कम खुप मोठी आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 4 कोटी 72 लाखांचा प्रस्ताव तयार केला आहे.

**शहरअभियंता श्री.इथापे :** 237.67 + 234.79 = 4 कोटी 65 लाखाच्या आसपास रक्कम सार्वजनिक बांधकाम विभागाने कळविल्यानुसार 47 रस्त्यांसाठी घ्यावे लागतील.

**मा.श्री.अनिल शिंदे :** एवढे पैसे वर्ग केले का.

**शहरअभियंता श्री.इथापे :** सार्वजनिक बांधकाम विभाग पैसे मागतो. आम्ही द्यावे असे कुठेही म्हटलेले नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** 5 रस्त्यांसाठी किती द्यावे लागतील.

**शहरअभियंता श्री.इथापे :** शिल्लक 5 कोटी रुपयातुन होवू शकतील. भाववाढ देण्याची तरतुद कोठेही नाही. उरलेल्या रक्कमेतुन सर्व रस्ते होवू शकणार नाही.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** 5 रस्ते करुन घेवू.

**मा.श्री.अनिल शिंदे :** डांबराची भाववाढ रक्कम दिल्यानंतर काम किती दिवसात पूर्ण करणार ते सांगा. उद्या पैसे वर्ग करुन टाका. 15 व्या वित्त आयोगातून घ्या. ठेकेदार एस्टीमेट रेटमध्ये करायला तयार नाही.

**शहरअभियंता श्री.इथापे :** आम्ही गेल्या दोन वर्षापासुन पाठपुरावा करत आहोत.

**मा.श्री.अनिल शिंदे :** डांबराचे भाववाढ झाल्याने तो ठेकेदार काम करायला तयार नाही.

**मा.उपायुक्त श्री.डांगे :** 5 कोटीत चार रस्ते होत असतील तर तेवढे करा.

**मा.श्री.सचिन शिंदे :** सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनियर बैठकीला का आले नाहीत.

**शहरअभियंता श्री.इथापे :** आपण भाववाढ कोणत्या अधिकारात देणार हा प्रश्न आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** सभागृह सर्वोच्च आहे.

**मा.श्री.सचिन शिंदे :** दोनच रस्ते करा.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** आपण संयुक्त मिटींग घेवू. अजेंडयावर विषय घेवू. प्रोसिडींग घेवू.

**मा.श्री.अनिल शिंदे :** काही स्कीमचे पैसे शासनाने परत घेतलेले आहेत. याचेही असे होवू नये.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** पुढचा विषय घ्या.

**मा.श्री.मनोज कोतकर :** सिस्टरांचा विषय घ्या.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** मा.आयुक्त यांनी एलईडी कंपनीला 80 % वीज बिल बचत बाबत नोटीस दिली. नोटीसीला त्यांनी थातुर मातुर उत्तर दिले. वायर वगैरे घ्यावे लागते. नियम अटी शर्तीचा त्याने भंग केला पर डे 1 लाख दंड करणार होतो. त्याबाबत विभाग प्रमुख यांनी माहिती द्यावी. वीज बचत होत नसेल तर संस्थेला दंड करावा. काही ठिकाणी चिमणी सारखा प्रकाश पडतो. विभाग प्रमुखांनी माहिती द्यावी. मुदत संपली. मुदतवाढ दिलेली नाही.

**इलेक्ट्रीक विभाग प्रमुख श्री.वैभव जोशी :** एलईडी निविदा धारकां बाबत सविस्तर अहवाल सादर केला आहे. कारवाईचा प्रस्ताव दिला होता. निविदा धारका सोबत 2-3 मिटींग घेवून कामात सुधारणा करण्यांबाबत सूचना देण्यांत आलेल्या आहेत. बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार 5 डिसेंबर 2022 पर्यंत पुर्तता करणे बाबत कंपनीला सूचना देण्यांत आलेल्या आहेत.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :** त्यानतर दंड वगैरे करणार का. आयुक्तांनी लक्ष द्यावे पुढच्या सभेत माहिती द्यावी.

विषय क्रमांक 26

**मा.श्री.अनिल शिंदे :** पैसे किती द्यावे

**मा.महापौर मॅडम :** 3 लाख देतो.

**मा.श्री.अनिल शिंदे :** रक्कम रु.5 लाख द्यायला हरकत नाही.

**मा.श्री.गणेश कवडे :** नगर शहरात क्रीडा पटू अनेक स्पर्धा आयोजित करतात. महापौर केसरी स्पर्धा आयोजित करावी लागणार आहे. सभागृहाने तीन लाख मंजूर केले तरी चालेल. इतर खेळही महत्वाचे आहेत.

**मा.महापौर मॅडम :** चार लाख देण्यांत यावेत.

**मा.श्री.शाम नळकांडे :** पंकज शिरसाठने तीन वेळेला भारताचे प्रतिनिधीत्व केले. कबड्डी स्पर्धेला चार लाख द्यावेत.

विषय क्रमांक 27 :

**मा.श्री.अनिल शिंदे :** टोटल क्षेत्र 2 हेक्टर आहे. तक्ता दिला आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** स्मशान भुमी दफनभुमी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने जमिनीचे भुसंपादन करण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. दिनांक 22-4-2022 रोजी मा.महापौर मॅडम यांनी मिटींग घेतली त्या अनुषंगाने विषय घेतला. मा.सदस्यांनी पत्र दिले आहे. आपण जी स्मधानभूमी आहे त्यामध्ये मॉडीफिकेशन करणे गरजेचे आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** आरक्षण किती आहे. आपण आरक्षीत करत आहोत. कलम 127 अन्वये 2 खरेदी सूचना महानगरपालिकेस प्राप्त झाल्या त्या विहित कालावधीत कार्यवाही न झाल्याने व्यपगत झाल्या आहेत. व्यपगत झाल्या म्हणजे काय ? हे विषय सभागृहासमोर का आणले नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** सन 2018 च्या सभेत प्रस्ताव घेतलेले आहेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :** मग एकदा सभागृहात विषय आल्यानंतर पुन्हा सभागृहा समोर का आणला ? भूसंपादनासाठी आला होता. महासभेने निर्णय घेतलेला नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** मालकाने 127 नुसार नोटीस दिली तर भूसंपादनासाठी प्रोसेस करावी लागणार.

**मा.श्री.अनिल शिंदे :** एखादा गरीब असता तर शासनाकडे प्रस्ताव पाठवला असता का ? मी या संदर्भात गृह खात्याकडे चौकशी लावणार. सभागृहाची कोणतीही मंजूरी नसतांना शासनाकडे प्रस्ताव कसा पाठविला.

**मा.आयुक्त साहेब :** 127 च्या प्रोसीजर नगररचनाकार सांगतील. जर फॉलोअप झाल्या नसतील तर चौकशी लावा.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** 127 कलम अंतर्गत जमिन मालकाने महानगरपालिकेने नोटीस दिली. त्यावर विहित कालावधी झाला नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :** 4 एकर जागा आरक्षीत करायची मग जमीन अधिग्रहण करायची किती रक्कम तुमच्याकडे शिल्लक आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** 15 कोटी रक्कम शिल्लक आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** ज्याच्यावर आरक्षण टाकायचे तो सर्व्हे कोणाचा आहे. नंबर किती आहे.?

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** सर्व्हे नंबर 261 आहे व तो शिवाजी महादेव कराळे यांचा आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :** तो विषय कोणाचा तुमच्याकडे 15 कोटी शासनाकडून मंजूरी आणल्या नंतर पैसे देणे बंधनकारक आहे. 32 कोटी द्यावे लागतील आपल्याकडे 15 कोटीच आहे. त्याला द्यावे लागेल.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** आज रोजी असेप्ट केले नाही. तत्वतः मंजूरीसाठी च्या अनुषंगाने पुढची कार्यवाहीसाठी प्रस्तावीत केले आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** ज्या वेळेस खरेदी करायची त्या वेळेस पैसे द्यावे लागतील.

**मा.श्री.अनिल शिंदे :** मी माझे लेखी म्हणणे पीठासीन अधिकारी यांना दिले आहे.

**मा.सौ.आशा कराळे :** दुसरी कोणती जमीन असेल तर ती घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :** मी स्मशान भूमी संदर्भात बरीच पत्र दिले. मी सावेडी कचरा डेपो येथे प्रथम मागणी केली तेथे का केली नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** मॉडीफिकेशन प्रस्ताव बंधनकारक आहे तो ऑलरेडी कचरा डेपो आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** सावेडी कचरा डेपो वर स्मशान भूमी का करत नाही. आता जो प्रस्ताव घेतला आपल्या मागणीवरुनच घेतला आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** डी.पी.प्लॅन सुधारीत करायचा मुळ हद्दीला 17 वर्षे पुर्ण झाले आहेत एक एजन्सी यासाठी नेमली आहे. इरादा जाहीर करायचा आहे. परंतु आज रोजी मंजूर झालेला नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :** डी.पी प्लॅन बद्दल किती नगरसेवकांना माहिती दिली.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** महासभेने पूर्वी विषय घेतला मसुदा सादर केला परंतु विषय मंजूर नाही. आता फक्त इंटेशनल घेणार आहोत. लाभार्थ्यांची मिटींग घेवून सूचना घेणार आहोत डॉक्टर वकील यांचे मत घेणार आहोत. 20 वर्षानंतर डी.पी. प्लॅन बदलावा लागतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :** डी.पी प्लॅन हा विषय सर्व नगरसेवकांना माहिती पाहिजे तुम्ही या ठिकाणी आरक्षण टाकता ते लोक जमिनी देत नाही. जेवढे आरक्षण टाकतो त्याची माहिती द्या.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** 31 हजार आरक्षणा पैकी 20% आरक्षण 40 वर्षात डेव्हलप झाले. 300 जमिनी महानगरपालिकेच्या ताब्यात नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :** ते भुखंड ताब्यात का देत नाही. तुम्ही कंम्पलसरी अॅक्वाझीशन ताब्यात का घेत नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** महासभेने तसे निर्णय घेणे आवश्यक आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** जलतरण तलाव महानगरपालिकेचा 1 आहे. अमरधाम 3आहेत, प्ले.ग्राउंड 1. ज्यांच्या जमिनी तुम्ही ताब्यात घेता त्याला जेवढा मोबदला मिळाला पाहीजे तेवढा मिळत नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** त्यासाठी निधी आवश्यक आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :** चार झोनला चार जलतरण तलाव पाहीजे. आपल्या महानगरपालिकेची कॅपॅसिटी नसते पैसे द्यायची. प्रथमतः टीडीआर दिला पाहीजे. 100% पै. 80% नुकसान शेतक-यांचे होते. व्यापारी लोक 20% वर टीडीआर चे पैसे देत नाहीत. एक ठराव असा करा महानगरपालिकेच्या सर्व भूखंडा बाबत शासनाने एक परिपत्रक काढले ज्यांची जमिन आहे त्यांना टीडीआर चा मोबदला मिळाला पाहीजे.

आरक्षीत जागेत भूखंडधारकांना नोटीसा काढा. राज्य शासनाकडे प्रस्ताव पाठवा. भूखंड द्यायला तयार नाही तसा ठराव करा. जेणे करुन बिगर पैशाचे भूखंड ताब्यात येतील. पुढच्या सभेत हा विषय सभागृहात मांडला पाहीजे.

**मा.श्री.मदन आढाव :** किती आरक्षण स्मशान भूमीसाठी आहेत.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** सध्या 58, 59 दोन आरक्षण आहेत. त्या लोकांनी तक्रार दिली त्या ठिकाणी जायला रस्ता नाही. डॉन बॉस्को जवळ ही जागा आहे.

**मा.श्री.मदन आढाव :** ती जागा का घेत नाही.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** याचेसुध्दा भूसंपादन करावे लागणार. आरक्षण प्रस्तावीत आहे. 2013 नुसार आरक्षण प्रस्तावीत करणार.

**मा.श्री.मदत आढाव :** त्या दोन जमिनी आहेत त्याचे नांव सांगता का.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** सदाशिव लक्ष्मण बारस्कर, सुभाष जगन्नाथ बारस्कर ;;;;;;;;;; त्यांनी जमिनी देण्यास नकार दिला आहे.

**मा.श्री.मदत आढाव :** कचरा डेपोवर करोनात अंत्यविधी केल्या.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** टीडीआर मार्फत जमिनी कचरा डेपोसाठी घेतली.

**मा.श्री.मदत आढाव :** शहरात चूकीचा मॅसेज जात आहे. प्रशासनाने जनतेला सांगीतले पाहीजे. 32 कोटी खर्चून जमिन घेत असू. तर कचरा डेपोवर करायला काय अडचण आहे. तो प्रस्तावीत करा. पुढच्या सभागृहासमोर तो विषय मांडा.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :** महासभेचा अधिकार आहे.

**मा.श्री.मदत आढाव :** एवढा तातडीने विषय घ्यायची का गरज आहे. सावेडी भागात अमरधाम होत असेल तर सर्वांची सोय होईल. आम्ही लेखी म्हणणे दिले आहे.

**मा.उपमहापौर श्री.गणेश भोसले :** मूल्यांकन जमिनीचे जेवढे होईल तेवढे द्यावे लागेल.

**मा.श्री.मदन आढाव :** कचरा डेपोवर केले तर महानगरपालिकेचे 32 कोटी रुपये वाचतील.

**मा.श्री.गणेश कवडे :** नालेगांव अमरधामचे ओट्याच्या जाळया तुटल्या, ओटे तुटले, स्थायी समिती मध्ये यावर बोललो आहे. नालेगावात संपूर्ण शहरातून लोक अंत्यविधीसाठी येतात. सावेडीसाठी अमरधाम जरुरी आहे.

**मा.महापौर मॅडम :** ऑफिस रिपोर्ट मंजूर करा.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

कार्यालयीन आदेश.

जा.क्र. नगरसचिव.-
दिनांक : १७ / ११ /२०२२

संबंधीत खाते प्रमुख व शाखा प्रमुख,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस.-

कळविण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शुक्रवार दिनांक २५-११-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपल्या नावासमोर दर्शविलेल्या कामाची आपण पुर्तता करावी.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत :-

| | | | |
|---|---|---|---|
| १) | घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख | : | महानगरपालिका सभागृहाचे आसपासचे भागाची साफसफाई करुन घेण्याबाबत संबंधितांस सुचना द्याव्यात. |
| २) | प्रसिध्दी अधिकारी | : | बैठकीची सुचना व विषयपत्रिका या सोबत जोडली आहे. त्याची जाहिरात स्थानिक वृत्तपत्रात त्वरीत प्रसिध्द करावी व प्रसिध्दीचे २ (दोन) अंक इकडेस पाठवावेत. सदरच्या येणा-या खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. |
| ३) | श्री.दत्तात्रय ढवळे, स्वीय सहाय्यक, आयुक्त कार्यालय, | | आपण सभेपुर्वी महानगरपालिका सभागृहात उपस्थित राहुन संपुर्ण सभेचे प्रोसिडींग घेण्याचे काम करावे. |
| ४) | इलेक्ट्रीक विभाग प्रमुख | : | वरीलप्रमाणे नोंद घेवून महानगरपालिका सभागृहातील सभेकरीता लाईट व लाऊड स्पीकरची व्यवस्था करण्यात यावी. तसेच नेहमीप्रमाणे टेपरेकॉर्डची सुध्दा व्यवस्था करण्यात यावी. सदर दिवशी विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची दक्षता घ्यावी. |
| ५) | श्रीमती.निकम, नगरसचिव कार्यालय | : | महानगरपालिका सभागृहात राष्ट्रगीत म्हणणे करीता सभेपुर्वी उपस्थित रहावे. |
| ६) | मनपा हवालदार | : | वरील प्रमाणे नोंद घेवुन महानगरपालिका सभागृहात आवश्यक ती पुर्तता करावी व एक कर्मचारी यांची गणवेशासह नियुक्ती करणेत यावी. |

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचेकडेस माहितीस सादर.

**अहमदनगर महानगरपालिकेची सभा सुचना क्रमांक ०४, शुक्रवार दि. २५/११/२०२२ रोजी होणा-या सर्वसाधारण सभेचा अजेंडा वाटप करण्यास मिळाले बाबत स्वाक्षरी.**

---*---

| **पान क्रमांक** | **नांव** | **स्वाक्षरी** |
|---|---|---|
| १ | श्री.झिने | |
| २ | श्री.उन्मेश क्षिरसागर | |
| ३ | श्री.भोर बाळासाहेब | |
| ४ | श्री.बाबा कोतकर | |

| | |
|---|---|
| | **अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**<br>**नगरसचिव विभाग** |

कार्यालयीन आदेश. जा.क्र.नगरसचिव.-

दिनांक :- १७/११/२०२२.

प्रति,

१) श्री.दयानंद साळवे, विरोधी पक्ष नेता
२) श्री.राउत , सामान्य प्रशासन विभाग,
३) श्री. शांतवन बडेकर, उपायुक्त कार्यालय,
४) श्री.सुभाष ढगे, स्थायी समिती कार्यालय
५) श्री.आकाश घुले, सभागृह नेता कार्यालय,
६) श्री.बाबासाहेब गुंड, महापौर कार्यालय,
७) श्री.राजु दळवी, उपायुक्त कार्यालय,
अहमदनगर महानगरपालिका.

यांस.-

आदेशीत करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार **दिनांक २५-११-२०२२ अहमदनगर महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारत (राजमाता जिजाऊ सभागृह) औरंगाबाद रोड, अहमदनगर** येथे बोलविण्यात आलेली आहे.

तरी आपण सकाळी ९.३० वाजता कार्यालयीन गणवेशात हजर रहावे व मनपा हवालदार यांच्या सूचनेनुसार काम पहावे.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : महानगरपालिका हवालदार, अहमदनगर महानगरपालिका यांस माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार **दिनांक २५-११-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता** पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा शुक्रवार **दिनांक २५-११-२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

उपायुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.
नगरसचिव विभाग.-
दिनांक :       /११/२०२२.

विषय : बुधवार दिनांक - १९ / १० /२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता झालेल्या मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०३ चहापान खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत...

सादर,

विनंती रिपोर्ट की, महाराष्ट्र शासनाचे शासन परिपत्रक क्रमांक एम.सी.ओ. ४६८५-१८८२ सी. आर.६८-८६-युडी-१४ दिनांक २९ जुलै १९७६ अन्वये कळविले आहे की, चहा व इतर पदार्थांचे दर बदलत असतात म्हणून चहापानाचे कमाल दर परिपत्रकान्वये ठरवून देण्याची आवश्यकता वाटत नाही. कौन्सीलच्या सांविधीक समितीच्या बैठकीसाठी मनपा/नपा यांनी चहापानाचा खर्च आकस्मिक निधीतून (कॉन्टीजन्सी एक्सपेंन्डीचर) किती करावा हे प्रत्येक नगरपालिकेने ठरवावे त्याप्रमाणे खर्च करावा, अशी तरतूद आहे.

अहमदनगर महानगरपालिका सर्वसाधारण सभा क्र. १ दिनांक १७/०२/२०१२ अन्वये अहमदनगर महानगरपालिका खास सभा/सर्वसाधारण सभेचा चहापान खर्च रक्कम रु. १८,०००/- करणेत आला आहे. अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा सुचना क्रमांक ०३ बुधवार दिनांक १९/१०/२०२२ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर येथे झाली आहे.

सदर अहमदनगर महानगरपालिकेच्या सभागृहात आयोजित केलेल्या या सभेस उपस्थित सभासदांचे चहापानाकरीता रक्कम रु.८,२६०/- (अक्षरी रक्कम रुपये आठ हजार दोनशे साठ फक्त) च्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळावी, सदरचा खर्च नगरसचिव विभागाच्या* **मा.महासभा, स्थायी समिती, महिला व बालकल्याण समिती मिटींग चहा नाष्टा भत्ता** * या लेखाशिर्षाअंतर्गत दर्शविण्याच्या मान्यतेस्तव तसेच सदरचा खर्च श्री.किशोर कानडे, लिपीक टंकलेखक, अहमदनगर महानगरपालिका यांनी केला असुन सदरचा धनादेश श्री.किशोर चंद्रकांत कानडे, अहमदनगर महानगरपालिका यांचे नांवे काढणे बाबत मुख्यलेखाधिकारी यांना आपलेस्तरावरुन आदेश होणेस विनंती आहे.

| | | |
|---|---|---|
| **तरतुद** | **:** | **४,००,०००/-** |
| **पुर्वीचा खर्च** | **:** | |
| **हया बीलात दाखविलेला खर्च** | **:** | |
| **२ व ३ ची बेरीज** | **:** | |
| **उपलब्ध शिल्लक** | **:** | |

नगरसचिव,
नगरसचिव विभाग,
अहमदनगर महानगरपालिका.